
# मेहता मराठी ग्रंथजगत


अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक


एप्रिल २०१४। किंमत १५ रुपये












‘खुलदाबादचा खजिना’ या बालकथासंग्रहासाठी,श्री.न.म.जोशी आणि श्री.नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते,अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचा राज्य पुरस्कार स्वीकारताना मीरा सिरसमकर .


**Cash on Delivery ही सुविधा महाराष्ट्रात खालील शहरांमध्ये उपलब्ध !**

| | | |
|---|---|---|
| अकोला | बुटिबोरी | भिवंडी |
| अमरावती | नाशिक | वसई |
| अहमदनगर | नांदेड | उल्हासनगर |
| औरंगाबाद | पुणे | कल्याण |
| कणकवली | पिरंगूट | शहापूर |
| कराड | पिंपरी | पनवेल |
| कोल्हापूर | पंढरपूर | कळंबोली |
| चन्द्रपूर | बारामती | लातूर |
| चिपळूण | मुंबई | सातारा |
| जळगाव | वाशी | सांगली |
| नागपूर | ठाणे | सोलापूर |

# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल २०१४ • वर्ष चौदावे • अंक चौथा

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

अंकाची किंमत
१५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस


अनुक्रमणिका


संपादकीय ४
साहित्यवार्ता ८
पुरस्कार ४४
पुस्तक परिचय ५८
अभिप्राय ९८
इंग्रजी पुस्तक परिचय १०२
श्रद्धांजली १०६
बालनगरी ११२



मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड,
टेलिफोनभवनसमोर,
पुणे-४११ ०३०
फोन :०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५
E-mail : info@mehtapublishinghouse.com



डिजिटल अंकाची वर्गणी

तीन वर्षांची ३००रु. | पाच वर्षांची ४००रु.



या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# संपादकीय

## ॲमेझॉनचे मायाजाल

जगातील सर्वांत जास्त लेखककेंद्रित प्रकाशनगृह होण्याची आकांक्षा बाळगून ॲमेझॉनची वाटचाल सुरू आहे. त्या दृष्टीने ॲमेझॉनने वेगवेगळ्या देशात आपला प्रकाशन व्यवसायातील वावर वाढविण्याचा कार्यक्रम राबविण्यास जोरदार प्रारंभ केला आहे. आजवर ॲमेझॉन ही संस्था जगातील सर्वांत मोठी पुस्तक विक्री यंत्रणा म्हणून आपली प्रतिमा ठाशीवपणे उमटण्यावर भर देत होती. इतर प्रकाशकांची पुस्तके विकण्याच्या व्यवसायात अधिक रस घेत होती. अल्पावधीतच या संस्थेने जागतिक पातळीवर आपला दबदबा निर्माण केला होता. जुनी-नवी पुस्तके विकण्याची विश्वासार्ह व्यवस्था उभी करून वर्षाला काही अब्जावधी डॉलर्सच्या घरात उलाढाल नेऊन सर्वांनाच भयचकित करून सोडले होते. विक्री-वितरण व्यवस्था उत्तम असेल तर मग केवळ पुस्तकांच्या पुरतीच ती मर्यादित का ठेवावी, इतर मालही का विकू नये असा विचार ॲमेझॉनच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या मनात घोळू लागला आणि मुलांसाठी खेळणी, भेटवस्तू, डीव्हीडी, रेकॉर्डेड संगीत वगैरे क्षेत्रातही ॲमेझॉनने मुसंडी मारली. तेवढ्यावरही न थांबता किराणा वस्तू, सर्व प्रकारच्या संसारोपयोगी वस्तू, फर्निचर, फर्निशिंग मटेरियल, रेडीमेड गार्मेन्टस, किचनवेअर, फ्रीज, वॉशिंग मशीन्स वगैरे वस्तूंनाही ॲमेझॉनने आपल्या कवेत घेतले. ॲमेझॉनचा मूळ उद्देश पुस्तक विक्री वाढवणे, ग्रंथसंस्कृतीचा प्रसार करणे हा! त्याला आता खूपच व्यापक क्षेत्रात आपली वितरण यंत्रणा वापरण्यास मोकळे स्फुरण मिळाले.

तरीही ग्रंथविक्री हे आपले मुख्य ध्येय आहे याचा क्षणभरही ॲमेझॉनला विसर पडला नाही. छापील पुस्तके, कागदावर छापलेली पुस्तके जुनी होतात, हाताळल्याने फाटतात, त्यांची पाने जीर्णशीर्ण होतात. त्यांच्या

आवृत्त्या संपल्यावर ती दुर्मीळ होतात. मागणी असूनही ती ग्राहकांना पुरवता येत नाहीत. प्रकाशक, लेखक यांच्या स्वामीत्व हक्कामुळे त्यांच्या नवनवीन आवृत्त्या निघू शकत नाहीत. हे सर्व लक्षात आल्यावर 'ई-बुक'च्या स्वरूपात पुस्तके वाचकांना पुरवली तर अनेक अडचणी कमी होतील; कागद-छपाई-बांईडिंग, साठवणूक, पुस्तके पोस्टाने वा कुरीअरने पाठवण्याचा खर्च वगैरे खर्चत बचत होऊ शकेल. आपल्या घरातल्या वा ग्रंथालयातल्या संगणकावर छापील पुस्तकांच्या पानांचे स्कॅनिंग करून ती वाचता येतील अशी कल्पना ॲमेझॉनच्या प्रवर्तकांना सुचली. संगणकावरही फार अवलंबून न राहता इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील ही पुस्तके – ई-बुक छोट्या, सुटसुटीत, स्वतंत्र रीडरवर वाचन यंत्रावर वाचता येतील अशी किमया साधण्यासाठी ॲमेझॉनने लक्षावधी डॉलर्स खर्च करून संशोधकांच्या टीमला कामाला लावले. असा रीडर (वाचनयंत्र) तयार करण्यात ॲमेझॉनने यश मिळवले. आरंभी पाच सहाशे डॉलर्स एवढी किंमत ठेवली, छापील पुस्तकापेक्षा कमी किंमतीत या रीडरवर जुनी पुस्तके डाऊनलोड करून वाचता येतील, इतर कागदी पुस्तकासारखाच वाचनाचा आनंद- अनुभव हे वाचनयंत्रच देऊ शकेल या दृष्टीने त्यातील त्रुटी दूर करता करता या रीडरच्या किंमतीही शंभर डॉलर्सपर्यंत खाली आणण्यात आल्या. त्यावर शेकडो पुस्तके डाऊनलोड करून हवी तेव्हा हवी तेथे ती वाचता येतील. अशी सोय झाली. पुस्तकाच्या आकाराचे, पुस्तकापेक्षाही कमी वजनाचे हे वाचनयंत्र- किंडल - नव्या पिढीतल्या तंत्रज्ञानकुशल तरुण वर्गाला सोईस्कर वाटू लागले. कमी किमतीत हवी ती शेकडो पुस्तके वाचण्याची सोय झाल्याने टेक्नो-सॅव्ही तरुणांनी किंडलला जवळ केले. ते केवळ काही श्रीमंत आणि स्टेटसकाँशस लोकांचे एक प्रतिष्ठेचे पझेशन उरले नाही.

प्रारंभी पारंपरिक ग्रंथप्रकाशकांना आणि ग्रंथविक्रेत्यांना ई-बुक आणि किंडल हा काय प्रकार आहे याचाच बोध झाला नाही. परंतु ई-बुक्सची मागणी वाढू लागली आणि छापील पुस्तकांच्या विक्रीत दिवसेंदिवस घट होऊ लागली. तसे ते खडबडून जागे झाले. 'किंडल'मुळे आपल्या पुस्तकविक्रीच्या धंद्यावरच गदा येणार आहे हे काही जणांच्या ध्यानात आले. शंभरावर शहरात ग्रंथविक्रीकेंद्रे असणाऱ्या बॉर्डर्ससारख्या आघाडीवरच्या संस्थांची विक्री घटल्याने त्या दिवाळखोरीकडे जाऊ लागल्या. काही विक्रीकेंद्रे बंद पडली. 'बार्न्स अँड नोबल' ने नूक हे वाचनयंत्र बाजारात आणून ॲमेझॉनशी दोन हात करायचा प्रयत्न केला. परंतु ॲमेझॉनने ई-रीडर

क्षेत्रात घेतलेली आघाडी जनमानसात कायम राहिली. ई-बुक्समुळे छापील पुस्तकांच्या खपात आठ-दहा टक्के घट झाली, त्यांचे उत्पन्न कमी झाले. ई-बुक्सच्या विक्रीचे प्रमाण वाढू लागले; मात्र त्यांच्या किंमती कमी असल्याने एकूण ग्रंथव्यवहारात फार मोठा फरक पडला नाही. ॲमेझॉनला ई-बुक्समध्ये सुरुवातीला तोटाच झाला. पण ई-बुक्सच्या रूपात गुगल वगैरेच्या मदतीने वीस लाख पुस्तके वाचकांना उपलब्ध झाल्याने ग्रंथव्यवहाराचे एकूणच स्वरूप बदलले.

ॲमेझॉनचा आरंभीचा खप अर्थातच अमेरिकेत सर्वाधिक होता. पुढे इंग्लंडमध्ये ई-बुक्सचा प्रवेश झाला. जर्मनी, फ्रान्स, रशिया, चीन वगैरे देशात ॲमेझॉनला आता कुठे ई-बुक्ससाठी बाजार खुला होत आहे. परंतु या सर्वच देशातील प्रकाशक-विक्रेत्यांना ॲमेझॉन हा आपला प्रतिस्पर्धी, शत्रू वाटतो आहे. त्यामुळे त्यांना ॲमेझॉनबद्दल दहशत वाटते.

ॲमेझॉनने आता नवीन प्रतिभाशाली लेखकांना जवळ करून त्यांना स्वयंप्रकाशनाबाबत उत्तेजन देण्याचे धोरण आखले आहे. व्यावसायिक प्रकाशन संस्थांवर पूर्णतया अवलंबून राहण्याऐवजी सेल्फ पब्लिशिंगद्वारे नवीन लेखकांनी पुस्तके तयार करावी आणि त्यांच्या वितरणाची, मार्केटिंगची व्यवस्था ॲमेझॉनने बघावी असा सध्याचा व्यापारी व्यूह आहे.

ॲमेझॉनचे प्रवर्तक जेफ बेझोस यांच्या दृष्टीने ई-बुक मार्केट आणि किंडल यांनी गेल्या सहा-सात वर्षात ग्रंथव्यवहारात अब्जावधी डॉलर्सची मजल गाठली आहे. दरवर्षी ॲमेझॉनच्या विक्रीत सत्तर टक्के वाढदिसून येत आहे; आणि त्या तुलनेने छापील पुस्तकांच्या विक्रीत दरवर्षी पाचदहा टक्के घट होत आहे. किंडलला स्पर्धक म्हणून ॲपल आणि आयपॅड यांचाही गजबजाट आहे आणि खरे तर आता स्मार्ट फोन आणि टॅब्लेटच्या वाढत्या प्रसारामुळे किंडलसारख्या डेडिकेटेड बुकरीडरची गरजही अनेक ग्राहकांना वाटू नये ही वस्तुस्थिती आहे. परंतु ज्या वाचकांना पुस्तके वाचण्यात जास्त रस आहे, त्यांना किंडल सुटसुटीत वाटते. त्यात शेकडो पुस्तके राहू शकतात. एक ग्रंथालयच आपल्या जवळ कायमचे असल्याची धन्यता वाटते. तंत्रज्ञानात सातत्याने भर पडत असल्याने ई-रीडरमध्येही नवे काही पर्याय बाजारात येत राहतील. वाचकांच्या आणि व्यावसायिकांच्या दृष्टीने महत्त्वाची बाब म्हणजे अधिकाधिक लोकांपर्यंत पुस्तके जात राहतील आणि छापील पुस्तकांप्रमाणे ती प्रवासात वा अन्य ठिकाणी बरोबर नेण्याचा

आटापिटा करावा लागणार नाही. ग्रंथालयांमधूनही वाचकांना हवे ते पुस्तक अल्प शुल्कात किंवा मोफत डाऊनलोड करून घेऊन हवे तेथे वाचता येईल.

ॲमेझॉन संस्था, ई-बुक्स आणि किंडल यांच्या खपात अमुक टक्के वाढहोत आहे वगैरे बातम्यांचा वाचकांवर मारा करीत असली तरी नेमकी आकडेवारी देण्याचे टाळत आली आहे असा आरोप तिचे स्पर्धक करतात. २०१२ मध्ये ॲमेझॉनची एकूण उलाढाल२० अब्ज डॉलरच्या घरात गेली. या उलाढालीत छापील पुस्तके, ई-बुक्स आणि किंडल यांची नेमकी विक्री किती हे ॲमेझॉन उघड करीत नाही. ई-बुक्सचा प्रसार मात्र झपाट्याने होत आहे हे नक्की! अमेरिकेत बसमध्ये वा रेल्वेत पूर्वी बरेच प्रवासी पुस्तके वाचताना दिसत. आता त्यांच्या हातात किंडल किंवा टॅब्लेट दिसतो. हे त्याचे प्रमाण म्हणून दाखवता येईल.

भारतातील बऱ्याच अग्रगण्य प्रकाशन संस्था आणि ग्रंथविक्रेते अजून ८/१० वर्षे तरी छापील पुस्तकांना पर्याय नाही असे गृहीत धरून आहे तो व्यवसायच अद्ययावत करण्यात गुंतलेले आहेत. ई-बुक्सचा दणका कधी बसेल तेव्हा काय होईल ते बघू म्हणत ते स्वस्थ आहेत. ॲमेझॉन, ॲपल वगैरेंनी आपल्या ग्रंथव्यवहारात स्पर्धा निर्माण करू नये एवढीच त्यांची मनोमन अपेक्षा आहे. आता ग्रंथप्रकाशन आणि ग्रंथव्यवहार यात आपले प्रतिस्पर्धी होते ते आपलेच लोक होते. या पुढच्या काळात आपली स्पर्धा ॲमेझॉनसारख्या मातबर जागतिक संस्थेशी असणार आहे – हे लक्षात घ्यायला हवे. जर्मनी, जपान, चीन, इंग्लंड वगैरे देश ॲमेझॉनच्या प्रवेशाला मोठा विरोध होत आहे. ॲमेझॉनची व्यापक वितरण व्यवस्था आपल्या मुळावर उठेल अशी भीती अनेकांना वाटते. जपानमध्ये ऑक्टोबर २०१२मध्ये ॲमेझॉनच्या किंडलने प्रवेश केला. त्यानंतर एका वर्षात ई-बुक्सचे ३८ टक्के आणि सोनीचे मार्केट २५ टक्क्यांवर आले. त्यापुढच्या काळात ॲमेझॉनचा आलेखच वाढत राहणार हे स्पष्ट आहे.

आता ॲमेझॉन प्रकाशन क्षेत्रात आणि स्वयंप्रकाशन क्षेत्रात जोरदार आघाडी घेण्यासाठी जय्यत तयारी करीत आहे. त्यामुळे अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, जपान, चीन, रशिया या सर्वच देशात प्रकाशन व्यवसायाच्या भवितव्याबद्दल चिंतेचे आणि संभ्रमाचे वातावरण आहे.






## ऑटोमेटेड पोर्टेबल बुक रीडर

आपण बोलू ते टाइप करणाऱ्या सॉफ्टवेअरच्याही पुढे जात आपल्याला हवा तो मजकूर, हव्या त्या वेळी आणि हव्या त्या आवाजात वाचून दाखविणारे उपकरण म्हणजे 'ऑटोमेटेड पोर्टेबल बुक रीडर.'

पुण्यातील सिंहगड इंजिनीअरिंग कॉलेजमधून कम्प्युटर इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतलेल्या शरद काळे याने हे बनविले आहे.

या 'बुक रीडर'वर पुस्तक ठेवले असता त्यातील कॅमेरे पुस्तकाच्या पानांचे फोटो काढतात. त्यानंतर 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' तंत्रज्ञान वापरून त्या पानावरील अक्षरांची 'डिजिटल वर्ड फाइल' केली जाते. ती तयार होण्यासाठी २२.१५ सेकंद लागतात. त्यासाठी 'टेक्स्ट टू स्पीच इंजिन' बसविण्यात आले आहे. त्याद्वारे डिजिटल फायलीतील शब्द आवाजबद्ध केले जातात. त्यानंतर आपल्याला पाहिजे त्या वेगात आणि आवाजात आपण ते ऐकू शकतो. यासाठी फक्त त्या यंत्राला त्या विशिष्ट आवाजाचा नमुना द्यावा लागतो. यामध्ये ४० भाषांतील पुस्तकाचे भाषांतर करण्याची सुविधा आहे. त्यामुळे कोणत्याही भाषेतील पुस्तकाचा आनंद घेता येणार आहे. एक पान वाचून झाल्यानंतर पुढच्या पानावर जाण्याचे कामही 'बुक रीडर'च करणार आहे. त्याचे पेटंट घेण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

अनेकांना वाचनाची आवड असते; पण शारीरिक व्याधींमुळे किंवा अन्य काही कारणांमुळे त्यांना वाचन करता येत नाही. दृष्टिहीनांसाठी ब्रेल लिपीत पुस्तके उपलब्ध आहेत; पण त्यांचे प्रमाणही मर्यादित आहे. अपंग किंवा वृद्धांना फार काळ हातामध्ये पुस्तक घेऊन बसणे शक्य नसते. काहींना पुस्तक वाचताना झोप येते. त्यांच्यासाठी हे 'बुक रीडर' उपकरण वरदान ठरेल.

शरद हा नगर जिल्ह्यातील खेड्यातून शिक्षणासाठी पुण्यात आला. २०१३मध्ये इंजिनीअरिंगच्या पदवी परीक्षेत पुणे विद्यापीठात तो प्रथम आला होता.

## सुधा मेनन यांची दोन पुस्तके आता मराठीत

प्रसिद्ध लेखिका सुधा मेनन यांची गाजलेली 'लिडिंग लेडीज : वूमन हू इन्स्पायर इंडिया' आणि 'लिगसी' ही पुस्तके आता महिला दिनाचे औचित्य साधून मराठी आणि हिंदीमध्ये उपलब्ध झालेली आहेत. लिडिंग लेडिज : वूमन हू इन्स्पायर इंडिया हे सुधा मेनन यांचे पहिलेच पुस्तक बेस्टसेलर ठरले असून त्याचा मराठी अनुवाद 'आघाडीचे महिला नेतृत्व' या नावाने मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केला आहे. अनेक कर्तृत्ववान महिलांचा जीवनपट या पुस्तकात उलगडलेला आहे. लिगसी या पुस्तकाचा हिंदी अनुवाद असलेले विरासत रॅन्डम हाऊस इंडिया यांनी प्रकाशित केलेला असून त्यामध्ये ख्यातनाम भारतीय पुरुषांनी आणि महिलांनी आपल्या मुलींना लिहिलेल्या पत्रांचा समावेश आहे.

## तंत्रज्ञानाला बोटांवर नाचवणारा 'फिन'

केरळच्या २३ वर्षीय रोहिदास एन या युवा तंत्रज्ञाने तयार केलेल्या 'फिन' या वेअरेबल डिव्हाइसने हाताच्या तळव्याचा वापर 'गेश्चर इंटरफेस'प्रमाणे करता येईल. या उपकरणासाठी दोन लाख डॉलर्सचा निधी उभारण्याचे उद्दिष्ट मुदतीपूर्वीच पूर्ण झाले. हार्डवेअर व सॉफ्टवेअर यांचा एकत्रित आविष्कार असलेले हे दुसरे भारतीय उपकरण आहे. मागील वर्षी बेंगळुरूमधील तंत्रज्ञांनी 'गेको' हा नाण्याच्या आकाराचा इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस विकसित केला. या गेकोसाठीही १ लाख ३५ हजार डॉलर्सची गुंतवणूक झाली.

'फिन' हा डिव्हाइस अंगठीप्रमाणे हाताच्या अंगठ्यामध्ये परिधान केला म्हणजे तो सेन्सर्सद्वारे तळव्याची अन्य बोटे ओळखतो. त्यानंतर, ब्लुटुथच्या साह्याने फिन हा स्मार्टफोन, टीव्ही व इतर उपकरणांशी जोडला जातो. फिनच्या मदतीने प्रत्येक बोटासाठी विविध फंक्शन्स असाइन करून केवळ अंगठा व संबंधित बोटाच्या स्पर्शातून ही फंक्शन्स पूर्ण केली जाऊ शकतात. यामुळे अडचणीत तातडीने एखादा कॉल करणे, फोन सायलेंट मोडवर ठेवणे, प्ले-लिस्टमधील गाणी बदलणे, प्रत्यक्ष फोन खिशातून बाहेर न

काढता कॉल घेणे इत्यादी कामे करता येतात. फिनच्या मदतीने बोटांचा वापर की-पॅडप्रमाणेही करता येतो. सध्या फिनची किंमत १२० डॉलर ठरली आहे.

कोईम्बतूरमधील काथिर इंजिनीअरिंग कॉलेजमधून २०१२ मध्ये पदवी घेतल्यानंतर रोहिदासने कोचीत आरएचएल व्हिजन टेक्नॉलॉजी ही कंपनी सुरू केली. इंजिनीअरिंगच्या शेवटच्या वर्षाला असताना त्याने 'टचलेस' तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासप्रकल्प तयार केला. हाच प्रकल्प अधिक विकसित करून फिन हा डिव्हाइस तयार केला. युरोपमधील सर्वांत मोठा महोत्सव असलेल्या पायोनियर्स फेस्टिव्हलसाठी मागील वर्षी जगभरातून निवडलेल्या ५० नवीन संकल्पनांमध्ये फिनचा समावेश झाला होता.

## फेसबुकमधून साकारले ग्रंथालय

'शिवाजी ट्रेल' ही संस्था फेसबुकचा वापर करून ग्रंथालये सुरू करीत आहे. या संस्थेने पुणे आणि परिसरातील दुर्गम गाव-शाळांपर्यंत अवांतर वाचनासाठी पुस्तके देण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. मुळशीजवळील भांबर्डे गावातील संपर्क विद्यालयाला २५० पुस्तकांचा संच देण्यात आला.

गेल्या अनेक वर्षांपासून शिवाजी ट्रेल ही संस्था दुर्ग संवर्धनाबरोबर ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्नशील आहे. सावित्री फोरम, डीडी फॅन क्लब आणि दुर्गसंवर्धक महासंघ या संस्थांच्या सहकार्याने चार महिन्यांत अडीचशे पुस्तके जमा करून संपर्क विद्यालयाला दिली. फेसबुक लायब्ररी या उपक्रमांतर्गत एप्रिलमध्ये जुन्नरजवळील खामगावच्या ग्रंथालयाही २५० पुस्तकांचा संच देण्यात येईल.

## ट्रॅक करा ई-मेलचा प्रवास

पूर्वी पत्र, निरोप देऊन होणाऱ्या गोष्टी आता ई-मेलद्वारे होतात. विवाहाची निमंत्रणे, शाळा-सोसायटीमधील बैठका यांची माहितीही ई-मेलद्वारे पोहोचवली जाते. एका व्यक्तीने पाठविलेला ई-मेल अपेक्षित ठिकाणी पोहोचेपर्यंत किती अंतर पार करतो, हे ट्रॅक करणारी सिस्टिम 'जीपीएस'च्या आधारे विकसित करण्यात आली आहे. 'ई-मेल माइल्स' या नावाने हे तंत्रज्ञान ओळखले जाते. यामध्ये जीपीएस आणि इंटरनेट ट्रॅकिंगच्या आधारे ई-मेलच्या प्रवासाचे अंतर ठरविले जाते. डिजिटल युगातील अंतर काढता येते. संशोधक जोना ब्रुकर कोहेन यांनी याबाबत

संशोधन केले आहे.

## भाषा धोरणाचा मसुदा

मराठी भाषेसाठी आगामी २५ वर्षांमध्ये काय करायला हवे, हे ठरविण्याबाबत मराठी भाषा सल्लागार समितीच्या उपसमितीने मसुदा लेखनाचे काम हाती घेतले आहे.

मसुदा लेखन समितीच्या बैठकीला डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, दत्ता भगत, डॉ. माधवी वैद्य, विश्वनाथ शिंदे, हरी नरके, डॉ. विलास खोले आदी उपस्थित होते.

भाषेचा विकास शिक्षणातून होतो. वेगवेगळ्या कारणांमुळे सध्या बंद पडणाऱ्या मराठी शाळांना संरक्षण पुरवण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा, त्यासाठी नियमांमध्ये बदल करावेत, बोलीभाषांचे दस्तऐवजीकरण व्हावे, उत्तमोत्तम ग्रंथांचे अनुवाद करावेत, अशा सूचनाही करण्यात आल्या आहेत.

## 'बीजे' मराठीमय

दिग्गज साहित्यिकांच्या साहित्याचं प्रदर्शन, लोकप्रिय गाण्यांवर धडाकेबाज नृत्ये आणि विद्यार्थ्यांसह अध्यापकांचंही गाण्याचं सादरीकरण, अशा भरगच्च कार्यक्रमांनी बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये 'जागतिक मराठी दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

'ऐवज आठवणींचा' या कार्यक्रमात जुन्यानव्या कवितांचे सादरीकरण आणि मराठी पुस्तकांचं प्रदर्शन भरविण्यात आलं होतं.

'मृदगंध' आणि 'रसयात्रा' या कार्यक्रमांत प्रमुख पाहुणे आणि विशेष अतिथी म्हणून डॉ. अनिल अवचट आणि डॉ. जगदीश हिरेमठ उपस्थित होते. डॉ. अवचटांनी त्यांच्या भाषणांतून कॉलेजमधील आठवणींना उजाळा दिला. डॉ. हिरेमठ यांनी 'मध्यमिका' या विषयातून आयुष्यात नेहमी मधला मार्ग निवडून कामांची सांगड घालावी, असे सांगितले.

कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले यांनी 'ऐवज आठवणींचा' आणि 'झंकार' या नवीन उपक्रमांचे कौतुक केले.

## सोहळा मराठमोळा'

''मराठी भाषा समृद्ध, अभिजात, संवेदनशील व्हावी यासाठी शैक्षणिक संस्था व कुटुंबांच्या माध्यमातून प्रयत्न झाले पाहिजेत,'' असे मत चित्रपट

अभिनेते गिरीश कुलकर्णी यांनी 'मराठी हितवर्धिनी'तर्फे झालेल्या 'सोहळा मराठमोळा' या कार्यक्रमात व्यक्त केले.

माजी आमदार उल्हास पवार, अनिल गोरे, 'हितवर्धिनी'चे अध्यक्ष सौमित्र वीरकर आदी उपस्थित होते.

कुलकर्णी म्हणाले, ''मराठी भाषेच्या विकासासाठी पोषक वातावरण तयार केले पाहिजे. दैनंदिन व्यवहारात बोलताना इंग्रजी शब्दांचा वापर टाळला पाहिजे. तसेच, प्रशासकीय कार्यालये, बँका, विविध संस्थांमधील व्यवहार मराठीत झाले पाहिजेत. तरच भाषेचे संवर्धन होण्यास हातभार लागेल. मराठी भाषा व्यक्तीची भौतिक गरज बनली तरच तिचा प्रसार होईल.''

अनिल गोरे म्हणाले, ''सध्या पालकही आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत घालण्यास आग्रही असतात; त्यामुळे मराठी शाळेत मुलांचे प्रवेश कमी होत आहेत. मराठी भाषा टिकवायची असेल तर मराठी भाषा वापरण्याचा आग्रह धरला पाहिजे. तसेच, भाषेच्या संवर्धनासाठी स्वत:पासूनच सुरुवात केली पाहिजे.''

उल्हास पवार म्हणाले, ''मराठी माणसाने मराठी भाषेबद्दल असणारा न्यूनगंड काढून टाकला पाहिजे. भाषेचे संवर्धन करण्यासाठी मराठी शाळेत मुलांचा प्रवेश घेण्यास पालकांनी प्राधान्य दिले पाहिजे.''

## सांस्कृतिक संचालनालयाची स्वतंत्र वेबसाइट

राज्य सरकारच्या सांस्कृतिक योजनांची माहिती घेण्यासाठी कलावंतांना आता पायपीट करावी लागणार नाही. सांस्कृतिक संचालनालयाने स्वतंत्र वेबसाइटची निर्मिती केली असून, सर्व योजनांची माहिती, सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन यांची माहिती केवळ एका क्लिकवर मिळणार आहे.

महाराष्ट्रात शास्त्रीय गायन, सुगम संगीत, विविध नृत्यप्रकार, नानाविध वाद्ये, तमाशा, लावणी, दशावतार, खडी गंमत असे प्रचंड प्रमाणावर सांस्कृतिक वैविध्य आढळते. हे वैभव जगभरात पोहोचविण्यासाठीच वेबसाइटची निर्मिती करण्यात आली आहे. प्रादेशिक बंधनातील लोककला मुक्त करून सर्वत्र पोहोचविण्यासाठी फोटो, व्हिडीओद्वारे कला आणि कलावंत, सांस्कृतिक संचालनालयाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या योजना, पुरस्कार यांची माहिती या वेबसाइटवर संकलित करण्यात आली आहे.

‘अत्याधुनिक काळात वेगवान माध्यमांचा वापर करण्यासाठी या वेबसाइटची निर्मिती करण्यात आली. सांस्कृतिक संचालनालयाची वेबसाइट महाराष्ट्र सरकारच्या वेबसाइटशी संलग्न आहे. मात्र, खास या विभागाची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे,’ असे सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक आशुतोष घोरपडे यांनी सांगितले.

अनेक कलावंतांची सरकार-दरबारी नोंदणी होत नाही. परिणामी, त्यांना सरकारी योजना-पुरस्कारांपासून वंचित राहावे लागते. आता ही तक्रार दूर होणार असून, सांस्कृतिक संचालनालयाच्या नव्या संकेतस्थळावर कलावंतांना नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यात कलाकाराला फोटो, व्हिडीओ अपलोड करून स्वत:विषयी माहिती भरता येईल; त्यामुळे राज्यभरातील कला, कलाकारांचे डॉक्युमेंटेशन होणार आहे. नव्या पिढीतील कलाकारांची माहिती सरकारदरबारी संग्रहित होणार आहे.

## मूर्ती क्लासिक्स

चार वर्षांपूर्वी हॉर्वर्ड युनिव्हर्सिटीला इन्फोसिसचे संस्थापक के. नारायण मूर्ती यांनी ५२ लाख डॉलर्सची देणगी देऊन भारतीय भाषांतील उत्तमोत्तम अभिजात साहित्यकृतींचे इंग्रजी अनुवाद उपलब्ध करण्यासाठी ‘मूर्ती क्लासिक्स’ लायब्ररीची स्थापना केली. के. नारायण मूर्ती यांचे सुपुत्र रोहन मूर्ती यांच्या आग्रहामुळे या प्रकल्पाला मूर्त रूप प्राप्त झाले. सूरदास, अबुल फजल वगैरे लेखकांच्या पहिल्या पाच पुस्तकांचा संच लवकरच विक्रीसाठी उपलब्ध होत आहे.

हॉर्वर्डने यापूर्वी लोएब क्लासिकल लायब्ररी या प्रकल्पाद्वारे ग्रीक आणि लॅटिन भाषांतील ५२५ पुस्तकांची मालिका प्रकाशित केली होती. त्या प्रकल्पासाठी जेम्स लोएब यांनी निधी मिळवून दिला होता. आपण हॅम्लेटचा आनंद घेतो, तसाच आपल्या कालिदास वगैरे अभिजात लेखकांच्या भारतीय भाषांतील ग्रंथांचा आस्वाद जागतिक पातळीवर वाचकांना घेता यावा यासाठी हा प्रकल्प आहे.

## स्वामी सहजानंद यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

‘आध्यात्मिक माणसाने अकारण आनंद मिळविण्यासाठी स्वार्थी व्हावे. आनंदाने भरून गेल्यानंतर तोच आनंद भोवतालच्या लोकांनाही मिळू

लागेल,' असे विचार स्वामी सहजानंद यांनी व्यक्त केले. सहजानंद प्रतिष्ठानतर्फे त्यांनी लिहिलेल्या सहजगीता आणि सहजनीती या पुस्तकांचे प्रकाशन प्रा. डॉ. दत्तात्रय तापकीर आणि योगशिक्षिका तृप्ती झोळ यांच्या हस्ते झाले. माधुरी पोतनीस, डॉ. राजेंद्र भवाळकर, साहित्यिक बिपीन सांगळे, सम्राट नाईक, मैत्रेयी काटे, प्रीतल सोडमिशे आदी या वेळी उपस्थित होते. पल्लवी पेशवे यांनी सूत्रसंचालन केले.

## दुर्गसंवर्धन आणि शिवाजी ट्रेल

'शिवाजी ट्रेल' आणि 'दुर्गसंवर्धक महासंघा'कडून किल्ल्यांच्या संवर्धनासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांची पाहणी करण्यासाठी आणि शिवप्रेमींना प्रोत्साहन देण्यासाठी अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांनी चावंड गडाची पाहणी केली. 'शिवाजी ट्रेल'चे विनायक खोत, विजय कोल्हे, प्रभाकर कर्पे, मारुती जाधव, यशवंत मस्करे आदी यावेळी उपस्थित होते.

'शिवपुत्र शंभुराजे' या महानाट्याच्या माध्यमातून 'दुर्गसंवर्धक महासंघा'साठी सुमारे १० लाख रुपयांचा निधी संकलित करण्यात डॉ. कोल्हे यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे; त्यामुळे संस्थेच्या माध्यमातून झालेली दुर्गसंवर्धनाची कामे पाहाण्यासाठी चावंड किल्ल्यावर आलेल्या डॉ. कोल्हे यांनी प्रस्तरारोहण करून अनेकांचे लक्ष वेधून घेतले. महानाट्याच्या माध्यमातून प्रेक्षकांमधून घोडेस्वारी करत रंगमंचावर एन्ट्री घेणारे डॉ. कोल्हे प्रत्यक्ष गिरीशिखरांना साद घालताना पाहायला मिळाले. चावंड ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे गडावर स्वागत करण्यात आले. किल्ल्यावरील चावंडाई देवीची महापूजा, तसेच ध्वजारोहण त्यांच्या हस्ते करण्यात आले.

जुन्नर वनविभागाच्या वतीने या किल्ल्यावरील पायऱ्यांची दुरुस्ती तसेच रेलिंगसाठी महत्त्वपूर्ण योगदान देण्यात आले. त्याबद्दल डॉ. कोल्हे यांनी समाधान व्यक्त केले. पुण्यातील मॉडर्न कॉलेज आणि पुणे विद्यापीठाच्या एनएसएस विभागाच्या विद्यार्थ्यांचे निवासी शिबिर गडावर सुरू आहे. या शिबिरालाही डॉ. कोल्हे यांनी भेट दिली.

## 'नोबेल' मिळविण्यासाठी चिकित्साधिष्ठित शिक्षण हवे

देशाला विज्ञानात पुन्हा 'नोबेल' मिळवायचे असेल, तर विद्यार्थिकेंद्रित शिक्षणपद्धती, जिज्ञासू वृत्तीला चालना देणारे चिकित्साधिष्ठित शिक्षण हवे.

प्रचलित विज्ञानाबाबत अंधश्रद्धा न बाळगता विद्यार्थ्यांनी  बंडखोरी करावी, असे आवाहन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले. आत्मविश्वास, आत्मनिर्भरता आणि अखंड परिश्रम, ही यशाची त्रिसूत्री असल्याचे ते म्हणाले.

रयत शिक्षण संस्थेच्या रावबहादूर नारायणराव  बोरावके महाविद्यालयात दुसऱ्या रयत विज्ञान परिषदेचे उद्‌घाटन डॉ. माशेलकर यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले, ''बाराव्या शतकात विश्वबंधुत्व आणि समानतेचा संदेश ज्ञानेश्वरांनी दिला. आता 'ग्लोबल व्हिलेज'ची संकल्पना वास्तवात उतरते आहे. एकविसावे शतक ज्ञानाचे, मनाचे आणि बुद्धीचे आहे. मराठी माणसाने या शतकाचे नेतृत्व करावे.''

डॉ. सी. व्ही. रमण यांची थोरवी सांगताना डॉ. माशेलकर म्हणाले, ''पारतंत्र्यात असलेल्या देशात राहून इंग्लंड-अमेरिकेच्या शास्त्रज्ञांपेक्षा पुढे जाण्याचे कर्तृत्व त्यांनी दाखविले. साधनांपेक्षा बुद्धीची ताकद महत्त्वाची असते. रमण यांनी देशातच राहून 'नोबेल' जिंकले.''

## 'आयएनएस'चा अमृतमहोत्सवी सोहळा

''नफा वाढविण्यासाठी काही माध्यम संस्था 'पेड न्यूज' किंवा मार्केटिंगच्या इतर प्रकारांचा अवलंब करीत आहेत. हा प्रकार अतिशय दु:खद आहे. ही अपप्रवृत्ती रोखण्यासाठी प्रसारमाध्यमांनी आत्मपरीक्षण करावे,'' अशा शब्दांत राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी वृत्तपत्रांना जबाबदारीची जाणीव करून दिली. भारतातील वृत्तपत्रांची प्रतिनिधी संस्था असलेल्या 'इंडियन न्यूजपेपर सोसायटी'च्या (आयएनएस) अमृतमहोत्सवानिमित्त झालेल्या सोहळ्यात मुखर्जी बोलत होते.

'आयएनएस'चे अध्यक्ष रवींद्रकुमार यांच्यासह संचालक मंडळ, पदाधिकारी, सदस्य या कार्यक्रमास उपस्थित होते. 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार हेही उपस्थित होते. मुखर्जी म्हणाले, 'आयएनएस'च्या सदस्यांनी समाजाला वेगवेगळी माहिती पोचवून अद्ययावत केले. राष्ट्राच्या प्रगतीच्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा घडवून  आणली.

## यू-ट्यूबवर हिट कल्ला

यू-ट्यूबचे लाखो फॅन जगभरात आहेत. या चाहत्यांसाठीचा भारतातला 'यू-ट्यूब फॅन फेस्ट' मुंबईत नुकताच पार पडला. या फेस्टिव्हलला यू-

ट्यूबच्या चाहत्यांनी एकच गर्दी केली होती. अशा प्रकारचा फेस्ट गेल्या वर्षी सिंगापूरमध्ये झाला होता. यू-ट्यूबवरील आपले आवडते म्युझिशिअन्स, कॉमेडिअन्स किंवा फॅशन आयकॉन प्रत्यक्षात परफॉर्म करताना पाहायला मिळतील, या अपेक्षेनं तरुण-तरुणी मोठ्या प्रमाणावर इथं आले होते. आजच्या तरुणाईला यू-ट्यूबवर नक्की काय बघायला आवडतं? याचं उत्तर इथं मिळालं. निऑन रिंग्ज आणि एलईडी चश्मे इथं ठेवण्यात आले होते. त्यातून फेस्टचा आस्वाद घेताना मुलं दिसत होती. मजा-मस्ती, धमालवाले व्हिडीओ, बाथरूम व्हिडीओ, म्युझिक कोलॅब्रेशन व्हिडीओ, कॉमेडी व्हिडीओ या गोष्टी त्यांच्या सर्वाधिक पसंतीच्या असल्याचं यातून दिसून आलं.

या फेस्टचं वैशिष्ट्य म्हणजे जगभरातले सर्वाधिक प्रसिद्ध असलेले दहा चॅनल्सवरील कलाकार चाहत्यांसाठी इथं एकत्र आले होते. वास्क्यू, बिथनी मोटा, लिली सिंग, श्रद्धा शर्मा यांचा यात समावेश होता. ऑल इंडिया बॅकछोड या ग्रुपनं गाणी म्हणून चाहत्यांचं मनोरंजन केलं. 'माटी बनी' या ग्रुपनंदेखील दोन सुंदर गाणी सादर केली. यू-ट्यूब फॅन फेस्टच्या निमित्तानं श्रद्धानं आपला पहिलावहिला अल्बम 'रास्ते' इथं लाँच केला. यू-ट्यूब फॅन फेस्टला आलेली एक कलाकार म्हणजे लिली सिंग. तिची एंट्री होताच तरुणाइनं थेट स्टेजवर धाव घेतली. चाहत्यांनी मोठ्या उत्साहात लिलीचं स्वागत केलं. लिलीनंही चाहत्यांशी संवाद साधला तसंच काही चाहत्यांसोबत डान्सही केला.

## विद्याधर अनास्कर यांचा सत्कार

नॅशनल फेडरेशन फॉर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स अँड क्रेडिट सोसायटीज (नॅफकॅब) या शिखर संस्थेवर उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विद्याधर अनास्कर यांचा पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष विजय ढेरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## 'सिम्बायोसिस' मध्ये अमिताभ

जगण्यातील मूल्यांविषयी प्रगल्भ विचार मांडत विद्यार्थ्यांचा घेतलेला वर्ग... विद्यार्थ्यांच्या मागणीवरून केलेले 'मधुशाला', 'अग्निपथ' या कवितांचे सादरीकरण... आठवणी आणि किस्से... वयाच्या सत्तरीतही तरुणाला लाजवणाऱ्या उत्साहाचा आणि स्टारडमचा अनुभव ज्येष्ठ अभिनेते

अमिताभ बच्चन यांनी दिला.

सिम्बायोसिस अभिमत विद्यापीठाच्या लवळे येथील कॅम्पसमध्ये बच्चन यांनी 'फेस्टिव्हल ऑफ थिंकर्स' या विषयावर विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला. मॅनेजमेंट स्कूलच्या सिनेमा रिवाइंड २०१४ या महोत्सवातील लघुपट पाहून विजेत्या लघुपटाचे पारितोषिक दिले. तसेच फोटोग्राफी विभागाच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या फोटोंच्या प्रदर्शनाचे उद्घाटनही त्यांनी केले. सिम्बायोसिसच्या संचालिका डॉ. विद्या येरवडेकर, चंदन चॅटर्जी, अनुपम सिद्धार्थ, डॉ. रजनी गुप्ता आदी या वेळी उपस्थित होते.

वेल्वेटचा बंद गळ्याचा कोट घातलेल्या बच्चन यांनी विद्यार्थ्यांची खच्चून गर्दी असलेल्या सभागृहात प्रवेश करताच एकच कल्ला झाला. विद्यार्थ्यांच्या उत्साहाला दाद देत बच्चन यांनी नम्रतेने नमस्कार करून विद्यार्थ्यांची जल्लोषपूर्ण मानवंदना स्वीकारली. त्यानंतर स्वयंशिस्त, प्रतिष्ठा, प्रेम ही जीवनावश्यक मूल्ये असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांचा वर्ग घेतला. 'जीवनामध्ये प्रत्येकाला स्वबळावर प्रतिष्ठा मिळवावी लागते. अडचणींवर मार्ग काढण्याची स्वयंशिस्त विद्यार्थीदशेतच लावून घेतली पाहिजे. स्वत:वर आणि इतरांवर प्रेम करायला शिकले पाहिजे. स्वत:तील गुण ओळखल्यावरच इतरांचे गुण कळतात. इतरांचे गुण कळल्यावरच समाज कळतो,' असे त्यांनी सांगितले.

बच्चन यांच्या मते –

- ❋ शिक्षण हा प्रत्येक बालकाचा अधिकार
- ❋ व्यवहारज्ञान आणि अनुभव यांनीच व्यक्तिमत्त्व विकास घडतो.
- ❋ माणसाला कायम शिक्षणाची भूक असली पाहिजे.
- ❋ देश पूर्ण साक्षर झाल्यावरच खऱ्या अर्थाने आर्थिक आणि सामाजिक विकास

''जीवनात यशस्वी होण्यासाठी व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य द्यायलाच हवे. त्याबरोबरच सामाजिक आणि वैयक्तिक आयुष्यात जोपासल्या जाणाऱ्या जीवनमूल्यांवरच व्यक्तीची प्रतिष्ठा ठरते,'' अशा शब्दांत चित्रपटसृष्टीतील 'शहेनशहा' अभिनेते अमिताभ बच्चन यांनी युवावर्गाला यशाचा मूलमंत्र दिला. 'जीवनातील प्रत्येक दिवस हा संघर्षाचा असतो. जोपर्यंत जीवन आहे, तोपर्यंत संघर्ष अटळ आहे; त्यामुळे संघर्षाला सामोरे

जाण्यासाठी तयार राहा,' अशा शब्दांत त्यांनी युवकांना सज्ज राहाण्यास सांगितले.

बच्चन म्हणाले, ''आमच्या काळात पदवी मिळविण्यातच समाधान मानले जात असे. परंतु, आता अनेक ज्ञानशाखा खुल्या आहेत. अर्थव्यवस्थेत बौद्धिक गुणवत्तेलाच महत्त्व आहे. त्यासाठी महाविद्यालयीन शिक्षण पुरेसे नसून, अन्य ज्ञानशाखांच्या वाटा विद्यार्थ्यांनी शोधायला हव्यात.'' या प्रसंगी 'मधुशाला', 'अग्निपथ' संग्रहातील कविता आणि चित्रपटांतील काही संवाद म्हणत बच्चन यांनी रसिकांची फर्माईश पूर्ण केली.

प्रश्नोत्तरादरम्यान, 'सर मला तुमच्यासोबत फोटो काढता येईल का,' असा थेट प्रश्न एका विद्यार्थ्याने विचारला. त्यावर अमिताभ यांनी व्यासपीठाच्या पुढच्या बाजूला येऊन त्या चाहत्याला बोलावले आणि क्षणार्धात 'झकास' फोटोही दिला. फोटो मिळाल्यानंतर मात्र त्या विद्यार्थ्याचे डोळे पाणावले.

## हेमा लेले यांच्या २१ पुस्तकांचे प्रकाशन

कवयित्री आणि लेखिका हेमा लेले यांच्या २१ पुस्तकांचा एकत्रित प्रकाशन सोहळा 'सृजनरंग' या संगीत-नृत्य आविष्काराच्या जोडीने रंगला. सुरभी कल्चरल ॲकॅडमी, पुणेतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे, समीक्षक शंकर सारडा, संगीतकार आनंद मोडक आणि रंगकर्मी शुभांगी दामले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

'विचारांच्या निर्झराकाठी' हे ई-बुक आणि ललित लेखसंग्रह, तर 'अरे संस्कार संस्कार' या लेले यांच्या मराठी पुस्तकमालिकेतील १५ पुस्तकांचा 'कल्चर इन कॅप्सुल' हा इंग्रजी अनुवादही या वेळी प्रकाशित करण्यात आला. पौर्णिमा मनोहर, अंजली कुलकर्णी, शुभंकर अत्रे आणि सुरभी संस्थेच्या नृत्यांगनांनी सादर केलेला संगीत-नृत्य कार्यक्रमही चांगलाच रंगला. पौर्णिमा मनोहर आणि स्वरूपा खोपकर यांनी हेमा लेलेंच्या पुस्तकातील 'महुचा हाट' आणि 'सखी आली नाही' या दोन गोष्टींचं वाचन केलं. राजेश दामले यांनी कार्यक्रमाचं सूत्रसंचालन केलं.

शंकर सारडा आणि आनंद मोडक यांनी या वेळी हेमा लेले यांच्या कार्याचे विविध पैलू प्रकट केले. डॉ. आगाशे यांनीही लेलेंच्या कार्यक्षमतेचे

आणि चिकाटीचे या वेळी कौतुक केलं.

'२१ पुस्तकांचं एकत्रित प्रकाशन, हे कुठलाही विक्रम प्रस्थापित करण्यासाठी नव्हे, तर वाचकांचं प्रेम मिळविण्यासाठी केलं,' असे उद्गार या वेळी लेले यांनी काढले.

## अमिताभ बच्चन यांना 'पुणे पंडित अॅवॉर्ड' प्रदान

द आर्ट अॅण्ड म्युझिक फाउंडेशनचा 'पुणे पंडित अॅवॉर्ड' ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांना संस्थेचे प्रमुख अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते नुकताच देण्यात आला. या वेळी अमिताभ यांची एक झलक पाहाण्यासाठी रसिकांनी गर्दी केली.

गडद चॉकलेटी रंगाचा गळाबंद कोट, काळी पॅन्ट, चकाकणारा बूट, नेहमीची फ्रेंच कट, डोळ्यांवर काळ्या फ्रेमचा चष्मा, कपाळावर लहानसा लाल टिळा... असं रुबाबदार, प्रचंड उत्साही व्यक्तिमत्त्व व्यासपीठावर येताच टाळ्यांचा कडकडाट झाला. थोडसं झुकून नमस्कार करीत अमिताभ यांनी चाहत्यांबद्दल आदर व्यक्त केला. ते म्हणाले, 'कुली' चित्रपटाच्या चित्रीकरणावेळी मला अपघात झाला. मी मृत्युशय्येवर होतो. चुकून माझ्या निधनाची घोषणाही झाली; पण मला जगण्याचे बळ मिळाले, पुन्हा उभं राहाता आलं ते रसिकांच्या प्रेमामुळं, प्रार्थनेमुळंच अशी माझी भावना आहे. हे प्रेम, माझ्यावर आणि कुटुंबावर कायम राहील, असा विश्वास आहे.

माझं कोणतंही लक्ष्य नाही; पण स्वत:मध्ये असलेल्या क्षमतांचा मी नेहमी विचार करतो. त्याचा योग्य वापर करणं आणि नसलेल्या क्षमता विकसित करणं यावर भर देतो, असंही ते म्हणाले.

## सात लेखिकांच्या साहित्याचा चित्रपट महोत्सव

जागतिक महिला दिनानिमित्त 'आयाम क्रिएशन', आशय फिल्म क्लब व राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय यांनी 'आंतरराष्ट्रीय महिला चित्रपट महोत्सव' आयोजित केला होता. लेखिका सानिया यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. या वेळी अभिनेत्री तनुजा, अभिनेते नितीश भारद्वाज, दिग्दर्शिका अरुणा राजे व अभिनेत्री उषा जाधव उपस्थित होते.

'जागतिक पातळीवरील लेखिकांच्या अभिजात साहित्यकृतींवर आधारित चित्रपट' हा महोत्सवाचा विषय होता. अमेरिकी लेखिका मार्गारेट मिशेल ते भारतीय लेखिका सुधा मूर्ती अशा एकूण सात लेखिकांच्या

साहित्याचा पडद्यावरील आविष्कार महोत्सवातून रसिकांपुढे उलगडला गेला.

सानिया यांच्या निवडक कथांच्या 'संपादित सानिया' या पुस्तकाचे प्रकाशनही झाले. 'चित्रपट दिग्दर्शिका' या विषयाच्या अभ्यासक ईशा नियोगी यांचे 'भारत-पाकिस्तान आणि बांगलादेशमधील चित्रपट दिग्दर्शिका' या विषयावर व्याख्यान झाले.

## मुलांसाठी सॉफ्टवेअर

मुलांनादेखील कम्प्युटरवर वापरता येतील असे सॉफ्टवेअर आणि सर्व्हिस उपलब्ध आहे.

स्क्रॅच : एमआयटी मीडिया लॅबने मुलांसाठी व्हिज्युअल प्रोग्रॅमिंगची लँग्वेज विकसित केली आहे. आठ वर्षांच्या पुढील मुलांना याचा वापर करता येऊ शकतो. मुलांना कम्प्युटर प्रोग्रॅममधील कोडिंग संकल्पना काय असते, हे यातून कळते. यावर साइनअप केल्यावर मुलांच्या सर्जनशीलतेमधून निर्माण झालेली गोष्ट वेबसाइटवर होस्ट करता येऊ शकते; तसेच अन्य लोकांनी काय पोस्ट केले आहे, हेदेखील पाहाता येऊ शकते. यासाठी 'सी इनसाइड' हा पर्याय देण्यात आला आहे. मुलांमध्ये वैचारिकता वाढविण्यासाठी 'स्क्रॅच' हे टूल चांगले आहे. याची मार्गदर्शक पुस्तिका पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहे.

## रॅपिडटायपिंग ५

योग्य पद्धतीने टायपिंग करण्याचे कौशल्य जमणे आवश्यक आहे. रॅपिडटायपिंग हे विनाशुल्क उपलब्ध असणारे सॉफ्टवेअर आहे. की-बोर्डवर टायपिंग करताना बोटे कशी ठेवली पाहिजेत, मूलभूत 'की' कोणत्या आहेत, यापासून सुरुवात केली जाते आणि त्यानंतर विशेष आणि क्रमांकाच्या 'की'चा वापर कसा करायचा, याविषयी शिकविले जाते. प्राथमिक शिक्षण झाल्यावर मुलांना प्रति मिनिटाला शब्द अधिक वेगाने कसा टाइप करता येऊ शकतो, यावर लक्ष केंद्रित केले जाते. हे सॉफ्टवेअर विनाशुल्क उपलब्ध असून, यात 'की' बोर्ड शिकण्याचे टप्पे आहेत. टायपिंगचा प्रत्येक सराव झाल्यावर वेग, अक्षरे, शब्दसंख्या आणि झालेल्या चुका यांच्याबरोबर ग्राफिक स्वरूपात प्रगती कशी झाली आहे, हे स्पष्ट केले जाते.

लेगो डिजिटल डिझायनर ४.३ : लहानपणी मेकॅनो, बिल्डिंग ब्लॉक्स हे बहुधा प्रत्येकजणच खेळत असेल. यामुळे हात आणि दृष्टीचा ताळमेळ सुधारणे, मोटर कौशल्य आणि विचारशक्तीला चालना मिळते. लेगो डिजिटल डिझायनरमुळे हेच साध्य होते. मात्र, यासाठी कम्प्युटरचा वापर केला जातो. माउसचा वापर अधिक चांगला कसा करायचा, आभासी भिंत बांधणी करता येते. यामुळे सर्जनशीलतेला चालना मिळण्याबरोबर वेगळा विषय पुढे येतो. मर्यादित साहित्यामध्ये त्यांना हवे ते बांधण्याचे कौशल्य यातून पणाला लागते; त्यामुळे सर्जनशीलता वाढते.

## महात्मा गांधी 'कॉमन' माणसांची गरज

''हे जग ज्ञान, विकास, समृद्धीनं भरलेलं आहे, तसं युद्धानंही भरलेलं आहे. हे युद्ध दोन धर्मांत, दोन प्रदेशांत, दोन माणसांत आणि दोन मनांतही सुरू आहे. अशा युद्धजन्य परिस्थितीत माणूस म्हणून जगायचं असेल तर महात्मा गांधी यांचे विचार स्वीकारायला हवेत. ते कोणा पुढाऱ्यांची गरज यापेक्षाही 'कॉमन' माणसांची गरज आहेत; त्यामुळेच गांधी कायम जिवंत राहातील,'' असे मत उत्तम कांबळे यांनी व्यक्त केले.

एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशन आणि नानासाहेब गोरे अकादमीच्या सतराव्या गांधी विचार व्याख्यानात कांबळे यांनी 'जागतिकीकरण आणि महात्मा गांधी' या विषयावर संवाद साधला. तरुणाईच्या उपस्थितीने सभागृह तुडुंब भरले होते. फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. जी. जी. पारिख, कोषाध्यक्ष अभय जोशी, सचिव प्रा. सुभाष वारे या वेळी उपस्थित होते.

कांबळे म्हणाले, ''मानव जात सुरक्षित राहावी म्हणून जगभरातले लोक गांधी विचाराकडं वळले आहेत आणि आपणच या विचारापासून दूर जात आहोत. तुच्छतेनं, दुर्लक्ष केल्यानं गांधी विचार संपणारा नाही किंवा बंदुकीच्या गोळीनं गांधी मरणार नाहीत; संपणार नाहीत. गांधी कुठल्या शरीरात जगत नव्हते, ते तर विचारात जगत होते. गांधींच्या तत्त्वज्ञानाचा मूळ गाभा सामान्य माणूस हाच होता. त्यांचे सगळे प्रयोग हेही माणसांवरचे होते. हे प्रयोग थेट माणसाला भिडून करायचे होते. कारण हा माणूसच त्यांना उद्याच्या स्वातंत्र्याच्या लढाईसाठी तयार करायचा होता. या लढाईतलं शस्त्र सामान्य माणसांची इच्छाशक्ती हे होतं. असे गांधी समजून घेणं खरोखरीचं अवघड आहे; पण ती वाट प्रत्येकानं अनुभवायला हवी.''


**नवे कोरे**

# माफिया क्वीन्स ऑफ मुंबई

मूळ लेखक
एस.हुसेन झैदी
आणि
जेन बोर्जस

अनुवाद
उल्का राऊत

**किंमत : २२०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




दाऊद इब्राहिम, करीम लाला, हाजी मस्तान यासारख्या मुंबईतील माफियांवर नियतकालिकं, वृत्तपत्र अशा माध्यमातून अभ्यासपूर्ण लिहिलं गेलं आहे. चित्रपटांमध्ये त्यांच्या व्यक्तिरेखाही रंगवल्या गेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे तपशील, त्यांचे तथाकथित व्यवसाय यांविषयी बरीच माहिती सहज उपलब्ध होऊ शकते परंतु काही स्त्रिया देखील मुंबईच्या याच गुन्हेगारी विश्वाचा हिस्सा आहेत. ही गोष्ट फारशी ज्ञात नाही. अंडरवल्डच्या भाई आणि दादा लोकांच्या खांद्याला खांदा लावून, तर कधी मार्गदर्शन करून आणि पडद्यामागून सूत्रं हलवून या स्त्रियांनी अंडरवर्ल्डचे काही अवैध धंदे चालवण्यास मदत केली. या पुस्तकात प्रथमच अशा स्त्रियांच्या जीवनाचा मागोवा घेण्यात आला आहे; आख्यायिका बनलेल्या या स्त्रियांच्या जीवनकहाण्या सांगितल्या आहेत. मुंबईच्या अंडरवर्ल्डची यापूर्वी कधीच उजेडात न आलेली बाजू अत्यंत चित्तवेधक शैलीत, सखोल संशोधन करून या पुस्तकात मांडली आहे.

डॉ. पारिख म्हणाले, ‘‘गरिबांना लुटण्यासाठी जागतिकीकरण तयार झाले आहे. त्याला विरोध होण्यासाठी गांधी विचारच आपल्याला बळ देईल.’’

‘‘बाईला प्रतिष्ठा द्यायची असेल तर प्रथम आपण तिच्यातली आई पाहायला हवी. तिला आई मानायला हवं, तरच बाईचं ‘जळणं’ कमी होईल; पण हल्ली समाज बाईचं रूपांतर वस्तूत करायला निघाला आहे, याची खंत वाटते. महात्मा गांधींनी आपल्या पत्नीलासुद्धा आईचा दर्जा दिला होता. म्हणूनच कस्तुर या नावापुढे ‘बा’ हा शब्द आला.’’ असंही कांबळे यांनी सांगितलं.

## ‘सकाळ नाट्य वाचन’

‘‘संगीत नाटकांच्या सादरीकरणावर मर्यादा आहेत. मात्र, त्यातील अवघड पदे, महत्त्वाचे प्रसंग वगळणे किंवा अर्थ न जाणता अयोग्य मांडणी करणे, ही बाब मारक आहे. बदल जरूर स्वीकारावेत, परंतु त्याचवेळी संगीत नाटकांमधील शब्द, साहित्य आणि संगीत या गुणांचा आत्मा हरवता कामा नये,’’ अशी अपेक्षा गायिका व अभिनेत्री कीर्ती शिलेदार यांनी व्यक्त केली.

‘सकाळ नाट्य वाचन’ स्पर्धेच्या निमित्ताने शिलेदार यांनी संगीत नाटक, त्याचे बदलते स्वरूप, प्रेक्षक व सरकारची संगीत नाटकांकडे पाहाण्याची दृष्टी याविषयी विचार व्यक्त केले. ‘‘स्वत:ला जेवढे येते, तेवढे सादर करायचे... किंवा संगीत नाटकाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या गोष्टींनाच नेमका फाटा द्यायचा, असे प्रकार सध्या काही कलाकारांकडून सुरू आहेत.’’ अशा शब्दांत शिलेदार यांनी टीका केली. त्या म्हणाल्या, ‘‘सुफी संगीतातही नवे प्रयोग झाले. नवी वाद्ये आली. मात्र, नवे प्रयोग करतानाच त्या संगीताचा मूळ आत्मा सुफी कलाकारांनी हरवू दिला नाही. नवे काही करताना त्यामध्ये आपण स्वत्व गमावून बसत आहोत, याचे भानच आपल्याला राहिलेले नाही. खरी कला प्रेक्षकांपर्यंत पोचविणाऱ्या दूरदर्शनपेक्षा दूरचित्रवाहिन्यांवरील अर्थहीन ‘रिॲलिटी शो’ आपण बघतो. पाश्चात्य देशांमधील कार्यक्रमांची आपल्याकडे अक्षरश: ‘कॉपी’ केली जाते. कलेच्या या दुरवस्थेला केवळ स्वत:ला ‘संगीततज्ज्ञ’ म्हणविणारेच जबाबदार आहेत.’’

राज्य सरकार अनुदान देते. मात्र, त्यातील अटी जाचक आहेत.

सरकारच्या योजना, सोई-सुविधा रंगकर्मीपेक्षा इतरांकडूनच लाटल्या जातात, असे त्यांनी सांगितले. ''नाटकवाल्यांना मिळणाऱ्या योजनांचा इतरांकडूनच गैरफायदा घेतला जातो. सध्याच्या सरकारपेक्षा पूर्वीच्या संस्थानिकांचा राजाश्रय मोलाचा म्हणावा, अशी आताची वेळ आहे. नाटकांसाठी असलेल्या सरकारी संस्था प्रादेशिक वादाभोवतीच घुटमळत आहेत.''

संगीत नाट्य क्षेत्रातील जुन्या कलाकारांच्या ध्वनिमुद्रिका, व्हिडीओ गोळा करून त्याचे एकत्रीकरण करण्याचे काम सुरू आहे. तसेच तरुण कलाकारांना बरोबर घेऊन पुन्हा एकदा 'संगीत सौभद्र' या नाटकाचे सादरीकरण करणार असल्याचे कीर्ती शिलेदार यांनी आवर्जून सांगितले.

## गदिमांची गीते

महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मीकी गजानन दिगंबर माडगुळकर यांच्या अलौकिक काव्यप्रतिभेचा आनंद संगीतप्रेमींना पुन्हा मनसोक्त अनुभवता येणार आहे. गदिमांच्या सुमारे दोन हजारपेक्षा जास्त रचनांचं 'मेगा कलेक्शन' एमपीथ्रीच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. सध्या सातशे गाण्यांचं डिजिटलायझेशन करण्यात आलं आहे.

गदिमांच्या नावाची आजही साहित्य, संगीतप्रेमींच्या मनावरील मोहिनी कायम आहे. गदिमांचं 'गीतरामायण' एक एप्रिलला हीरक महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. त्याचं औचित्य साधून गदिमांचा नातू सुमित्र आणि नातसून प्राजक्ता हे दाम्पत्य गदिमांचं दुर्मिळ साहित्य पुनरुज्जीवित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. गदिमांनी त्यांच्या कारकिर्दीत कथासंग्रह, काव्यसंग्रह अशी सुमारे चाळीस पुस्तकं लिहिली होती.

## 'नारबाची वाडी' सर्वोत्कृष्ट

मराठी चित्रपट परिवार आणि ए श्री मीडियातर्फे आयोजित चौथ्या चित्रपदार्पण पुरस्कारामध्ये आदित्य सरपोतदार यांच्या 'नारबाची वाडी' या सिनेमानं बाजी मारली.

'प्रेम म्हणजे प्रेम असतं' या सिनेमासाठी मृणाल कुलकर्णी यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला.

अभिजित खांडकेकर यांना 'जय महाराष्ट्र ढाबा भटिंडा' आणि निखिल काकडे यांना 'थोडं तुझं थोडं माझं' या सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट पुरस्कार

मिळाला.

प्रार्थना बेहेरे (जय महाराष्ट्र ढाबा भटिंडा) आणि शीतल दाभोळकर (रंगकर्मी) यांनी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार पटकावला. प्रथमेश परब आणि शाश्वती पिंपळीकर (बालक पालक) यांनी बाल कलाकरांसाठीच पुरस्कार मिळवले. 'अंगारकी' आणि 'दणक्यावर दणका' या सिनेमातील लक्षणीय कामगिरीबद्दल सुवर्णा काळे हिला पुरस्कार मिळाला. सुरेल इंगळे (प्रेम म्हणजे प्रेम असतं) यांना सर्वोत्कृष्ट संगीतकाराचा पुरस्कार मिळाला. युनिव्हर्सल म्युझिकचा 'कण्हेरीची फुले' हा अल्बम सर्वोत्कृष्ट ठरला.

## इंटरनेट झालं २५ वर्षांचं!

स्वित्झर्लंडमधील एका प्रयोगशाळेत काम करणाऱ्या सर टिम बर्नर्स-ली यांनी डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू (वर्ल्ड वाइड वेब)चा प्रस्ताव आणला, त्याला नुकतीच पंचवीस वर्षं पूर्ण झाली आहेत. त्यांनी सहज आणि आपल्या प्रयोगशाळेच्या उपयोगासाठी म्हणून सुरू केलेली ही इंटरनेट नावाची इतकी प्रसिद्ध होईल, याची त्यांनाही कल्पना नव्हती. या इंटरनेटवर सर्वांत प्रसिद्ध असलेला व्हिडिओ आहे दोन छोट्या मुलांचा. हावर्ड डेविझ कार यांनी आपल्या मुलांचा एक व्हिडिओ पहिल्यांदा इंटरनेटवर टाकला होता. त्यांचा मोठा मुलगा त्याचं बोट धाकट्या मुलाला चावायला देतो आहे, असा तो व्हिडिओ आहे.

## सीमावाद प्रश्न सामोपचाराने सोडविण्याची गरज

नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने माणसे आज जगभर फिरत असतात. विविध भाषा बोलणारी माणसे एका शहरात गुण्यागोविंदाने नांदत असताना केवळ भाषेच्या आधारावर वर्षानुवर्षे सीमावाद उगाळत बसणे चुकीचे आहे. प्रत्येक प्रांतातल्या सीमेवरील शहरांचे हेच दुखणे आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकने बेळगावचा प्रश्न सामोपचाराने सोडविला पाहिजे, असे स्पष्ट मत ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, नाटककार पद्मभूषण गिरीश कार्नाड यांनी नागपूर येथे व्यक्त केले.

पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले, की कलावंतांना राजकारणात येण्याची आवश्यकता का भासते, याचे कोडे मला अजूनही उलगडलेले नाही. अमिताभ बच्चन यांच्यासारखा ज्येष्ठ कलावंत राजीव गांधीपासून मुलायमसिंहापर्यंत आणि आता राज ठाकरेपर्यंत सगळ्या राजकारण्यांबरोबर

वावरताना दिसतो याचे वाईट वाटते. माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी आपल्याला काँग्रेसवर माहितीपट तयार करण्याची 'ऑफर' दिली होती. त्यासाठी वाटेल तेवढा पैसा देण्याची तयारीही त्यानी दाखविली होती. अर्थात, मी ती ऑफर नाकारली, असे ते म्हणाले.

कर्नाटकात संगीत नाटक नव्हते. विष्णुदास भाव्यांनी यक्षगान पाहून मराठीत आख्यान आणले असले तरी पुढे किर्लोस्कर देवलांच्या संगीत नाटकांचा प्रभाव कानडी रंगभूमीवर पडलेला दिसतो. प्रत्येकच कथेचा, प्रत्येक नाटकाचा चित्रपट होऊ शकत नाही. जी. ए. कुलकर्णी यांचे साहित्य भूल घालणारे आहे. त्यांच्या कथा म्हणजे सुंदर काव्य आहे. त्या कथांवर चित्रपट काढणे म्हणजे त्या साहित्यावर अन्याय करणे आहे. जीएंसारख्या तरल मनोवृत्तीच्या व्यक्तीला माणसांमध्ये रमणे कधी आवडलेच नाही. माणसांच्या जगापासून त्यांनी स्वत:ला कायम अलिप्तच राखले. खानोलकरांमध्ये एक मूल दडले होते, साहित्यिक म्हणून खूप महान असलेल्या या माणसाला जगाचे व्यवहार कधीच कळले नाहीत, असे कार्नाड यांनी सांगितले.

## विश्वास लायब्ररीचा पुरस्कार

'या कुंदे', 'मना सज्जना', 'एक तुतारी द्या मज आणुनी', 'देवा तुझे किती सुंदर आकाश', 'पिवळे तांबूस ऊन कोवळे', 'खबरदार जर टाच मारूनी', 'वाटे सानुली मंद झुळूक मी व्हावे', 'आजीचं घड्याळं', 'ऋतू हिरवा', 'किती दिसते ही कपिला गोजिरवाणी', 'घाल घाल पिंगा वारा माझ्या परसात...' यांसारख्या विस्मृतीत गेलेल्या कविता कोथरूड येथील विश्वास लायब्ररीच्या वर्धापन दिनानिमित्त रसिकांना ऐकायला मिळाल्या.

४७ वर्षांची प्रदीर्घ परंपरा जपणाऱ्या विश्वास लायब्ररीशी आजवर शांता शेळके, अनिल अवचट, सुधीर गाडगीळ, माधव गडकरी यांसारख्या अनेक दिग्गजांची नाळ जोडली गेली आहे. अंदाजे ११०० सभासद व ३० हजार ग्रंथसंपदा असणाऱ्या या लायब्ररीच्या वर्धापन दिन कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार गिरीश कुबेर यांना 'राजहंस'च्या आनंद हर्डीकर यांच्या हस्ते 'आवडता लेखक पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले. या वेळी प्रख्यात लेखक ह. मो. मराठे, राजहंस प्रकाशनाचे दिलीप माजगावकर उपस्थित होते.

७० ते ९० या दशकांतील शालेय मराठी पाठ्यपुस्तकांतील सध्या लोप पावत चाललेल्या तरीही प्रत्येकाच्या मनात घर करून राहणाऱ्या

नवे कोरे




# फॉरवर्ड अँड डिलिट

लेखिका
स्वाती चांदोरकर

**किंमत : १८०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

‘बदला घेण्यासाठी रक्तलांच्छितच घटना
घडायला हव्यात असं कोण म्हणतं?
आणि जर तसं म्हणत असतील,
तर ते चूक, अयोग्य.
शांत मनाने आणि अक्कलहुशारीनेही
बदला घेता येतो.
आणि मग तो गुन्हा ठरत नाही.
ठरवता येत नाही.
गुन्हेगार सापडतच नाही.’

अमोलिका मनातल्या मनात
असाच काहीसा विचार करत होती,
आणि नरोत्तम हॉस्पिटलच्या
आयसीयूमध्ये शेवटच्या घटका
मोजत होता....

सदाबहार कवितांचा घेतलेला रंजक आढावा म्हणजे ‘शोध कवितेचा’ या कार्यक्रमाची संकल्पना, निर्मिती, लेखन संहिता महेश पाटणकर यांची आहे.

## समाजप्रबोधन पुरस्कार

मुस्लिम सत्यशोधक मंडळातर्फे ‘मुस्लिम सत्यशोधक समाजासमोरील आव्हाने’ या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या वेळी मंडळातर्फे देण्यात येणारा समाज प्रबोधन पुरस्कार खान यांना ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्या हस्ते देण्यात आला. सन्मानचिन्ह, अकरा हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या वेळी ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य, मंडळाचे अध्यक्ष सय्यदभाई, सरचिटणीस हुसेन जामदार, चिटणीस शमसुद्दीन तांबोळी उपस्थित होते.

‘जातीच्या अस्मिता’ या तत्कालीक असल्यामुळे जात, धर्म या संकल्पनांच्या पलीकडे जाऊन माणसाची माणूस म्हणून ओळख झाली पाहिजे’, असे मत प्रसिद्ध साहित्यिक राजन खान यांनी व्यक्त केले.

माणूस आणि समाज व्यवस्थाचा आढावा घेताना खान म्हणाले, ‘मी सुरुवातीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम केले. नंतर राष्ट्रसेवा दलाचेही काम करण्याची संधी मिळाली. या दोन्ही विचारधारांत वावरताना आलेल्या अनुभवातूनच माझी स्वतंत्र विचारधारा तयार झाली आहे. साहित्याच्या राजकारणातही मी खेळलो आहे. मोठे पुरस्कार हे केवळ खान या आडनावामुळे मला मिळालेले नसून माझ्या कलेला मिळाले आहेत. पण आजचा पुरस्कार माझ्या कामाला मिळालेला पहिलाच सन्मान आहे.’

‘भारतात असलेल्या समाजव्यवस्थेत प्रचंड वैविध्य आहे. त्यामुळे एखाद्या समाजामुळे देशात परिवर्तन घडून येणार नाही. सर्वसमावेशक समाजाला घेऊनच परिवर्तन घडेल,’ असे सांगून आढाव यांनी काळानुसार बदलत गेलेल्या समाजातील महत्त्वपूर्ण बदलांचा आढावा घेतला.

‘जेव्हा समुदायाने प्रयत्न करायचे असतात, तेव्हा विचारधारेची गरज लागते. सत्तेचे राजकारण, सामाजिक बांधणी करताना विचारधारा दिशादर्शक ठरते. केवळ त्या विचारधारेतून काय घ्यायचे ते ठरविण्याचे स्वातंत्र्य घेतले पाहिजे, कारण व्यक्तिवादातून सामाजिक बांधिलकी होऊ शकत नाही. उद्दिष्ट स्पष्ट नसेल तर मोठमोठ्या चळवळीही वेगळ्या वळणाला लागतात. त्यामुळे विचारधारा असलीच पाहिजे,’ असे वैद्य यांनी सांगितले. तांबोळी यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

## सिंधुदुर्गात 'चित्रनगरी'

महाराष्ट्र आणि गोव्याच्या सीमेवर नांदोसमध्ये (जिल्हा सिंधुदुर्ग) खास बॉलिवूडसाठी नवी 'फिल्म सिटी' उभारण्यात येत आहे. येत्या चार वर्षांत हा प्रकल्प पूर्ण होईल व त्या साठी दोन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाईल.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात तयार होणारी 'फिल्म सिटी' ही सिनेतारकांची नव्हे तर पर्यटकांचीही स्वप्ननगरी ठरणार आहे. या प्रकल्पासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाबरोबर 'साई बॉलिवूड फिल्मसिटी इंडिया प्रा. लि.' कंपनी काम करणार आहे. परदेशी गुंतवणूकदारही या ठिकाणी गुंतवणूक करणार आहेत. यामध्ये अमेरिकेतील लॉस एंजेलिसच्या 'हॉलिवूड हिल'प्रमाणे येथेही एका मोठ्या टेकडीवर बॉलिवूड असे नाव कोरण्यात येईल.

या प्रकल्पासाठी पर्यटन विकास महामंडळाने दहा वर्षांसाठी विविध करांमध्ये सूट देऊ केली आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्र आणि गोव्यातील पर्यटनाला चालना मिळणार आहे. गोव्यापासून केवळ तीस किलोमीटर अंतरावर हे ठिकाण आहे.'

भारतामध्ये ही पूर्ण नवी कल्पना आहे. प्रकल्पासाठीच्या पेटंट आणि कॉपीराइट प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे बॉलिवूडसाठी हे खऱ्या अर्थाने 'रिअल डेस्टिनेशन' ठरेल.

## जी-मेल 'हॅकप्रूफ'

एडवर्ड स्नोडेनने उघड केलेल्या अमेरिकेच्या नॅशनल सिक्युरिटी एजन्सीच्या (एनएसए) प्रतापानंतर जगभरात इंटरनेटच्या खासगीकरणासंदर्भातील जागरुकता वाढली आहे. त्यांच्यासाठी एनस्क्रिप्टेड मेलची सुविधा जीमेलने उपलब्ध केली आहे. यामुळे मेलमधील माहितीचा गैरवापर करणे कठीण जाईल असा दावा गुगलने केला आहे.

एकट्या गुगलला गेल्या वर्षी अमेरिकन सरकार आणि कोर्टाकडून ५० हजारांहून अधिक अकाउंटबाबतच्या माहितीची विचारणा झाली होती. या व्यतिरिक्तही युजरकडून पाठविले जाणारे मेल, एसएमएसमधील डेटा विविध देशांच्या गुप्तहेर संस्थांकडून गुप्तपणे ॲक्सेस केला जातो. जगभरातील युजरच्या मनात अस्वस्थता निर्माण झाल्यामुळे जीमेलमार्फत पाठविले जाणारे सर्व मेल एन्क्रिप्ट करण्याचा निर्णय गुगलने घेतला आहे. जीमेलच्या युजरने पाठविलेला आणि स्वीकारलेला प्रत्येक मेल यापुढे

एनस्क्रिप्टेड असेल आणि गुगलच्या सर्व्हरमधूनच तो पाठविला जाईल. त्यामुळे हे मेल इतर कुणाला अ‍ॅक्सेस करणे अतिशय कठीण होईल.

२०१० मध्येच गुगलने जीमेल युझरला ही सुविधा उपलब्ध करून दिली होती. त्यासाठी युझरला स्वत: (HTTPS) असलेली साइट ओपन करावी लागत होती. मात्र आता सर्वच युजरचे मेल अ‍ॅटोमॅटिक एन्क्रिप्टेड असणार आहेत.

एनएसएच्या दाव्याप्रमाणे गुगल, याहू, फेसबुक यासारख्या कंपन्यांच्या फायबर ऑप्टिक केबलमधून माहिती अ‍ॅक्सेस केली जात होती. हे त्या कंपन्यांनाही ठाऊक होते. मात्र गुगलचा सीईआहे लॅरी पेज याने हा दावा खोडून काढला आहे. इतक्या वर्षांनंतर कंपनीने जीमेल सेवा इन्क्रिप्ट केली, हे देखील उशिराचेच शहाणपण म्हणावे लागेल.

## **‘नजर कुतुबुद्दिन अन्सारी’ आत्मचरित्राचे प्रकाशन**

नकोशा भूतकाळाचे व्रण मिटवता येत नसले तरी वर्तमान नितळ असावा यासाठी दोन परस्परविरोधी चेहरे दाखवणारी अशो मोची आणि कुतुबुद्दीन अन्सारी यांची छायाचित्रे २००२ च्या गुजरात दंगलीचे प्रतीक बनली.

अन्सारी हे गुजरातेतील नरोडा पाटिया या गावातील शिंपी. गुजरातच्या भीषण दंगलीत त्यांच्यावर हल्ला होण्याची शक्यता होती. त्यामुळे ते डबडबलेल्या डोळ्यांनी होत जोडून दयेची याचना करीत होते. त्यांचे त्या अवस्थेतील छायाचित्र त्या वेळी वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले आणि ते गाजले. गुजरातची दंगल म्हटली की आजही ते डोळ्यापुढे उभे राहते.

या दंगलीदरम्यानच्या अन्सारी यांच्या छायाचित्राने कित्येकांप्रमाणे पुण्यातल्या आनंद सराफ यांनाही अस्वस्थ केले होते. इतके की त्यांनी अन्सारी यांना ‘मी तुझा एक अनोळखी भाऊ’ अशा सहीनिशी पत्र पाठवत पुण्याला येण्याचे आमंत्रण दिले. आजवर या दोघांमधला संवाद अखंड सुरू आहे.

सराफ म्हणाले, ‘‘माझे पत्र वाचून अन्सारी यांनी मला दूरध्वनी केला. ते भावनिक होऊन खूप वेळ बोलले. ‘पुण्याला नक्की येतो’ असे वचनही त्यांनी दिले. आमचा संवाद सुरूच राहिला. अन्सारी आणि दंगलीतले आणखी एक पीडित भाटिया हे दोघे सहकुटुंब माझ्या घरी आले. तो दिवस होता, १५ ऑगस्ट २००२! मग ठरल्यानुसार मी माझ्या ‘सैनिक मित्र

परिवार' या संस्थेच्या माध्यमातून या दोघांना अनेक शाळांमधल्या मुला-मुलींसमोर एकतेचे प्रतीक बनवून उभे केले. पुस्तकाच्या पहिल्या पानावरची प्रतिज्ञाच तेव्हा प्रत्यक्षात साकारली!''

गुजरातच्या दंगलीतील दुसरा चेहरा हा आक्रमकाचा होता. या आक्रमकापैकी एक होते मोची. त्यांना आता आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होतो आहे. ''मी आता अन्सारींना भाऊ मानतो. मी त्या वेळी अपप्रवृत्तींच्या हातातील बाहुले झालो होतो,'' असे ते म्हणतात.

'मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षा'ने आयोजित केलेल्या 'अ डिकेड ऑफ जिनोसाइड' या कार्यक्रमात कुतुबुद्दीन अन्सारी यांचे चरित्र 'नजर कुतुबुद्दीन अन्सारी' ('मी कुतुबुद्दीन अन्सारी') मल्याळीमध्ये प्रकाशित झाले. हे पुस्तक कलिम सिद्दिकी आणि सईद रुमी या दोघांनी लिहिले आहे. केरळमधल्या थलिपरंबाई गावात या पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्या कार्यक्रमास अन्सारी, सिद्दिकी आणि मोची हे तिघेही उपस्थित होते.

सिद्दिकी म्हणाले, ''मी आणि अन्सारी वर्षानुवर्षे एका गल्लीत राहत आलोय. दंगलीची धग मलाही लागलीच. पण त्याला आता बराच काळ लोटला. माध्यमांमध्ये गाजलेल्या अन्सारी यांच्या छायाचित्रामागची 'अनकही बात' आम्ही या लिखाणातून समोर आणलीय.''

सिद्दिकी म्हणाले, ''जख्म तो दोनो तरफ उतने ही गहरे हैं. पर दर्द को कबतब दोहरांएगे? अब कुछ अमन की, इन्सानियत की भी बात चलाते है। कोम और राजनीती से परे कुछ सच होते हैं। उनको हमने इस किताब में सामने लाने की कोशिश की हैं।''

## चित्रपट आणि साहित्यातून सहअनुभूतीचा प्रत्यय

साहित्य आणि चित्रपट या माध्यमातून मनोरंजन तर झालेच पाहिजे. पण, केवळ समस्या आणि त्याचे ढोबळ चित्रण एवढ्यावरच न थांबता, वाचक आणि प्रेक्षक म्हणूनही आपल्याला ती कलाकृती घडवत राहते. साहित्य आणि चित्रपटाने सहअनुभूतीचा प्रत्यय येतो, असे मत प्रसिद्ध लेखिका सानिया यांनी व्यक्त केले, केवळ आपलेच बरोबर असे वाटत नाही. तर, दुसऱ्याचे मन किंवा एखाद्या घटनेची दुसरी बाजूही समजते. त्या दृष्टीने चित्रपट माध्यम प्रभावी आहे. चित्रपट पाहून आपण पुन्हा पुस्तकाकडे वळू असेही त्य म्हणाल्या.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयाम क्रिएशन्स, आशय

फिल्म क्लब आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय यांच्यातर्फे महिला कादंबरीकारांच्या अभिजात साहित्यावर आधारित चित्रपट महोत्सव साजरा करण्यात आला.

दिग्दर्शिका अरुणाराजे, ज्येष्ठ अभिनेत्री तनुजा, अभिनेते-दिग्दर्शक नितीश भारद्वाज, राष्ट्रीय पुरस्कारविजेती अभिनेत्री उषा जाधव, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रशांत पाठराबे, आशयचे सचिव वीरेंद्र चित्राव, सतीश जकातदार, 'आयाम'च्या मनस्विनी प्रभुणे आणि नम्रता फडणीस या वेळी उपस्थित होत्या.

सानिया म्हणाल्या, ११ व्या शतकात जपानमध्ये शिकीबू मुरासाकी या महिलेने जगातील पहिली कादंबरी लिहिली असे मानले जाते. त्यासाठी तिला कांजी लिपी वापरण्याची परवानगी नसल्याने हिरागाना या बोलीभाषेत ही कादंबरी लिहिली गेली. साहित्य आणि चित्रपट यातून गोष्ट सांगितली जाते. आपल्या आजूबाजूला गोष्टी घडत असतात. आपले आयुष्य ही देखील एक गोष्टच असते. कथा-कादंबरी लेखनापूर्वी समोर असलेल्या माणसांच्या गोष्टींचा विचार आधी मनात उभा राहतो. शब्दांच्या माध्यमातून हा पट मी मांडते. तो वाचून प्रत्येकाच्या मनात वेगळा चित्रपट तयार होत असतो. साहित्यावरून चित्रपट करताना दिग्दर्शकाच्या मनामध्ये निर्माण होणारा चित्रपट तो पडद्यावर आणून समांतर विश्वाची निर्मिती करतो. लेखिकांच्या साहित्यनिर्मितीवर आजवर अनेक चित्रपट झाले असले तरी लेखिका मात्र नेहमीच दुर्लक्षित राहिल्या, अशी खंत अरुणा राजे यांनी व्यक्त केली. त्यांनी जागतिक साहित्यातील लेखिकांच्या योगदानाची माहिती दिली. सुधा मूर्ती यांच्या कथेवर आधारित 'पितृऋण' या चित्रपटाने महोत्सवाची सुरुवात झाली. त्यापूर्वी तनुजा आणि नितीश भारद्वाज यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला.

## राष्ट्रीय संग्रहालयाचे आधुनिकीकरण

प्रगत संगणन विकास केंद्रातील (सी-डॅक) 'जतन व्हॅर्च्युअल म्युझियम बिल्डर' प्रणालीचा (सॉफ्टवेअर) भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या अधिकार क्षेत्रातील सर्व संग्रहालयांमध्ये प्रमाणित प्रणाली म्हणून समावेश झाला आहे. 'सी-डॅक'मधील 'ह्यूमन सेंटर्ड डिझाईन अँड कॉम्प्युटिंग ग्रुप'ने (एचसीडीसी) या प्रणालीची निर्मिती केली आहे.

दिल्लीतील नॅशनल म्युझियम, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टस

(एनजीएमए), उत्तर प्रदेशातील अलाहाबाद म्युझियम, पश्चिम बंगालमधील इंडियन म्युझियम, व्हिक्टोरिया मेमोरिअल हॉल, मुंबईतील (महाराष्ट्र) नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टस (एनजीएमए) कर्नाटकातील नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टस (एनजीएमए), गोव्यातील आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (एएसआय) म्युझियम, नागार्जुनकोंड्यातील आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (एएसआय) म्युझियम, सालार जंग म्युझियम यामध्ये यांचा समावेश केला आहे.

'जतन'सोबत डिजिटायझेशनसाठी लागणारे स्कॅनर, संगणक, साठ्याची उपकरणे आणि नेटवर्कचे इन्फ्रास्ट्रक्चर यांची उभारणी केली आहे. 'एचसीडीसी'ने या संग्रहालयामधील क्युरेटर्स आणि ऑपरेटर्स यांच्यासाठी विशेष प्रशिक्षण आयोजित केले होते. त्यातून 'जतन' आणि डिजिटल तंत्रज्ञान वापरण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. 'जतन', डिजिटायझेशन इन्फ्रास्ट्रक्चर आणि प्रशिक्षणामुळे संग्रहालयांचे आधुनिकी-करण करणे शक्य झाले आहे. याविषयी 'सी-डॅक' सहसंचालक डॉ. दिनेश कात्रे म्हणाले, ''संग्रहालयातील डेटाबेस तयार करण्यात 'जतन'ची मदत होईल. डिजिटल तंत्रज्ञानामुळे आता संग्रहालये इंटरनेटवर पाहता येतील. यामुळे भारतीय परंपरेच्या जतनाबरोबरच सांस्कृतिक ज्ञान जगभरातल्या पर्यटक, अभ्यासक, शिक्षक व विद्यार्थ्यांपर्यंत पोचवणे शक्य होणार आहे.''

## 'लढा संयुक्त महाराष्ट्राचा'चे प्रकाशन

संयुक्त महाराष्ट्रासाठी सुरू झालेला लढा मुंबई मिळाल्यानंतर आता केवळ बेळगाव सीमावासीयांवर सोडून देण्यात आला आहे. अशाही स्थितीत अनेक मंडळींनी हा लढा सुरू ठेवला आहे. त्यामुळे महाराष्ट्र व राज्य शासनाने सीमाप्रश्नावर लढणाऱ्यांच्या मागे उभे राहावे, असे आवाहन विचारवंत व लेखक डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

महेश मांगले यांनी लिहिलेल्या 'लढा संयुक्त महाराष्ट्राचा आणि सीमाप्रश्नाचा' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. मोरे यांच्या हस्ते १७ फेब्रुवारी रोजी झाले. पांडुरंग बलकवडे, निनाद बेडेकर, स्नेहल प्रकाशनचे रवींद्र घाटपांडे त्या वेळी उपस्थित होते.

मोरे म्हणाले, की संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे चांगले डॉक्युमेंटेशन झाले नाही. आम्ही इतिहास घडवितो, पण इतिहास लिहित नाही, हे दुर्दैव आहे. मराठ्यांनी साम्राज्य निर्माण केले पण हक्काचे राज्य मिळविण्यासाठी

लढा द्यावा लागला ही शोकांतिका आहे.

महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर त्या महाराष्ट्राची चिकित्सक एकही कलाकृती निर्माण झाली नाही. महाराष्ट्राच्या प्रतिभेला ही बाब शोभा देणारी नाही.

संयुक्त महाराष्ट्राचा लढा आता केवळ बेळगाव सीमावासीयांवर सोपविला आहे. मुख्य लढा महाराष्ट्रापेक्षा मुंबईसाठी होता. लढ्यातील प्रजासमाजवादी पक्ष व कम्युनिस्ट दोघांच्याही मुंबईत कामगार संघटना होत्या. त्यामुळे त्यांनी लढ्यात लक्ष घातले. मुंबई मिळाल्यानंतर त्यांचे या लढ्यातील लक्ष कमी झाले.

बेडेकर म्हणाले, की इतिहास पाहिला तर कानडी लोकांसाठी मराठी माणसांनी रक्त सांडले आहे. असे असूनही सीमा प्रश्नासाठी संघर्ष करावा लागतो आहे. सीमा भागातून मराठी निपटून काढण्याचा प्रयत्न होतो आहे.

बलकवडे म्हणाले, की सीमाप्रश्न अजूनही शिल्लक आहे. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचा लढा संपलेला नाही. तो मराठी माणसांच्या अस्मितेचा लढा आहे.

लोकशाहीच्या चौकटीत राहून मराठी माणसे तेथे न्याय मागत आहेत, मात्र त्यांना दडपले जात आहे. बेळगावच्या लढ्यापासून महाराष्ट्रातील मंडळी बाजूला गेली. त्यामुळे हा स्थानिक लढा होतो आहे. अशा वेळी या लढ्याला पाठबळ देण्यासाठी त्यांच्यामागे उभे राहिले पाहिजे.

## श्रावणक्वीन स्पर्धेने आत्मविश्वास वाढला

२०१३च्या श्रावणक्वीन स्पर्धेच्या निवड चाचणीत नम्रता मुंदडा सहभागी झाली आणि आपल्या गुणांच्या आणि व्यक्तिमत्वाच्या जोरावर ती अंतिम स्पर्धकांपैकी एक ठरली. तिनं लहानपणापासून स्वप्न पाहिलं, अभिनेत्री होण्याचं. त्या दृष्टीनं कॉलेजचं शिक्षण घेत असताना ती मालिका, जाहिराती आणि सिनेमांच्या निवड चाचण्यांनाही जायची. तरीही मनात शंका असायची. आठवडाभरातील ग्रुमिंग सेशन्समुळे अभिनयाच्या क्षेत्रात जाण्याविषयीचा तिचा आत्मविश्वास वाढत गेला. सध्या ती झी मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या 'अस्मिता' या नव्या मालिकेच्या काही भागात दिसणार आहे.

कोणत्याही शो किंवा मालिकेचं उत्तम प्रमोशन करणाऱ्या आणि तितकाच सकस आशय आपल्या शो किंवा मालिकेतून देणाऱ्या झी

मराठीसारख्या वाहिनीवर काम करायला मिळणं ही आनंदाची बाब असल्याचे ती म्हणाली. 'मी स्टार प्रवाहवरील 'आंबट-गोड' या मालिकेसाठी ऑडिशन द्यायला गेले होते, तेव्हा निवड झाली नाही; पण दिग्दर्शकानं माझा चेहरा लक्षात ठेवला. त्यामुळेच 'अस्मिता'तील काही भागात काम करण्याची संधी मिळते आहे.'

'श्रावणक्वीन'मधील ग्रुमिंग सेशन्सदरम्यान होणारी तज्ज्ञांची व्याख्यानं, त्यांच्या टिप्स यांचा मला बराच फायदा झाला. या तज्ज्ञांनी आम्हा मुलींना व्यक्तिमत्त्वातील फक्त उणिवा किंवा मर्यादा दाखवून दिल्या नाहीत, तर आमच्यातील चांगलं काय तेही दाखवलं. आहार, फिटनेस, ड्रेसिंग सेन्सपासून सुडौल पद्धतीनं चालण्याची माझी तयारीही इथेच झाली.'

नम्रता मूळची पुण्याची. ती उत्तम कराटे खेळते. कराटेचे वर्गही घेते. नृत्य निपुण, न्रमताचा फॅशन सेन्सही जबरदस्त आहे. त्याविषयी ती म्हणते, 'बाजारात दरवेळी येणारं नवं काहीतरी आम्हा मुलींना परिधान करायला हवंच असतं. मात्र आपली शरीरयष्टी, चेहरा, खांद्याची ठेवण, उंची-जाडी या सगळ्याचा नीट विचार करूनच मी योग्य ती नवी फॅशन स्वत:साठी अमलात आणायची किंवा नाही हे ठरवते,' नम्रता सध्या पॉलिटिक्स विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत आहे.

## सुखाचा शोध घेण्यापेक्षा प्रत्येक क्षणी जगण्याचा आनंद घ्या.

''दु:खात आपल्याला कसे जगावे; कसे जगू नये याची बहुमोल शिकवण मिळते. सुख माणसाचा अभिमान वाढवीत असले, तरी दु:ख हा जीवन जगण्याचा 'प्रशिक्षण कार्यक्रम' असतो,'' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांनी व्यक्त केले.

'सकाळ इंटरनॅशनल लर्निंग सेंटर'तर्फे स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना डॉ. अवचट यांनी मार्गदर्शन केले. 'दु:खामुळे येणारे नैराश्य टाळण्यासाठी काय करावे?' असे विचारले असता डॉ. अवचट यांनी 'दु:खाचे आयुष्यातील महत्त्व' सांगितले. भारतातील राज्य आणि सरकारी व्यवस्था भ्रष्ट असल्याचे नेहमीच बोलले जाते. परंतु ही व्यवस्था बदलायची असेल, तर चांगल्या लोकांनी व्यवस्थेत जाणे आवश्यक आहे.

'माणूस माणसांसह जगू शकत नाही?' अशी स्थिती निर्माण झाल्याची खंत व्यक्त करीत ते म्हणाले, ''आनंदाने जगण्याचा प्रयत्न करा; म्हणजे मनातील घालमेल संपेल. माणसाच्या बाह्य सौंदर्याकडे पाहण्यापेक्षा

व्यक्तीच्या मनात डोकावून पाहा. जीवनात काय उपयुक्त पडेल, याचा विचार केला पाहिजे, जगणे आपल्या हातात आहे. प्रत्येकाच्या अंगात काही ना काही वैशिष्ट्य असतेच; तेच आपण शोधू शकलो, तर सुखाचा मागे धावण्याची गरज नाही. आपण अनुभवातून खूप काही शिकत असतो. त्यामुळे जगताना आपल्याला घडविण्याचा आनंदही घेता आला पाहिजे. सुख हे पैशावर अवलंबून नसते, तर ते समाधानात आहे. सुखाचा शोध घेण्यापेक्षा प्रत्येक क्षणी जगण्याचा आनंद घ्यावा. जगताना डोळस वृत्ती आणि दूरदृष्टी बाळगा, असा कानमंत्रही ही अवचट यांनी विद्यार्थ्यांना दिला.

## 'हाय-टेक लाइफलाइन'चे प्रकाशन

"मानसिक शांतीसाठी श्रद्धा आवश्यक असते. श्रद्धा हा धर्माचा पाया आहे. त्यामुळे धर्माने सांगितलेल्या गोष्टी केल्या पाहिजेत. ज्ञानप्राप्तीसाठीही मन:शांती आवश्यक असते," असा सल्ला ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी डॉ. अनिल गांधी लिखित 'हाय-टेक लाइफलाइन' या पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी दिला. ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. के. एच. संचेती, 'इंकिंग इनोव्हेशन्स'चे आनंद लिमये, सोनिया खरे आणि डॉ. गांधी उपस्थित होते.

डॉ. सरदेसाई म्हणाले, "केवळ भारतीयच नव्हे, तर वैचारिक विश्वासात ज्ञान आणि ज्ञानदानाला महत्त्व दिले आहे. माणूस जन्मतो त्या वेळी त्याची पाटी कोरी असते. त्यानंतर तो वाढताना प्रत्येक पायरीवर ज्ञान मिळवत जातो. ज्ञानाच्या प्रमाणात माणसाला अधिकार प्राप्त होतो. ज्ञान आणि अधिकार मिळून समृद्धी मिळते. त्यासाठी अपार कष्ट करावे लागतात. त्यातून प्रतिष्ठा आणि लोकप्रियता मिळते. हे सर्व ज्ञानातून मिळते. पण ज्ञानातून मन:शांती मिळत नाही. कोणतेही औषध मनाची शांती देऊ शकत नाही."

डॉ. संचेती म्हणाले, "अनेक वैद्यकीय गोष्टींचे गूढया पुस्तकातून उलगडले आहे. कर्करोगाची अत्यंत साध्या भाषेतील माहिती या पुस्तकात आहे. त्यातून या रोगाबद्दलचे ज्ञान कोणालाही कळते. त्यावर उपचार करण्याच्या पद्धतीचीही यात सविस्तर माहिती दिली आहे."

डॉ. गांधी यांनीही मनोगत व्यक्त केले. लिमये यांनी आभार प्रदर्शन केले.

## ‘ग्रंथ तुमच्या दारी’ अंतर्गत पुण्यामध्ये ४४ ग्रंथपेट्या

कुसुमाग्रज प्रतिष्ठानातर्फे ‘ग्रंथ तुमच्या दारी’ या वाचनसंस्कृतीच्या प्रसारासाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांतर्गत पुण्यामध्ये ४४ ग्रंथपेट्या वितरित झाल्या आहेत. या माध्यमातून पुणेकर आपली वाचनाची भूक भागवू शकतील. गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर (३१ मार्च) दौंड येथे शंभर पुस्तकांचा समावेश असलेली एक पेटी वितरित करण्यात आली. २३ मार्च रोजी ग्रंथ दिन साजरा करताना जीवनातील ग्रंथांचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमाने नवे क्षितिज विस्तारले. वाचनाची गोडी कमी झाली.

सध्या मराठी साहित्य वाचतो कोण असा प्रश्न उपस्थित केला जात असला तरी कुसुमाग्रज प्रतिष्ठान वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी ‘ग्रंथ तुमच्या दारी’ हा उपक्रम यशस्वीपणे राबवित आहे. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांनी १९९६ मध्ये सुरू केलेल्या ‘पेटी वाचनालय’ या प्रकल्पाने तीन वर्षांनंतर विश्रांती घेतली. एका अपघातातूनच विनायक रानडे या युवकाने पुढे तात्यासाहेबांचा हा उपक्रम ‘ग्रंथ आपल्या दारी’ या रूपात समाजासमोर आणला. केवळ नाशिकमध्येच नाही, तर राज्यभरात सर्वत्र आणि देशभरात एवढेच नव्हे तर, विनासायास आणि विनामूल्य वाचकांपर्यंत ग्रंथसंपदा पोहोचविण्यासाठी सुरू असलेल्या उपक्रमाने आतापर्यंत ४५५ ग्रंथपेट्यांपर्यंतची मजल गाठली आहे. दहा मिनिटांच्या अंतरावर राहणाऱ्या ३५ वाचकांच्या समूहासाठी कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, विज्ञान, इतिहास, अनुवादित असे विविध वाङ्मय प्रकार असलेल्या शंभर पुस्तकांची एक ग्रंथपेटी दिली जाते. दर चार महिन्यांनी प्रत्येक ठिकाणची ग्रंथपेटी बदलून दुसरी पेटी जाते. यामुळे वाचनासाठी हजारो पुस्तके उपलब्ध होत आहेत. या उपक्रमाचा लाभ घेण्यामध्ये नाशिक अग्रेसर असून तेथे ८५ ग्रंथपेट्या वितरित झाल्या आहेत. त्यानंतर ठाण्यामध्ये ५५, तर पुण्यामध्ये ४४ ग्रंथपेट्यांचे वितरण झाले आहे. पुण्यामध्ये बाणेर, औंध, कोथरूड, कर्वे रस्ता, सिंहगड रस्ता, चिखली, पिंपळे गुरव विमाननगर, शनिवार पेठ आणि करिष्मा सोसायटी अशा भागामध्ये वाचकांच्या अभिजात साहित्य वाचनाची भूक भागवित आहे.

राज्यातील विविध ठिकाणांसह गुजरात, दिल्ली या राज्यांमध्ये ग्रंथपेट्या पोहोचल्या असून पुढील महिन्यात कर्नाटकातील बेळगाव येथे एक ग्रंथपेटी सुरू होत आहे.

शहीद हेमंत करकरे यांच्या पत्नीने करकरे याच्या स्मृतिप्रीत्यर्थ

नाशिकरोड कारागृहातील बंदिवानांसाठी एक ग्रंथपेटी देणगी दिली. येरवडा, ठाणे, नागपूर येथील बंदिजनांसाठी त्याचप्रमाणे हरसूल, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ११ आदिवासी पाड्यांवर ग्रंथपेटीचा लाभ घेणारे वाचक आहेत. महिला आणि अपंग निवासी वसतिगृहांमध्येही ग्रंथपेटी उपक्रम चालविला जात आहे.

## अजूनही वपुर्झा

काही लेखक असे असतात, की ज्यांच्या लिखाणाला काळाची कुठलीही मर्यादा असू शकत नाही. वसंत पुरुषोत्तम काळे हे यापैकीच एक नाव. वपुंच्या लिखाणाचे जगभरात चाहते आहेत. सोशल नेटवर्किंग साइटवरही त्यांच्या चाहत्यांची संख्या वाढतच असून त्यात तरुणाईची संख्या खूप मोठी आहे.

फेसबुक, व्हॉट्सॲप, ब्लॉग सारख्या प्लॅटफॉर्मही सध्या वपुर्झामय झाले आहेत. मराठीतल्या अनेक लेखकांच्या नावे फेसबुकवर पेजेस आहेत. पु. ल. देशपांडे यांच्यापासून व. पु. काळे यांच्यापर्यंत अनेकांची पेजेस फेसबुकवर आहेत. आताच्या तरुणाईमध्येही व. पु. काळे यांच्या लिखाणाची क्रेझ कायम आहे.

‘वपुं’चं साहित्य ब्लॉगवर आणि डिजिटल मीडियावर काही वर्षांपासून आहे. फेसबुकवर गेल्या वर्षभरापासून ‘वपुं’ची पेजेस दिसतायत. आजच्या घडीला फेसबुकवर ‘वपुं’ची तीन पेजेस आहेत. त्यापैकी वसंत पुरुषोत्तम काळे आणि व. पु. काळे या नावाने दोन पेजेस आहेत. या पेजला हजारोच्या संख्येनं लाइक्स आहेत. या पेजेसवर ‘वपुं’ची प्रसिद्ध वाक्य घेऊन त्याचे पिक्चरमेसेजेस बनवले जातात. तसेच ते स्टेटस स्वरूपात शेअर होतात. हाच मजकूर कॉपी करून व्हॉट्सॲपवर शेअर केला जातो आहे.

व.पु. काळे या नावाने गुगल प्लेवर ॲंड्रॉइड ॲप्लीकेशन उपलबध असले, तरी अनेकांना या ॲपबद्दल माहिती नाही. जेमतेम ३५० लोकांनी हे ॲप्लीकेशन डाउनलोड केले असून ६० टक्क्यांहून अधिक लोकांनी या ॲपला फाइव्ह स्टार रेटिंग दिलं आहे. या ॲपवर वपुंचे दीडशेहून अधिक कोट्स आहेत. या ॲपमध्ये तीन वेगळे फाँट सिलेक्ट करता येतात.

आम्ही ‘वपुं’च्या प्रेमात

आम्ही ‘वपुं’च्या लेखनाच्या प्रेमात आहोत. वपु मोजक्या शब्दात खूप काही सांगून जातात. मात्र सर्वांपर्यंत हे लेखन पोहोचत नाही. म्हणूनच आम्ही वर्षभरापूर्वी फेसबुकवर हे पेज सुरू केले. आम्हाला खूप कमी वेळात बरीच प्रसिद्धी मिळाली. नॉन पेड प्रमोशननं आम्ही आज ६० हजारांचा पल्ला गाठला आहे. लोकांना नव्या माध्यमातून चांगलं लेखन दिल्यास त्यांना ते आवडतं. आज आम्हाला खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## पर्यावरणाविषयक कायदे कागदावर

‘विकास आणि पर्यावरण संरक्षणाचा समतोल साधण्यासाठी सरकारने उत्तम कायदे तयार केले आहेत. पण स्वत:चे हितसंबंध जपण्यासाठी सरकार या कायद्याची अंमलबजावणी करण्यास तयार नाही. देशाचा विकास करायचा असेल, तर प्रशासनाच्या निर्णयप्रक्रियेत तळागाळातील लोकांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे,’ असे मत ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी व्यक्त केले.

नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टडीज, दिल्लीतील सेंटर फॉर बजेट अँड गव्हर्नन्स अकाउंटेबिलिटी आणि नॅशनल फाउंडेशन फॉर इंडिया या संस्थेतर्फे ‘सरकार व्यवहार आणि सामाजिक क्षेत्रासंबंधीच्या शासन व्यवहारातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व’ या विषयावर परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेत डॉ. गाडगीळ यांनी ‘लोकसहभाग वाढविण्यासाठी पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाच्या माध्यमातून काय करावे’ या विषयावर मार्गदर्शन केले.

डॉ. गाडगीळ यांनी पश्चिम घाट जैवविविधतेचा अभ्यास करताना आलेले अनुभव या वेळी सांगितले. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अतिशय बारकाईने विचार करून कायदे तयार केले आहेत. अनेक अभ्यासकांनी पर्यावरणावर महत्त्वपूर्ण संशोधन अहवालही लिहिले आहेत. पण सरकार दरबारात या अभ्यासाला स्थान नाही, असे सांगून त्यांनी प्रशासनाच्या अनास्थेमुळे वन हक्क कायदा, प्रदूषण नियंत्रण कायदा, पर्यावरण मंत्रालयातर्फे देण्यात येणारा ना हरकत परवाना... अशा विविध कायदेशीर तरतुदींना मिळालेल्या अपयशाचे दाखले दिले. अधिकाधिक लोकांना रोजगार देणारा, नैसर्गिक साधन संपत्तीचा कमीत कमी वापर आणि विकास

प्रकल्पांमध्ये स्थानिकांचा सहभाग असलेला विकास करायचा आहे. सरकारचे मतपरिवर्तन करणारा दबाव गट निर्माण झाला पाहिजे, असे गाडगीळ यांनी सांगितले.

## 'इतिहासाचे विकृतीकरण थांबविणे गरजेचे'

भारत-पाकिस्तानमधील तेढकमी करत परस्पर संबंध सुधारण्यासाठी दोन्ही देशांमधील इतिहासाचे विकृतीकरण थांबविणे गरजेचे आहे. त्यासाठी एकत्रित इतिहास लेखनाचे प्रकल्प सकारात्मक भूमिका बजावू शकतील, असे मत ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ आणि पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर सोशल सायन्सेस अँड ह्युमॅनिटीजचे संचालक डॉ. राजा दीक्षित 'पाकिस्तान - इंडिया पिपल्स फोरम फॉर पीस अँड डेमोक्रसी' तर्फे आयोजित राज्य अधिवेशनात यांनी व्यक्त केले.

सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. पुष्पा भावे, पत्रकार जमीन देसाई आदी उपस्थित होते.

इतिहासाच्या विकृतीकरणामुळे भारत आणि पाकिस्तानमधील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संबंधामध्ये निर्माण झालेला गुंता आणि तो सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांविषयी डॉ. दीक्षित यांनी या वेळी भाष्य केले. महापुरुषांच्या अपहरणाच्या आणि इतिहासाच्या विकृतीकरणाच्या काळामध्ये इतिहासलेखन अवघड होत चालले आहे. दोन्ही देशांमधील जमातवादी इतिहास लेखनामुळे कायमच एकमेकांच्या विरोधी भूमिका समाजामध्ये प्रसारित होत गेल्या.

## 'माझी जडणघडण परिषद'

''शून्यातून वर येणाऱ्या व्यक्तीची जडणघडण भावी पिढीसाठी ऊर्जाकेंद्र ठरत असते. अशा जडणघडणीबद्दल लिहिणे सर्वांत अवघड असून, त्याकडे साहित्यिकांनी गांभीर्याने पाहण्याची गरज आहे,'' अशी अपेक्षा साहित्यिक उत्तम कांबळे यांनी व्यक्त केली.

मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे मराठी संशोधन केंद्र आणि पदव्युत्तर मराठी विभागातर्फे 'माझी जडणघडण' या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय परिषद झाली. परिषदेचे उद्‌घाटन साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. फ.मुं. शिंदे यांच्या हस्ते झाले. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. गजानन एकबोटे, प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. श्यामकांत

देशमुख उपस्थित होते.

कांबळे म्हणाले, ''आपलेच दु:ख सगळ्यात मोठे असे प्रत्येकाला वाटते, परंतु दु:ख हे दु:खच असते. या दु:खाला जात, धर्म नसतो. जडणघडणीचा परिणाम भविष्यातील कलाकृतीवरही होत असतो. लिहिण्याची ताकदही याच जडणघडणीतून येते. त्यामुळे उद्याच्या माणसाला जगण्याचा धीर देणारे लिखाण जडणघडणीतून झाले पाहिजे.'' डॉ. तावरे यांनी प्रास्ताविक केले.

प्रा. शिंदे म्हणाले, ''माझ्या जडणघडणीचे अधिष्ठान आई आहे. जडणघडण आणि आत्मकथन लिहिण्यासाठी खरे सांगण्याची अट असते.''

''सध्या सगळेच सानेगुरुजी होण्यापेक्षा 'नाणेगुरुजी' झाले आहेत. कोचिंग क्लासेसमुळे विद्यार्थ्यांच्या खिशातून किती शुल्क घ्यायचे याकडे नाणेगुरुजीचे लक्ष असते. मग शिक्षणातून संस्कार रुजणार तरी कसे? आई ही कौटुंबिक शिक्षक असते, तर शिक्षक हा सामाजिक आई असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीकडे शिक्षकाने गांभीर्याने लक्ष द्यावे,'' असे प्रा. फ.मुं. शिंदे यांनी सुचविले.

We dream in narrative, day-dream in narrative, remember, anticipate, hope, despair, believe, doubt, plan, revise, criticize, construct, gossip, learn, hate, love by narrative, In order really to live, we make up stories about ourselves and others, about the personal as well as the social past and future.

- Barbara Hardy, Narrative as a Primary Act of the mind-* 1978 University of London.

**नवे कोरे**

**T- BOOK २४ मधील दुसरे पुस्तक**

शुभ्र फेसाखाली लपलेल्या कडसर चवीच्या
काळ्याशार टर्कीश कॉफीप्रमाणे
ताजेतवाने करणारी कादंबरी

# द प्रॉफेट मर्डर्स

मूळ लेखक - मेहमेत मुरात सोमेर

तुर्की तून इंग्लिश अनुवाद
केनेथ डकन

अनुवाद - जयंत गुणे

**किंमत : २००/-रु.।पोस्टेज : ३०/-रु.**




इस्तंबूलमध्ये काहीतरी विलक्षण घडत आहे. एक पिसाट खुनी मोकाट सुटला आहे आणि शहरातील ट्रान्सव्हस्टाईटचे एकापाठोपाठ एक खून चालले आहेत. प्रत्येक खुनानंतर परिस्थितीचा गुंता वाढत चाललाय. या कथानकाचा नायक हा इस्तंबूलच्या रंगेल जीवनातील एक प्रख्यात असामी असतो. तो दिवसा संगणकतज्ज्ञ व रात्री ट्रान्सव्हस्टाईट असे दुहेरी आयुष्य जगत असतो. दिवस मावळल्यानंतर ओठांना लिस्पटीक लावून तो स्त्रीवेशात या खुनांचा शोध घ्यायचं ठरवतो खरं; पण खुनांच्या मागे असलेल्या माथेफिरू शक्तींचा सामना करणं वाटतं तेवढं सोपं नसतं आणि प्रकरण अंगावर शेकण्याची वेळ येते. कथानायिकेच्या रूपातील आपला कथानायक त्यातून मोठ्या चातुर्याने मार्ग काढतो. ट्रान्सव्हस्टाईट, समलिंगी वेश्यांच्या अनोख्या जीवनावर आधारित विनोदी धाटणीची चातुर्यकथा.

अशा प्रकारचा किंचित चावट पण प्रसंगनिष्ठ व बौद्धिक विनोदी मराठीत प्रथमच येत आहे.

नवे कोरे

T- BOOK २४ मधील तिसरे पुस्तक

# द किस मर्डर




मूळ लेखक
मेहमेत मुरात सॉमर

अनुवाद
जयंत गुणे

**किंमत : २४०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

दिवसा एक बुद्धिमान, साहसी पुरुष आणि रात्री सुंदर नखरेल स्त्री असं दुहेरी आयुष्य जगत असलेली व्यक्ती इस्तंबूलच्या नाइट लाइफमध्ये 'छेलछबेली' म्हणून प्रसिद्ध असते. स्त्रीवेषात ती ऑड्रे हेपबर्नसारखी दिसते. सूर्य मावळताच तिची पावले तिच्या मालकीच्या नाइट क्लबकडे वळतात. एक दिवस तिच्या एका कर्मचाऱ्याचा खून होतो. आपले चातुर्य आणि मार्शल आर्ट पणाला लावून ती खुन्यांचा शोध घेते.

मेहमत मुरात सॉमर यांच्या या धक्कादायक, उत्साहवर्धक आणि शेवटपर्यंत खिळवून ठेवणाऱ्या कादंबरीने रहस्यकथांच्या विश्वात खळबळ उडवून दिली.



# पुरस्कार

## रतन टाटा यांना मानद डॉक्टरेट

भारताचे अग्रगण्य उद्योगपती रतन टाटा यांना सिंगापूर येथील विद्यापीठाने ‘डॉक्टर ऑफ बिझनेस’ ही मानद पदवी बहाल केली. टाटा यांची दूरदृष्टी, समाजाबद्दल असलेली उत्तरदायित्वाची भावना आणि उद्योजकतेस चालना देणारी वृत्ती याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आल्याची माहिती विद्यापीठाने दिली. यापूर्वी सन २००७ मध्ये सिंगापूर सरकारने सन्माननीय नागरिक पुरस्काराने सन्मानित केले होते. केवळ उद्योजक म्हणूनच नव्हे तर एक दानशूर आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून सिंगापूरवासीयांच्या मनात टाटांबद्दल आदर असल्याचे सिंगापूरचे शिक्षणमंत्री केट यांनी पदवी बहाल करताना नमूद केले. सिंगापूर विद्यापीठाचे १०० हून अधिक विद्यार्थी टाटा उद्योगसमूहातील कंपन्यांमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून काम करीत असल्याचे शिक्षणमंत्र्यांनी अभिमानाने सांगितले.

## राजन खान यांना पुरस्कार

अक्षरमानव चळवळीचे प्रमुख राजन खान यांना मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा ‘समाजप्रबोधन’ पुरस्कार जाहीर झाला आहे. अकरा हजार रोख, सन्मानचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा ४४ वा वर्धापनदिन २२ मे रोजी साजरा होत आहे. त्या वेळी पुरस्काराचे वितरण होईल. यानिमित्ताने होणाऱ्या राज्यस्तरीय चर्चासत्रात समाजाचे शैक्षणिक आर्थिक आणि महिलांचे प्रश्न, अल्पसंख्याकांची सुरक्षितता, धर्मनिरपेक्षतेसमोरील आणि समाजासमोरील आव्हाने या विषयांवर चर्चा होणार आहे. डॉ. बी. टी. काझी, प्रा. जमीर शेख, प्रा. अजरुद्दीन पटेल, डॉ. इरफार इंजिनीअर, जावेद आनंद, अब्दुल कादर मुकादम आदी भाग घेतील. मंडळाचे अध्यक्ष सय्यदभाई व प्रा. शमसुद्दीन तांबोळी यांनी ही माहिती दिली.

## फादर दिब्रिटो यांना 'अनुवाद' सन्मान

साहित्य अकादमीचे राष्ट्रीय 'अनुवाद' सन्मान जाहीर झाले. मराठीसाठी फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांना हा पुरस्कार लाभला. एकूण २३ भारतीय भाषांमधील साहित्यकृतींची निवड करण्यात आली. फादर दिब्रिटो यांच्या 'सुबोध बायबल : नवा करार' आणि हेमा नायक यांच्या 'काळी कथा व्हाया बायपास' या पुस्तकांची निवड झाली आहे. ऑगस्टमध्ये या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

## ललित वाङ्मय पुरस्कार

'साहित्य निर्मिती करताना शब्दांच्या भराऱ्या मारण्यापेक्षा जीवनाचे मर्म सांगणे आवश्यक आहे. आजचे साहित्य लघु स्वरूपाचे आणि जीवनाला भिडणारे आहे; त्यामुळे साहित्यिकांनी एकाच साहित्यप्रकारात रमण्यापेक्षा विविध साहित्य प्रकार अजमावून पाहिले पाहिजेत, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केले.

ललित रंगभूमी या संस्थेतर्फे ललित वाङ्मय पुरस्कार यादव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. गझलकार दीपक करंदीकर, अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त शशिकांत केकरे, प्रा. विश्वास वसेकर, संस्थेचे अध्यक्ष कुंडलिक केदारी या वेळी उपस्थित होते.

डॉ. दिलीप कुलकर्णी, रमेश सावंत, जोसेफ तुस्कानो, अशोक तोडणकर, राजन कोनवडेकर, विजय साळवी, अनिल पंडित, जयश्री दानवे, वसंत कुलकर्णी, एकनाथ आव्हाड, सुनंदा उमर्जी, जयश्री बापट, नंदकुमार विजयकर, प्रा. संजय कप्तान यांना उत्कृष्ट साहित्यनिर्मितीसाठी गौरविण्यात आले. यंदा या पुरस्कारांचे दहावे वर्ष आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यांत साहित्यिक कार्यरत आहेत. या साहित्याला व्यासपीठ मिळवून दिल्याचे मत करंदीकर यांनी व्यक्त केले.

आताच्या काळात साहित्याचा जीवनाशी असलेला संबंध कमी होत आहे. घरोघरी टीव्ही आल्याने लोक बेड्या न घालताही त्यापुढे अडकून पडले आहेत. जीवनासहित जाते ते साहित्य. मानवी जीवनाचा भावनात्मक इतिहास मराठी साहित्यामध्ये शब्दबद्ध झाला आहे. 'साहित्यामुळे मन व्यापक होते. आपला नकळत विकास होतो. साहित्य हे जीवनाचे दिशादर्शक आहे; साहित्याचे सुवर्णयुग पुन्हा येण्याच्या दृष्टीने साहित्याची निर्मिती केली पाहिजे,' असेही ते म्हणाले.

## उत्तम कांबळे यांना ‘मायमराठी’ पुरस्कार

तळेगाव दाभाडे (मावळ) येथील साहित्य, कला आणि संस्कृती मंडळाचा पहिला ‘मायमराठी’ पुरस्कार ‘सकाळ’चे संचालक-संपादक व ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांना जाहीर झाला आहे. मराठी भाषा दिनानिमित्त साहित्य सहवास सभागृहात झालेल्या कार्यक्रमात अध्यक्ष ॲड. सहदेव मखामले यांनी ही घोषणा केली.

कार्यक्रमात आरती सावंत-दिवाकर, शंकर सावळे, हेमंत घोडेकर, संदीप पाटील, शैलेश मखामले आणि किरण जाधव यांनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे वाचन केले. ‘जोपर्यंत मराठी पोटापाण्याची भाषा होणार नाही तोपर्यंत तिचा विकास होणार नाही,’ असे ॲड. मखामले म्हणाले. विश्वस्त-सचिव अर्जुन गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रतिभा गुंड यांनी आभार मानले.

## स्वामी समर्थ गौरव पुरस्कार

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातर्फे (अक्कलकोट) आयोजित ‘श्री स्वामी समर्थ पादुका दर्शन सोहळा’ संपन्न झाला. यानिमित्त कर्करोगतज्ज्ञ डॉ. रवींद्र कसबेकर यांना ‘श्री स्वामी समर्थ गौरव पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

मंडळातर्फे पालखी पादुका परिक्रमा सोहळा घेण्यात आला. यंदा या सोहळ्याचे १८ वे वर्ष होते. महापौर चंचला कोद्रे व कमलाकर तपस्वी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. या वेळी पुणे शहर संयोजन समितीचे जनमेजयराजे भोसले, अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, विजय काजळे, विनायक घाटे उपस्थित होते.

## गुरुकुल पुरस्कार वितरण

‘‘आधुनिक स्त्री आर्थिक स्वातंत्र्य मिळवते आहे. स्वत:चे निर्णयही घेते आहे. उद्याची स्त्री यशस्वी होईलही; पण ती सुखी असेल का याची शंका वाटते,’’ अशी भावना निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण यांनी व्यक्त केली.

गुरुकुल प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांच्या वितरणप्रसंगी ‘आजच्या स्त्रीपुढील आव्हाने’ या विषयावर त्यांनी आपले विचार मांडले.

राणी चितळे यांना ‘मुद्रांजली’, उषा जोशी यांना ‘आदर्श गृहिणी’; तर

डॉ. प्रकाश भातंब्रेकर यांना ‘अक्षरभारती’ या पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

त्या म्हणाल्या, “रामायण, महाभारतात स्त्रीसमोर उभे राहाणारे सनातन प्रश्न आजही कायम आहेत. ग्रामपंचायतींतून निवडून येणाऱ्या महिला उमेदवारांचे पतीच त्यांचा कारभार करतात हे वास्तव आहे. अशा वेळी या आरक्षणाचा उपयोग काय, याचाही विचार व्हायला हवा.” अशोक कामत, मुक्ता गरसोळे, श्रीकृष्ण अष्टेकर उपस्थित होते.

## स्त्री साहित्य-कला संमेलन

“चांगले साहित्य समाजाला दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करते,” असे प्रतिपादन माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी स्वानंद महिला संस्था व भारतीय जैन संघटनेतर्फे आयोजित अकराव्या अखिल भारतीय स्त्री साहित्य-कला संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी केले. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. विमल वाणी अध्यक्षस्थानी होत्या. डॉ. कांतिलाल संचेती, महापालिका आयुक्त राजीव जाधव, ‘सकाळ माध्यम समूहा’चे कार्यकारी संपादक (राजकीय) गोविंद घोळवे, पंचम झोनच्या महिलाध्यक्षा रुचिरा सुराणा, उद्योजिका सरिता धाडिवाल, अनिता सोळंकी, कल्पना पठारे, कमला मेहता, स्वागताध्यक्षा रंजना साकला, लीना कटारिया, प्रमिला साकला, कुसुम भंडारी, डॉ. अशोक पगारिया आदी उपस्थित होते.

आर. एम. डी. फाउंडेशनला प्रदान केलेला ‘स्वामी विवेकानंद जीवनगौरव’ पुरस्कार प्रतिभा पाटील यांच्या हस्ते उद्योजक रसिकलाल व शोभा धारिवाल यांनी स्वीकारला. अन्य पुरस्कारांचे वितरण पाटील यांच्या हस्ते झाले. त्या म्हणाल्या, “चांगले साहित्य समाजविघातक प्रवृत्तीवर नेमके भाष्य करते. याउलट उथळ व मनोरंजक साहित्य चिरंतन टिकत नाही; त्यामुळे वाचकांचे केवळ घटकाभर मनोरंजन होते. समाजातील वास्तव चित्र मांडणारे, वाचकांना विचारप्रवृत्त करणारे, अस्वस्थ करणारे साहित्यच खरे साहित्य होय.” प्रा. सुरेखा कटारिया यांनी प्रास्ताविक केले. डॉ. श्वेता राठोड यांनी सूत्रसंचालन केले.

## ‘रोटरी ग्लोबल लीडर एक्सलन्स ॲवॉर्ड’

“आयुर्वेद ही पर्यायी उपचारपद्धती नाही, तर निरामय आरोग्यासाठीची मुख्य जीवनपद्धती आहे.” असे मत ज्येष्ठ आयुर्वेदाचार्य डॉ. श्री. बालाजी तांबे यांनी व्यक्त केले.

रोटरी क्लब ऑफ पुणे अपटाऊनचा 'रोटरी ग्लोबल लीडर एक्सलन्स ॲवॉर्ड' डॉ. तांबे यांना 'रोटरी'चे डिस्ट्रिक्ट गर्व्हनर डॉ. दीपक शिकारपूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

अंध असूनही इतर अंधांच्या जीवनात आनंद फुलविण्यासाठी धडपडणाऱ्या कुलदीप रावळ या तरुणाला 'चिराग ॲवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले.

डॉ. तांबे म्हणाले, ''दिनचर्या बदलली, तर आपण आरोग्यवान होऊ शकतो; पण विस्कळीत दिनचर्येमुळेच वेगवेगळ्या आजारांना सामोरे जावे लागते. आजार झाला म्हणून लगेच शस्त्रक्रिया करून घेतली जाते किंवा प्रतिजैविक औषधे वापरली जातात, असे होऊ नये. आयुर्वेदात काय म्हटले आहे, याचाही विचार व्हावा. आयुर्वेद हे औषध नाही. शेवटी वेदच मनुष्याला पुढे जाऊन आनंदी ठेवणार आहेत. रोगांवर मात करण्यासाठी अन्नपचन चांगले असायला हवे. त्याबरोबरच व्यायाम, योगासने या नियमांचे पालन व्हावे.'' भारताबरोबरच अनेक देशांत आयुर्वेदाचा प्रसार वाढत आहे; पण आपली औषधे परदेशात घेऊन जाताना प्रचंड ताण येत आहे, असेही ते म्हणाले.

## 'कर्तव्यदक्ष स्वानंद भरारी' व 'कर्तृत्ववान माता' पुरस्कार

स्वानंद महिला संस्था व भारतीय जैन संघटना यांच्या वतीने झालेल्या अकराव्या अखिल भारतीय स्त्री साहित्य-कला संमेलनाला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला. विविध क्षेत्रांतील व्यक्तींना राष्ट्रीय पुरस्कार, कर्तव्यदक्ष स्वानंद भरारी पुरस्कार व कर्तृत्ववान माता पुरस्कार वितरण सोहळ्याने संमेलनाचा समारोप झाला.

संमेलनाध्यक्ष लेखिका प्रा. विमल वाणी, स्वानंद महिला संस्थेच्या संस्थापिका प्रा. सुरेखा कटारिया, संचालिका अनिता सोळंकी व अध्यक्ष लीना कटारिया, ऑल इंडिया श्वेतांबर जैन कॉन्फरन्सच्या पंचम झोनच्या अध्यक्ष रुचिरा सुराणा, भारतीय जैन संघटनेच्या जिल्हाध्यक्ष कुसुम भंडारी, कल्पना पठारे, सरिता धाडिवाल, जयश्री चोपडा व्यासपीठावर होत्या.

मद्रास जैन कॉन्फरन्स महिला विभागाच्या अध्यक्ष कमला मेहता यांना राष्ट्रीय महिला भूषण पुरस्कार तर साहित्यिका लीलावती शिंदे यांना राष्ट्रीय साहित्यरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. कर्तव्यदक्ष स्वानंद भरारी पुरस्कारार्थींमध्ये सुमन शिंदे (प्रशासन), मीना फडे (सामाजिक), ललिता

मुथा (औद्योगिक), प्रीती वैद्य (सामाजिक), प्रा. राजन खान (साहित्य), राहुल इंगळे (कला), श्याम बनबेरू (युवा), निशा पाटील (पत्रकारिता), वैशाली तळेगावकर (शैक्षणिक), जयश्री शहा (सामाजिक), सुशीला संचेती (गृहिणी), सुरेखा शहा (औद्योगिक), डॉ. अशोक बोरा (वैद्यकीय) यांचा समावेश आहे, तर कर्तृत्ववान माता पुरस्कार बिजाबाई धाडिवाल, मंगल धोका, शारदा मेहाडिया, कुसुम जैन, राधा बाफना यांना प्रदान करण्यात आला.

संमेलनात मुलाखत, कविसंमेलन, परिसंवाद व सांस्कृतिक कार्यक्रम झाले. कवी उद्धव कानडे यांनी डॉ. कांतिलाल संचेती व समाजसेविका रेणू गावसकर यांची मुलाखत घेतली. कविसंमेलनात कवयित्री मंगल कदम यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. 'नकाराला भिडताना' या विषयावरील परिसंवादात राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण, संमेलनाध्यक्ष वाणी व प्रा. कटारिया सहभागी झाल्या. नकाराला सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सामोरे गेले पाहिजे, असे मत परिसंवादात व्यक्त झाले. डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी निवेदन केले.

सांस्कृतिक कार्यक्रमात रिंकू भळगट, स्नेहल भालेराव, अंजली शहा, पंखुरी गंगवाल, बीना जैन, श्रुती कात्रेला, ताल दीक्षित, दिशा हटकर, अबोली दैठणकर यांनी एकपात्री नाटिका, गायन, वादन, काव्यसादरीकरण, कथाकथन कसा कलाविष्कार सादर केला. शालेय विद्यार्थिनींनी नाटिका तर महिलांनी गुजराती नृत्य व महाराष्ट्राची लोकधारा कार्यक्रम सादर केला. ऑल इंडिया श्वेतांबर जैन कॉन्फरन्सच्या वतीने प्रा. सुरेखा कटारिया यांना मानपत्र प्रदान देण्यात आले.

डॉ. श्वेता राठोड, पूनमचंद जैन, रुची गांधी, नम्रता राठोड, डॉ. प्रियांका लुणावत, भक्ती सवाने यांनी सूत्रसंचालन केले. शोभा भागवत यांनी आभार मानले. राजश्री बिनायकिया, वीणा दशपुते, अनिता डबीर, नंदा लुंकड, अनिता नहार, शलाका कटारिया, सुनीता लुणावत यांनी संयोजन केले.

## 'स्त्रियांच्या सबलीकरणाची गरज'

शहरातील स्त्री निर्भयपणे वावरत असली, तरी ग्रामीण भागातील स्त्रियांचे सक्षमीकरण होण्याची गरज आहे. ती स्वावलंबी होऊन आर्थिकदृष्ट्या स्थिर झाल्यास समाज प्रगतीपथावर जाईल, असा सूर

'आजची स्त्री अबला की सबला?' या परिसंवादात व्यक्त करण्यात आला.

साहित्य संघ, पुणे दक्षिण या संस्थेने हा परिसंवाद आयोजित केला होता. माधवी आपटे, विजय सातपुते, सुभाष कर्णिक, अंजली देशपांडे, डॉ. प्रवीण पगारिया यांनी या परिसंवादात सहभाग घेतला. विश्वास गांगुर्डे, डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी उपस्थित होते.

'स्त्रियांनीच स्त्री शिक्षण, अर्थार्जनाला पाठिंबा देण्याची गरज आहे. स्त्री एकटी राहूनही स्वत:च्या बळावर यशस्वी होऊ शकते,' असे मत या वेळी मांडण्यात आले. याच विषयावर विनोदी कविता सादर करून सम्राट नाईक यांनी उपस्थितांची दाद मिळविली. नारायण मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले.

## 'ग्रॅव्हिटी'ला ऑस्कर

'सेव्हिंग मिस्टर बँक्स', 'ब्ल्यू जॅस्मिन', 'बटलर', 'हर', 'इनसाइड लुविन डेव्हिस' यांसारख्या सिनेमांना मानांकनात विशेष जागा न दिल्यानं यंदाच्या ऑस्करच्या निवडीवर प्रचंड टीका झाली होती. शिवाय नऊ चित्रपट बेस्ट फिल्मच्या स्पर्धेत होते, हेही नाराजीचं आणखी एक कारण होतं. पण त्यामुळे नेमक्या कोणत्या सिनेमाला 'बेस्ट पिक्चर' पुरस्कार मिळणार, याची उत्सुकता ताणली गेली होती. यात 'ग्रॅव्हिटी'ला सर्वाधिक मानांकने मिळाली, तसे पुरस्कारही मिळाले. दिग्दर्शक अल्फान्सो क्युरॉन यांनी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक या मानाच्या पुरस्कारासह एडिटिंगचा असे दोन पुरस्कार पटकावले. 'ग्रॅव्हिटी' या सिनेमाच्या वाट्याला व्हिज्युअल इफेक्ट्स, साऊंड मिक्सिंग, साऊंड एडिटिंग, एडिटिंग, सिनेमॅटोग्राफी, ओरिजनल म्युझिकल स्कोअर असे पुरस्कार आले. ग्रॅव्हिटीनं पुरस्कारांच्या संख्येत बाजी मारली असली तरी बेस्ट फिल्म ठरलेल्या '१२ इअर्स ए स्लेव्ह'ची चर्चा सोहळाभर होती. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर परंपरेप्रमाणे सिनेमाचा निर्माता स्टेजवर येणं अपेक्षित होतं. पण ब्रॅड पीटनं सिनेमाचा दिग्दर्शक स्टीव्ह मॅक्वीनसह अख्ख्या टीमला स्टेजवर बोलावलं. आभाराचं भाषणही मॅक्वीननं केलं. यावेळी आजही गुलामगिरीचं जिणं जगत असलेल्या कृष्णवर्णीयांना हा पुरस्कार समर्पित करत असल्याचं त्यानं जाहीर केलं. त्यामुळे वातावरण भावनावेगानं स्तब्ध झालं, पण लगेचच उड्या मारत मॅक्वीन लहान मुलाप्रमाणे आपला आनंद व्यक्त करत असताना पाहून सभागृह कौतुकानं भारावलं. ऑस्कर पुरस्कार सोहळ्याचा असा समारोप यापूर्वी कधीच झाला

नव्हता.

लिओनार्दो द कॅप्रिओचा निर्माता म्हणून यशस्वी ठरलेला 'द ग्रेट गॅट्स्बी' मानांकनाच्या यादीत फार स्थान मिळवू शकला नाही. या सिनेमाला प्रॉडक्शन डिझाइनचं ऑस्कर मिळालं; पण 'द वूल्फ ऑफ वॉल स्ट्रीट'साठी अभिनेत्याचा पुरस्कार मिळण्याची आशा सोहळ्यापूर्वीच मॅथ्यू मॅकॉन्वेनं धुळीला मिळवली होती. लिओला एकाहून एक सरस भूमिका देऊ करणाऱ्या मार्टीन स्कॉर्सेस्कीस यांना झालं नसेल एवढं दु:ख लिओच्या चाहत्यांना हा पुरस्कार न मिळाल्यानं झालं आहे, हे मात्र नक्की.

पीटर ओ टूल, शर्ली टेम्पल, फिलीप सेमूर हाफमन यांसारख्या अनेक कलाकारांबरोबर रूथ झाबवाला यांनाही श्रद्धांजली वाहण्यात आली. मूळच्या जर्मन असलेल्या रूथ यांनी भारतीय सायरस झाबवाला यांच्याशी विवाह केला. त्या चोवीस वर्ष भारतात राहिल्या. हीट अँड डस्टसारख्या कलाकृतीसह आयव्हरी मर्चंट प्रोडक्शनसाठी त्यांनी पटकथा लिहिल्या. बुकर आणि ऑस्कर विजेत्या रूथ झाबवाला यांचं भारताशी कायम नाते राहिले. गेल्याच वर्षी न्यूयॉर्कमध्ये त्यांचे निधन झाले. त्यांचीही आठवण जागवली गेली.

चित्रपटसृष्टीमध्ये सर्वांत मानाच्या समजल्या जाणाऱ्या ८६ व्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्यामध्ये जाहीर झालेले प्रमुख पुरस्कार पुढीलप्रमाणे -

**सर्वोत्कृष्ट अभिनेता :** मॅथ्यू मॅकॉन्वे (डल्लास बायर्स क्लब)
**सर्वोत्कृष्ट अभिनेत्री :** केट ब्लँचेट (ब्ल्यू जॅस्मिन)
**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक :** अल्फान्सो क्युरॉन (ग्रॅव्हिटी)
**व्हिज्युअल इफेक्ट्स :** ग्रॅव्हिटी
**बेस्ट साऊंड मिक्सिंग :** ग्रॅव्हिटी
**बेस्ट साऊंड एडिटिंग :** ग्रॅव्हिटी
**बेस्ट सिनेमॅटोग्राफी :** ग्रॅव्हिटी (इमॅन्युअल लुबेझ्गी)
**बेस्ट एडिटिंग :** ग्रॅव्हिटी (अल्फान्सो क्युरॉन, मार्क सँगर)
**सर्वोत्कृष्ट साहाय्यक अभिनेता :** जॅरेड लेटो (डल्लास बायर्स क्लब)
**सर्वोत्कृष्ट साहाय्यक अभिनेत्री :**
ल्युपिता नियांगो (१२ इयर्स अ स्लेव्ह)
**बेस्ट ॲनिमेटेड फिचर :** फ्रोजन
**बेस्ट लाईव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म :**
हेलियम (अँडर्स वॉल्टर, किम मॅग्नसन)

**बेस्ट ॲनिमेटेड शॉर्ट फिल्म :** मि. हुब्लॉट
**सर्वोत्कृष्ट वेशभूषा :** द ग्रेट गॅट्स्बी (कॅथरिन मार्टिन)
**बेस्ट डॉक्युमेंटरी फिचर :** २० फीट फॉर्म स्टारडम
**बेस्ट डॉक्युमेंटरी शॉर्ट - द लेडी इन नंबर ६ :**
म्युझिक सेव्हड माय लाईफ
**बेस्ट फॉरेन लँग्वेज फिल्म :** द ग्रेट ब्युटी (इटली)
**बेस्ट मेक अप आणि हेअरस्टायलिंग :** डल्लास बायर्स क्लब
**बेस्ट ओरिजनल साँग :**
क्रिस्टन अँडरसन - लोपेझ आणि रॉबर्ट लोपेझ
**बेस्ट ओरिजन स्कोअर :** स्टिव्हन प्राइस (ग्रॅव्हिटी)

## विंदा करंदीकर पुरस्कार

मराठी राजभाषा दिनी साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांना राज्य सरकारचा 'विंदा करंदीकर पुरस्कार' आणि 'श्री. पु. भागवत पुरस्कार' ज्येष्ठ प्रकाशक दिलीप माजगावकर यांच्या 'राजहंस प्रकाशना'ला देण्यात आला. सरकारच्या मराठी भाषा विभागाच्या साहित्य-संस्कृती मंडळामार्फत दर वर्षी हे पुरस्कार देण्यात येतात.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिरात पुरस्कारांचे वितरण झाले. डहाके म्हणाले, ''साहित्य क्षेत्रात विंदा'चे नाव, त्यांचे स्थान खूप मोठे आहे. त्यांच्या नावाचा हा पुरस्कार म्हणजे मोठा गौरवच आहे.'' माजगावकर म्हणाले, ''श्रीपु' हे माझे आदर्श संपादक प्रकाशक होते. त्यांच्या वाटेवरून जाण्याचा मी प्रयत्न करत आहे.''

## राज्य नाट्य स्पर्धेत 'चिंधीबाजार' विजेते

निवेदिता चंद्रपूर या संस्थेच्या 'चिंधीबाजार' या नाटकाने दिग्दर्शनाच्या पारितोषिकासह ५३व्या राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रथम क्रमांक पटकावला. पुण्याच्या आकांक्षा रंगभूमी या संस्थेच्या 'हिजडा' या नाटकाला द्वितीय आणि अभिनय, कल्याण या संस्थेच्या 'लेझीम खेळणारी पोरं' या नाटकाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.

सांस्कृतिक कार्य संचालनायातर्फे अंतिम फेरीचा निकाल जाहीर करण्यात आला. १७ ते २२ फेब्रुवारीदरम्यान नागपूरला झालेल्या अंतिम फेरीमध्ये २१ नाट्य संस्थांनी सादरीकरण केले. शफी नायकवडी, प्रतिभा

कुलकर्णी, विलास गुर्जर, वीणा भूकर, गिरीश पांडे यांनी अंतिम फेरीचे परीक्षण केले. पुण्याच्या 'हिजडा' नाटकाला आठ वैयक्तिक पारितोषिके मिळाली. दिग्दर्शनासाठी सागर लोधीला प्रथम, नेपथ्यासाठी सतीश सांडीभोरला द्वितीय, अकबर शेखला प्रकाशयोजनेसाठी तृतीय, सचिन थोरातला रंगभूषेसाठी द्वितीय आणि जितेंद्र रोकडेला संगीत दिग्दर्शनासाठी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तसेच जमीर कांबळे, अमोल मठे, अभिराज काटकर यांना अभिनय नैपुण्यासाठी गौरविण्यात आले.

## शिवस्फूर्ती पुरस्कार

पुराणकाळात वावरणाऱ्या समाजाला त्यातून बाहेर काढण्यासाठी तर्कबुद्धीचा वापर करीत छत्रपती शिवाजी महाराजांनी अंधश्रद्धा, वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्था मोडीत काढली, असे मत अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मून समितीचे अध्यक्ष प्रा. श्याम मानव यांनी व्यक्त केले.

शिवस्फूर्ती प्रतिष्ठानतर्फे मानव यांच्या हस्ते इतिहास संशोधक प्रमोद मांडे यांना शिवपुत्र छत्रपती शंभूराजे पुरस्कार आणि आंततराष्ट्रीय खेळाडू इंदिरा गायकवाड यांना महाराणी ताराराणी पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रतिष्ठानच्या अंधश्रद्धा निर्मूलन विशेषांकाचे आणि ज्ञानेश्वर मोळक यांच्या 'शिवशंभूतीर्थ साकारताना' या पुस्तकाचे प्रकाशन या वेळी झाले. शिवपुत्र राज्यस्तरीय वास्तुविशारद स्पधेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

मानव म्हणाले, चातुर्वर्ण्य आणि जातिव्यवस्थेमुळे भारताला १३०० वर्षे गुलामगिरीत राहावे लागते. हे ध्यानात घेऊन शिवाजी महाराजांनी या व्यवस्था मोडीत काढल्या. अन्यायाने पिचलेल्या शेतकऱ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना शेती करण्यास प्रवृत्त केले. वतनदारी बंद करणे, स्त्रियांना सन्मानाची वागणूक देणे, उत्तम प्रकारे करवसुलीची योजना राबविणे या गोष्टींना प्राधान्य देणारे शिवरास हे अंधश्रद्धेच्या विरोधामध्येच होते. त्यामुळे त्यांनी अनेक मोहिमा अमावस्येच्या रात्रीच फत्ते केल्या. शिवरायांची दूरदृष्टी, वैज्ञानिक दृष्टिकोन यामुळेच स्वराज्याची स्थापना होऊ शकली. शिवस्मारकाबाबत सरकार हजारो कोटींची उड्डाणे घेण्याची घोषणा करीत आहे. मात्र प्रत्यक्षात काहीच होताना दिसत नाही. अशी खंत नितीन देसाई यांनी व्यक्त केली.

## डॉ. सायरस पूनावाला यांना पुण्यभूषण पुरस्कार

पुण्यभूषण फाउंडेशन आणि त्रिदल पुणे यांच्यातर्फे प्रसिद्ध उद्योजक आणि पूनावाला ग्रुपचे डॉ. सायरस पूनावाला यांना यंदाच्या पुण्यभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. कसबा गणपती आणि तांबडी जोगेश्वरी या ग्रामदैवतांच्या प्रतीकांसह सोन्याच्या फाळाने पुण्यभूमी नांगणारे बालशिवाजी असे स्वरूप असलेले स्मृतिचिन्ह आणि एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

रोगप्रतिबंधक लस उत्पादन, अश्व पैदास, इमारत बांधकाम आणि आर्थिक क्षेत्रात योगदान देत पुण्याचे नाव जगभर पोहोचविणाऱ्या डॉ. सायरस पूनावालांना लोकसभा निवडणुकीनंतर होणाऱ्या कार्यक्रमात पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

१९६३ मध्ये वाणिज्य शाखेची घेतलेल्या सायरस पूनावाला यांनी १९८८ मध्ये पुणे विद्यापीठाची पीएच.डी संपादन केले. त्यांनी १९६६ मध्ये सिरम इन्स्टिटयूट ऑफ इंडियाची स्थापना एक लघुउद्योग म्हणून केली. जगातील अग्रगण्य रोगप्रतिबंधक लसी उत्पादक म्हणून या संस्थेची गणना होते. जगभरातील एकूण अर्भकांच्या संख्येपैकी ६० टक्क्यांहून अधिक अर्भकांचे संरक्षण या लसीमुळे होते. अत्यंत वाजवी दरात उपलब्ध करून दिली जाणारी ही लस जगातील तीनपैकी एका अर्भकाला दिली जाते. आरोग्य क्षेत्रातील या कार्याबद्दल पूनावाला यांना पद्मश्री किताबाने गौरविण्यात आले होते. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या हस्ते त्यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

जगातील सर्वांत प्रभावी ७ व्हॅक्सीन अग्रणीपैकी एक अशा शब्दात बिल गेट्स यांनी पूनावाला यांची ओळख करून दिली आहे. अश्व शर्यती आणि अश्व उत्पादन क्षेत्रात डॉ. पूनावाला हे टर्फ ॲथॉरिटीज ऑफ इंडियाचे दीर्घकाळ अध्यक्ष होते. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ टर्फ रेसिंग ॲथॉरिटीज या जागतिक शिखर समिती अध्यक्षांच्या हस्ते फ्रान्समध्ये त्यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. सिरम इन्स्टिटयूट ऑफ इंडियातर्फे जगभरातील विविध सेवाभावी संस्थांना १०० दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक रकमेचा देणग्या दिल्या आहेत.

नवे कोरे

# ...तरीही जिवंत मी!

मूळ लेखिका
सुआद


अनुवाद
गौरी केळकर

**किंमत : २५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




ही सुआद नावाच्या पॅलेस्टिनी तरुणीची कहाणी आहे. एखाद्या मुलाकडे नुसतं पाहिलं किंवा त्याच्याशी बोललं म्हणून नावं ठेवणाऱ्या संकुचित आणि पुरोगामी पॅलेस्टिन समाजात एक तरुण सुआदला लग्नाचं वचन देऊन फसवतो. याची कठोर शिक्षा सुआदला मिळते आणि तिच्या पोटात वाढत असलेल्या बाळासह तिला जिवंत पेटवून दिलं जातं. ऑनर क्राइमच्या या क्रूर अनुभवातून सुआद वाचते. समाजसेवी संघटनेच्या एका कार्यकर्तीमुळे सुआदला जीवनदान मिळते आणि युरोपात तिचं नवं आयुष्य सुरू होतं. बालपणी सोसलेला कमालीचा छळ, गुरासारखा खाल्लेला मार, मरेस्तोवर केलेलं काम आणि दुसरीकडे, युरोपातल्या पुढारलेल्या समाजातलं जीवन, आगीच्या खाणाखुणा अंगावर वागवत जिणं, नवरा व मुलांकडून प्रेम, मानसिक आधार अशी सुआद डोंगराएवढं धाडस करून आपली कथा सगळ्या जगापुढे मांडते. तिच्यासारखा प्रसंग ओढवलेल्या मुलींना धीर देण्याचा प्रयत्न करते. हा तिचा प्रवास काळजाला घर पाडणारा, त्रासदायक आहे पण त्याला धैर्याची, माणुसकीची, इच्छाशक्तीची, सहनशक्तीची प्रेरक झालरही आहे.

## २री आवृत्ती




**लेखक**
**सचिन पिळगांवकर**

**शब्दांकन**
**अभिजीत पेंढारकर**

**किंमत : ४५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**


# हाच माझा मार्ग...

बालकलाकार 'मास्टर सचिन'....
सहजसुंदर अभिनय करणारा हिरो...
जबरदस्त परफार्मन्स देणारा....
नवोदितांना आपुलकीने मार्गदर्शन करणारा महागुरु
हिंदी चित्रपटसृष्टीत अभिमानाने 'मराठी मुद्रा'
उमटविणारा कलावंत...
आजवर आपण सचिनला अभिनेता, दिग्दर्शक,
पटकथाकार, नृत्यदिग्दर्शक, संकलक, निर्माता,
गायक, संगीतकार अशा भूमिकांमध्ये
मोठ्या तसेच छोट्या पडद्यावर पाहिलं आहे.
अशा विविध क्षेत्रात काम करताना त्याला
कोणकोणते अनुभव आले,
त्याची सुवर्णमहोत्सवी कारकिर्द कशी बहरली,
मुलगा-भाऊ-पती-वडील-मित्र या भूमिका त्याने
कशा पार पाडल्या, त्याचं पडद्यामागचं आयुष्य कसं आहे,
याबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता तुम्हाला नक्कीच असेल,
म्हणूनच सचिन शरद पिळगांवकर याच्या
आयुष्याच्या प्रवासाची ही पटकथा...




# माझ्या लाडक्या लेकींसाठी

## आई आणि लेक यांच्यातील भावबंधांची सहृदय गुंफण




लेखक : ख्रिस हॉर्वर्ड

बायबलमधील वचने : ली ॲन वीस

पृष्ठे ८२ । किंमत ` ९० । पोस्टेज ` ३० । सभासदांना सवलतीत

ख्रिस हॉवर्ड यांनी आपल्या दोन मुलींसाठी बायबलमधील दहा आदेशांच्या अनुषंगाने 'हग्ज फॉर डॉटर्स' हे एक अभिनव पुस्तक तयार केले आहे. कोरी (जन्म - २४ ऑक्टोबर १९७३) आणि ॲश्ले (जन्म - १ मार्च १९७८) या त्यांच्या दोन मुली. कोरी प्रेमळ मनाची, हळुवार हृदयाची, तर ॲश्लेच्या डोळ्यांत तेजस्वी चमक आणि पावलांत चपळता. या दोन मुली आपल्या केवळ मुली नव्हेत, तर ईश्वरी कृपा आहेत आणि आपल्या जीवलग मैत्रिणी आहेत, अशी त्यांची भावना आहे. ती भावना 'ख्रिस'मधील काव्यात्म भावनांनी अनावर ओसंडून जाताना दिसते, ती आवेगाने प्रकट होते आणि आपल्याला झपाटून, मंत्रमुग्ध करून जाते.

''मी तुझ्याबरोबर आहे; मी तुझे रक्षण करीन. तुझ्यावर मी प्रेमाचा वर्षाव करीन. तुझ्यामुळे मला खूप आनंद मिळतो. तसाच तो माझ्यामुळे तुलाही मिळत राहो. माझ्या संकल्पना अचूक आहेत. तुझ्या हृदयाला त्या आनंद देतील; माझे आदेश तुला प्रफुल्लित करतील आणि तुझी उत्तमोत्तम गोष्टींची अपेक्षा-इच्छा मी नक्कीच पूर्ण करीन.'' असे प्रारंभीच 'तुझा आश्रयदाता परमेश्वर' स्पष्ट आश्वासन देतो. (२)

आपल्या मुलीला मिळालेले चमकदार निळे डोळे, हनुवटीवरची खळी, केसांचा नैसर्गिक कुरळेपणा हे सर्व आपल्यामुळे असे ही आई म्हणते, पण तिचे सोनेरी केस, धावाधाव करणे, मासे पकडणे, जमीन उकरून किडे काढणे हे संस्कार वडिलांकडून आले – हेही आई मान्य करते. त्याचप्रमाणे तिच्या नाकाचा शेंडा वर आहे, खाली नाही; ती सुरेल गाते, ती कधी संतापत नाही; त्यामुळे ती काही आईसारखी नाही, अशीही कबुली ही ती देते. म्हणूनच आपल्या मुलीला परमेश्वराची मुलगी मानून तिच्या जडणघडणीचे सर्व श्रेय ही आई परमेश्वराला देऊन टाकते. ''देवाचे आपल्या मुलीवर प्रेम आहे; एवढेच नव्हे तर त्यानेच मुलीला आपले जीवन दिले.'' तिचे आई-वडीलही त्यानुसार वागतात, असे ही आई म्हणते. (१)

'बायबल'मध्ये म्हटले आहे, ''माझ्या भाग्यवान मुली, तुझ्या जन्माच्या आधीच तुझ्या आयुष्यातील प्रत्येक दिवसाचे नियोजन मी केले होते. त्यासाठी काही योजना मी केल्या आहेत. त्या तुझ्याद्वारे प्रामाणिकपणे पूर्ण करताना मला पाहात राहा.'' (१४)

ईश्वर पुढे म्हणतो, ''माझ्या अद्वितीय मुली, मी तुला स्वर्गीय सौंदर्याने घडवले आहे. माझी आणि इतरांची सेवा करण्यासाठी काही विशेष गुण तुला

बहाल केले आहेत. तू माझी एक उत्तम कलाकृती आहेस. तुझी निर्मिती मी ठरवलेली सत्कृत्ये करण्यासाठी आहे. काहीतरी वेगळे करण्यासाठी, त्यासाठी तुला श्रेष्ठ बनविण्यासाठी माझ्या अथांग कृपेच्या प्रवाहाचे ओघ सतत तुझ्याकडे येत राहातील.'' (२४)

''माझ्या लाडक्या मुली, मी तुला माझ्या तळहातांवर कोरले आहे. तुला मुक्तीच्या सात्त्विक पोशाखात सजवले आहे. माझ्या प्रेमामुळे मी तुला ख्रिस्तात सामावले आहे. तू माझे भूषण आहेस. तुझ्याबरोबर असलेला माझा करार चिरंतन स्मरणीय राहील.'' (३६)

''माझ्या सुंदर मुली, तू सर्वोत्कृष्ट आहेस. अंधारातून माझ्या विलक्षण प्रकाशात येण्यासाठी मी तुला साद घालत आहे. खऱ्या मनाने माझा धावा कर. मी लगेच तुझ्याकडे धावत येईन. तुझ्याकडून जे काही मला पार पाडायचे आहे, ते स्वप्नापलीकडचे आहे. तू थक्क होशील. सर्व काही शक्य आहे. एक निर्माता म्हणून तुझी निर्मिती करताना माझ्या काही आशा-अपेक्षा नक्कीच आहेत.'' असे परमेश्वर तिला सांगतो. (४८)

''माझ्या मुली, तू माझी कन्या असे म्हणून मी तुझ्यावर माझ्या प्रेमाचा भरभरून वर्षाव केला आहे. तुझ्या मनात येणारा प्रत्येक विचार मला आधीच ठाऊक आहे. तुझी गुपितेही मी जाणतो. तू नाकारली जाशील अशी तुला जी भीती वाटते ती अनाठायी आहे. तुझ्यावर प्रेम करण्यापासून मला कोणीही कधीही रोखू शकणार नाही. तू कोठेही जा, मी नेहमीच तुझ्या सांगाती असेन. तुझ्यावर माझे अखंड प्रेम राहील. तुझ्याबद्दल नेहमीच माझ्या मनात सद्भावना असतील.'' (५८)

''माझ्या लाडक्या मुली, या पृथ्वीवरील प्रत्येक प्राणिमात्राला विविध आपत्ती आणि दु:ख व यातना यांमुळे चालना मिळते. पण तू निश्चिंत राहा. मी तुला कधी सोडणार नाही. कधी टाकणार नाही. तू कोणत्याही परिस्थितीत असलीस तरी मी तुझ्यापुढे, तुझ्याबरोबर, तुझा मदतनीस म्हणून असेन. अफाट वैभवाचा मी धनी आहे. तुझ्या सर्व प्रामाणिक आणि रास्त गरजा पूर्ण करण्यासाठी तू माझ्यावर विश्वास टाकू शकतेस.'' (६८)

मुली आणि पालक यांच्यातील हा थेट संवाद बायबलमधील विधानांच्या अधिष्ठानावर उभा आहे. ही वचने शोधण्याचे परिश्रम लीॲन व्हीस याने केले. आपल्या मुलीला आश्वस्त करण्यासाठी, तिच्या आत्मविश्वासाला आणि अस्मितेला बळ देण्यासाठी, तिची आत्मप्रतिमा

सुदृढ करण्यासाठी, अडीअडचणींत आपण एकाकी नसू, असा भक्कम दिलासा देण्यासाठी ही सुवचने उपयुक्त आहेत, यात शंकाच नाही.

या वचनांच्या अनुषंगाने ख्रिस हॉवर्ड या लेखिकेने स्वत:चे थोडे भाष्य करून त्या त्या वचनातील संदेश अधोरेखित करणारी काही उदाहरणे दिली आहेत. बेब (८ ते ११), या अंगठीबरोबर (१८-२१), साहस (२८-३३), चॅपेलमध्ये जाणे (४०-४४), मेरी ॲलिसच्या वाढदिवसाची मेजवानी (५२-५५), रशियाला प्रेमपूर्वक (६२-६५), चहा कोण घेणार (७२-७५) या कथा किंवा हकिकती वाचनीय आणि उद्‌बोधक आहेत.

फिडल, बेंजो व पियानोसारखी वाद्ये लीलया वाजवणारी, लालसर लांब केसांची, निळ्याशार डोळ्यांची, युवराज्ञीसारखी दिसणारी बेब दयाळू, हळुवार, सहनशील, प्रेमळ, आतिथ्यशील होती. १८ ऑक्टोबर १९५२ रोजी पती क्लिफ आणि नऊ वर्षांची मुलगी सॉँड्रा यांच्यासह बेब आपल्या जीन नावाच्या दुसऱ्या मुलीला भेटायला कारने निघाली. सॉँड्रा आपल्या बाहुलीबरोबर खेळत होती. पण वाटेत अचानक एक कार समोरून आली आणि बेबच्या कारला धडकली. ड्रायव्हर क्लिफ स्टीअरिंग व्हीलखाली चेपला गेला. बेबने नऊ वर्षे वयाच्या सॉँड्रावर आपले शरीर जणू पांघरुणासारखे पसरले. लोकांनी खिडकीच्या काचा फोडून बेबला आणि सॉँड्राला बाहेर काढले. सॉँड्रा रक्तबंबाळ झाली होती, रडत होती; ती वाचली होती. बेब मात्र मरण पावली होती. 'आईच्या प्रेमाचे महान उदाहरण' म्हणून ख्रिसने ही कहाणी सांगितली आहे.

जेफ-ॲलिसन हे तरुण जोडपे. ॲलिसन गरोदर. ती बाळंत होते. मुलगी होते. तिचे वजन फक्त नऊशे ग्रॅम... एका महिन्याने हे वजन वाढण्याऐवजी शंभर ग्रॅमनी कमी झाले... हृदयातील व्हॉल्व दुरुस्त करण्यासाठी शस्त्रक्रिया... परमेश्वराने ॲमीला वेदनामुक्त करावे, जे घडेल ते सोसण्याची ताकद द्यावी यासाठी जेफ-ॲलिसन परमेश्वराची करुणा भाकत राहतात... ॲमीचे वजन तिसऱ्या महिन्यात चार पाउंड अकरा औंस होते... खूप देखभाल करावी लागते. पण ॲमी जगते. मोठी होते. बाइक चालवू लागते. बास्केटबॉल खेळू लागते. ती सोळा वर्षांची होते तेव्हा जेफ ॲलिसनच्या बोटातील अंगठी काढून ॲमीला भेट देतो. ''ही अंगठी तुला देऊन आम्ही पुन्हा एकदा आमचे जीवन तुला समर्पित करतो. तू आता तारुण्यात पदार्पण करीत आहेस. ही अंगठी तुझ्या शारीरिक वाढीचे प्रतीक आहे. तुझ्यावरच्या आमच्या समर्पण भावनेचे ते प्रतीक आहे.''

आपली टीनएजर मुलगी ॲनी हिच्या डॉमिनेटिंग, बॉसिंग करण्याच्या प्रवृत्तीमुळे करेन आणि डेनिस हे दांपत्य चिंताग्रस्त असते. या मुलीच्या डेटिंगबाबत विशेष सावधगिरी घ्यायला हवी, असे ते मानत. पॉल नामक सामान्य गुणवत्ता असलेल्या तरुणाच्या बाबतीत ॲनी रस घेते हे कळल्यावर त्यांना धक्काच बसतो. एका सुटीत ॲनी एका कँपला जाते. सहा आठवड्यांचे हायकिंग. यूथ मिनिस्टर पहिल्याच दिवशी मुलांना सांगतो, ''प्रत्येक शिबिरार्थ्याने एक छोटा दगड शोधून आणावा. हा दगड म्हणजे तुमच्या आयुष्यातला एक अडथळा... हा सतत बरोबर ठेवा. शिखरावर पोचल्यावर हा दगड तेथेच सोडून द्या आणि परतीचा प्रवास सुरू करा.''

या गिर्यारोहणात पॉल ॲनीला प्रोत्साहन देत होता. मदत करीत होता.

ॲनी – पॉल यांच्यातील मैत्रीची भावना ॲनीच्या आईला जाणवली. पॉलबद्दलचा दुरावा दूर झाला. ॲनी आणि तिची आई यांच्यातील गैरसमजही कमी झाले. ते अडथळ्याचे दगड शिखरावरच सोडून आल्याने त्यांच्यातील प्रेमाला रोखणारे ओझे आता मानगुटीवरून उतरले होते.

जेनिस चौदा वर्षांची असताना तिचे गर्भाशय काढून टाकावे लागले. जेनिसचे कॉलेज शिक्षण संपले. पुढे लग्न करायचे ठरले. तिने आपल्या प्रियकराला स्पष्ट कल्पना दिली. त्याने म्हटले, आपण दत्तक घेऊ. जेनिसला वाटले, ज्याच्याबरोबर आपण सगळे आयुष्य व्यतीत करू शकू असा हाच माणूस आहे. लग्नानंतर त्यांनी दत्तक संस्थेशी संपर्क साधला. रशियातील अनाथाश्रमातील एका मुलीला ते पसंत करतात. तिला दत्तक घेतात. तिची आई म्हणत असे, तसेच घडले. ''परमेश्वर व्यवस्था करील.''

बायबलमधील काही सुवचनांच्या आधारे एकूणच आयुष्याला नवा अर्थ प्राप्त होतो. जगण्यासाठी नवे बळ मिळते. आई आणि मुलगी यांच्यात संवादी नाते निर्माण होते. काव्यात्म आणि उत्कट आशयामुळे हे छोटेसे पुस्तक हृदयाला साद घालते.



''वाङ्मय मानवी जीवनाकडे पाहाण्याची
अंतर्दृष्टी आपल्याला देते
आणि मानवी जीवनव्यवहाराला
विशिष्ट दिशा देते.''


नवे कोरे

# तिसरा नवरा नको गं बाई

मूळ लेखिका
लिसा स्कॉट्टोलाईन

अनुवाद
शोभना शिकनीस

**किंमत : २९०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**





स्त्रियांनो, हे पुस्तक तुमच्यासाठी आहे.
या लेखनाची शैली आहे अनौपचारिक, गप्पा मारल्यासारखी.
यातून लेखिका विनोदी शैलीत तिच्या आयुष्यात घडलेले घटना-प्रसंग तुमच्याशी शेअर करते, गंभीर विषयांना हात घालते. हे शेअरिंग करताना प्रत्ययास येणारा तिचा हजरजबाबीपणा आणि शहाणपणा अचंबित तर करतोच, पण अंतर्मुखही करतो.
एके ठिकाणी ती म्हणते, 'प्रत्येकाकडे त्याची अश्लीलता असते आणि रिअल इस्टेटच्या जाहिराती हे माझं अश्लील साहित्य आहे!' किंवा 'माता या एक नैसर्गिक शक्ती आहेत आणि पर्यायी इंधनही!'
सुज्ञ, चटपटीत, संवेदनशील, विनोदी, तसंच चटका लावणारं, प्रेमाने हळुवारपणे स्पर्श करणारं हे पुस्तक आंबट-गोड-तिखट अशा विविध चवीच्या पदार्थांची मेजवानी आहे!




# ट्रू ब्लू

कॅनडातील दोन शाळकरी मैत्रिणींच्या जीवनातील भयानक वादळाची कहाणी




लेखिका : डेबोरा एलिस

अनुवाद : श्यामला पेंडसे

पृष्ठे १५२ । किंमत ` १५० । पोस्टेज ` ३० । सभासदांना सवलतीत

द ब्रेडविनर, परवानाचा प्रवास, मडसिटी आणि माय नेम इज परवाना या अफगाणिस्तानच्या पार्श्वभूमीवरील कादंबरी चतुष्ट्यामुळे डेबोरा एलिस हे नाव जनमानसात मान्यता पावले. या कादंबऱ्या बेस्टसेलर ठरल्या. वीस-पंचवीस भाषांत अनुवादित झाल्या. या कादंबऱ्यांच्या लक्षावधी रुपयांच्या मानधनाचा वापर डेबोरा एलिसने 'वुमन फॉर वुमन' आणि 'स्ट्रीट किड्स इंटरनॅशनल' या दोन सेवाभावी संस्थांसाठी करून शेकडो महिलांच्या आणि अनाथ मुला-मुलींच्या निवाऱ्याची, शिक्षणाची आणि उदरनिर्वाहाची व्यवस्था केली. वुमन फॉर वुमन या संस्थेतर्फे युद्धग्रस्त अफगाणिस्तानातून पाकिस्तानात स्थलांतरित झालेल्या आणि विस्थापितांच्या छावण्यांतून राहाणाऱ्या स्त्रियांना आणि मुलींना आधार दिला. दंगली, लढाया, आक्रमणे, सत्ताधीशांची दडपशाही, लुटारूंच्या टोळ्यांचा धुडगूस, असुरक्षितता, उपासमार, जुलूम-जबरदस्ती यांमुळे विस्थापित निरागस मुला-मुलींचे जीवन उद्ध्वस्त होते. त्यांचे अवघे बालपण हिरावून घेतले जाते. अकाली प्रौढत्व स्वीकारावे लागते.

डेबोरा एलिसने १९९७ मध्ये प्रथम अफगाणिस्तानातील विस्थापितांच्या छावण्यांतील लोकांसाठी मदतकार्यात भाग घेतला. अनेक विस्थापित स्त्रियांच्या, मुलांच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्या कहाण्या ऐकून घेतल्या. ती कॅनडातील युद्धविरोधी आंदोलनातील एक कार्यकर्ती. तिला त्या कहाण्या आपल्या देशातल्या वाचकांना आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना सांगाव्या, असे जाणवले. एका विस्थापित कुटुंबातील महिलेने आपल्या आजवर झालेल्या ससेहोलपटीची जी हकिकत सांगितली ती तिने लिहून काढली. परंतु ती कहाणी तिला तितकीशी प्रभावी वाटली नाही. तेव्हा त्या कुटुंबातील दहा वर्षे वयाच्या अल्लड, निरागस मुलीच्या दृष्टिकोनातून ती कहाणी सांगण्याचे तिने ठरवले. युद्धामुळे अफगाणिस्तानमधील विस्कळीत झालेले जनजीवन, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, कुठले तरी काम करून चार पैसे मिळवण्याची निकड आणि धडपड, तालिबानी अतिरेक्यांचा नंगानाच, मुला-मुलींची आबाळ, साध्या साध्या गोष्टीसाठी होणारी कुचंबणा – या सर्वांचे 'दि ब्रेड विनर'मधून पुढे येणारे भीषण वास्तव संवेदनक्षम वाचकाला अस्वस्थ करणारे ठरले. इ.स.२००१ मध्ये 'दि ब्रेड विनर' हे पुस्तक प्रसिद्ध झाले; आणि कॅनडा, इंग्लंड, अमेरिका यात त्याला चांगलाच प्रतिसाद मिळाला. अनेक भाषांमध्ये त्याचे

अनुवाद झाले. अफगाणिस्तान हे दहशतवाद्यांचे केंद्र; न्यूयॉर्कमधील ट्विन टॉवर्सवरील मुस्लिम अतिरेक्यांचा हल्ला... या पार्श्वभूमीवर 'दि ब्रेडविनर'ला प्रचंड प्रतिसाद मिळणे स्वाभाविक होते.

'द ब्रेडविनर'ला अनेक पुरस्कार मिळाले.

पीटर पॅन पुरस्कार (स्वीडन), मिडल ईस्ट बुक अॅवार्ड (कॅलिफोर्निया विद्यापीठ), विकी मेटकाफ पुरस्कार, द रुथ स्वार्टझ पुरस्कार, द जेन अॅडम्स बालसाहित्य पुरस्कार, कॅनडाच्या गव्हर्नर जनरलचा पुरस्कार वगैरे त्यापैकी काही...

लुकिंग फॉर एक्स (१९९९), वुमेन ऑफ दि अफगाण वॉर, बायफोकल, चिल्ड्रेन ऑफ वॉर, आय एम ए टॅक्सी वगैरे तिची पुस्तकेही अफगाणिस्तान युद्धाशी संबंधित आहेत. सेक्रेड लीफ, नो ऑर्डिनरी डे, नो सेफ प्लेस, वुई वॉन्ट टू नो : किड्स टॉक अबाउट बुलिंग, जेकमन... यामधून सद्य:कालीन जीवनातील विविध समस्यांचा डेबोराने वेध घेतला आहे.

'टु ब्लू' या तिच्या कादंबरीचे प्रकाशन २०११ मध्ये झाले.

या कादंबरीला अफगाणिस्तानातील छावणीची नव्हे तर कॅनडातील गॅलोवे या छोट्या शांत गावाची पार्श्वभूमी आहे; हे तिचे वेगळेपण लक्षात घ्यायला हवे. या कथेची निवेदिका जेसिका. जेसिका आणि केसी व्हाइट या दोघी लहानपणापासूनच्या शाळकरी मैत्रिणी. आता वय वर्षे सतरा. एका समर कँपमध्ये त्या दोघी समुपदेशक म्हणून काम करतात. जेसिकाला केसी ड्रॅगनफ्लाय म्हणे, तर जेसिका केसीला प्रेयिंग मॅन्टिस म्हणे. नराबरोबर रत होताना प्रेयिंग मॅन्टिसची मादी त्याचं मुंडकं तोडून टाकते. केसीही कीटकांचा अभ्यास करण्यात तरबेज. विज्ञान हा तिचा आवडीचा विषय. तिच्या शिक्षिका तिच्यावर खूष असत. जेसिका-केसी या दोघींमध्ये त्यावरून एक खूण ठरलेली होती. ''हा माणूस मला त्रास देत आहे; त्याचं डोकं आता उडवायला हवं.'' असा त्या खुणेचा अर्थ. अंगठा व त्याच्या जवळचे बोट घेऊन जबडा तयार करायचा आणि मग दोन्ही पटकन जुळवायचे आणि कट म्हणत तोडून टाकायचे. दोन मैत्रिणींमधला हा खेळ. कीटकांचा अभ्यास करण्यात केसीला आरंभापासून रस वाटे. ती तशी हिंसक नव्हती; पण स्वत:ला प्रेयिंग मॅन्टिस म्हणवून घेणे तिला आवडे. शाळेतल्या मुलीही तिला त्या नावाने ओळखत.

या शिबिरात दहा-दहा मुलींचे गट असत. दहा-दहा दिवसांची शिबिरे. अनेक उपक्रम त्यात राबवले जात. त्या शिबिरात भाग घेतलेल्या स्टेफनी ग्लास या आठ वर्षांच्या मुलीचे शिबिरातील कार्यक्रमापेक्षा काहीतरी वेगळेच उद्योग चालत. त्याबद्दल सर्व शिक्षक तक्रार करीत. ती शिबिराबाहेरच जास्त वेळ घालवत असे. तिच्या टिंकर बेलच्या टी-शर्टमध्ये ती बाहुलीसारखी दिसे. आपले सोनेरी केस गोल गोल वळवत हस्तकलेच्या कपाटाच्या काचेत ती बघत असे. पहिल्याच दिवशी मुलींची हजेरी घेताना स्टेफनी गायब होते. ती वीस मिनिटांनी धावत पळत येते. त्याबद्दल शिक्षा म्हणून तिला गार झालेलं चीज सँडविच देण्यात येते. जेवण झाल्यावर ती पुन्हा गायब होते. जेसिका आणि केसी कँपच्या पहिल्याच दिवशी स्टेफनीबद्दल समुपदेशकांच्या मंडळाकडे तक्रार करतात. पण स्टेफनी आपल्या लहरीप्रमाणेच वागत राहाते. एकदा पोहायला गेल्यावर स्टेफनी एका होडीमागे लपून बसते. इकडे सर्वजण काळजीत पडतात.

केसी तिला सांगते, ''आपण खूप खूप मजा करणार आहोत. म्हणून तुला आमच्याबरोबर राहायला हवं. तुलाही खूप मज्जा येईल.'' त्यावर स्टेफनी म्हणते, ''माझा वेळ तर छान चालला आहे.''

आणि शिबिराच्या चौथ्या दिवशी स्टेफनी गायब होते. खूप शोधण्यात येते. शेवटी तिचे प्रेत एका झाडाच्या बुंध्याच्या पोकळीत सापडते.

यापुढे ही कहाणी थरारकथेच्या, पोलिस चौकशीच्या, कोर्टरूम ड्रामाच्या, दैनिकातील व चॅनल आदी प्रसारमाध्यमांच्या खळबळजनक 'ब्रेकिंग न्यूज'च्या अंगाने जाते.

त्यातला महत्त्वाचा भाग म्हणजे केसीवरच स्टेफनीच्या खुनाचा आरोप लादला जातो; आणि तिला पोलिस चौकीवर नेण्यात येते. केसीचे आई-वडील अस्वस्थ होतात.

जेसिका आपल्या प्रिय मैत्रिणीच्या बचावाच्या दृष्टीने स्वत: रोज रात्री सायकलवरून गावात फेरी मारून पुराव्यांची जमवाजमव करू पाहाते. एका लहानशा गावात तिचे एकटीने गावातून भटकणे कितपत वास्तव ठरते हे डेबोरा एलिसला खटकत नाही हे एक आश्चर्यच!

स्टेफनीचा मृत्यू, एका झाडाच्या ढोलीत तिचा मृतदेह सापडणे, त्याचे दफन होणे, तिची मॉम सेमी कोमात जाणे वगैरे तपशील थरारकथेच्या परिणामकारकतेत भर घालतात.

शाळा सुरू झाल्यावर केसीबद्दल अनेकजण आपापल्या भावना प्रकट करतात.

काही शिक्षक तिला अकारण या खटल्यात गुंतवले गेले याबद्दल नाराजी व्यक्त करतात. काही शिक्षक शाळेत अशा गुन्हेगार प्रवृत्तीच्या मुलींना स्थान नाही यावर ठाम असतात. न्यायालयात प्राथमिक सुनावणी होते. खटला सुरू होतो.

परंतु शेवटी असा काही पुरावा हाती येतो की, केसी निर्दोष असून, खरा गुन्हेगार समोर येतो. लहान मुलींना पळवून नेऊन त्यांचा छळ करणे, त्यांना ठार मारणे हा प्रकार त्या भागात चालू असतो हे उघड होते.

केसीची सुटका होते.

जेसिकाच्या दृष्टीने एक गोष्ट मात्र दोघींच्या मैत्रीत अंतर निर्माण करणारी ठरते.

केसीनेच स्टेफनीची हत्या केली असावी, असे तिच्या फोटोसह ॲबर ब्रॅडले ही एक शालेय वार्ताहर खोडसाळपणे प्रसिद्ध करते. केसीच्या बोलण्याचा विपर्यास करते; त्यामुळे एकच गदारोळ माजतो. तरीही केसी जेसिकाला आपली खरी मैत्रीण म्हणूनच आत्मीयतेने पत्र लिहिते.

...डेबोरा एलिसच्या अफगाणिस्तानच्या पार्श्वभूमीवरच्या जीवनाच्या, विशेषत: बालकुमारांच्या खडतर जीवनाच्या, अकाली खुडण्यात येणाऱ्या निरागस बाल्याच्या कहाण्या आपल्या वाचकांना हलवून सोडतात. 'टु ब्लू' ही थरारकथा कॅनडातील शालेय मुलींच्या पार्श्वभूमीवरची कहाणी त्यामुळे वेगळी वाटते.

या कादंबरीची निवेदिका जेसिका, तिच्या दैनंदिनीतील शिबिराची हकिकत, शिबिरातील वातावरण, इतर शिक्षक व समुपदेशक, न्यायालयातले कामकाज, शाळेतील टवाळ मुलांचा कंपू, ॲबरसारख्या संधिसाधू वार्ताहराचा खोडसाळपणा या सर्व तपशिलामुळे ही कहाणी शेवटपर्यंत खिळवून ठेवते.


''कथाकथन हे मानवी इतिहासाइतके प्राचीन आहे.
सर्वात प्राथमिक मानवी मन हे कथा निवेदकाचे आहे.''

७वी आवृत्ती

# युगंधर

शिवाजी सावंत

**किंमत : ४८०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




हजारो वर्षांपासून श्रीकृष्ण भारतीय मन व्यापून दशांगुळे उरला आहे. भारतीय समाज व संस्कृती यांवर त्याचा अमीट असा ठसा उमटलेला आहे.

'श्रीमद्भागवत', 'महाभारत', 'हरिवंश' व काही पुराणांत श्रीकृष्णचरित्राचे अधिकृत संदर्भ सापडतात. परंतु गेल्या हजारो वर्षांत त्यावर सापेक्ष विचारांची आणि अतर्क्य चमत्कारांची पुटंच पुटं चढलेली आहेत. त्यामुळे त्याचं 'श्री'युक्त सुंदर, तांबूस-नीलवर्णी, सावळं रूपडं घनदाट झालं आहे, वास्तवापासून शेकडो योजनं दूर दूर गेलं आहे.


श्रीकृष्ण हा 'भारतीय' म्हणून असलेल्या जीवनप्रणालीचा पहिला उद्गार आहे! त्याच्या चक्रवर्ती जीवनचरित्रात भारताला नित्यनूतन व उन्मेषशाली बनविण्याचा ऐवज ठासून भरला आहे.

श्रीकृष्णाच्या जीवनसरोवरातील दाटलेलं शेवाळ तर्कशुद्ध सावधपणे अलगद दूर सारल्यास त्याचं 'युगंधरी' दर्शन शक्य आहे, हे 'मृत्युंजय'कारांनी जाणलं. आणि त्यांच्या प्रदीर्घ चिंतनातून, सावध संदर्भशोधनातून, डोळस पर्यटनातून व जाणत्यांशी केलेल्या संभाषणातून साकारली ही साहित्यकृती – 'युगंधर'!!




# परीघ

पतिपत्नीच्या सहजीवनातच जीवनाचे खरे सार्थक




लेखिका : सुधा मूर्ती

अनुवाद : उमा कुलकर्णी

पृष्ठे २४० । किंमत ₹ २०० । पोस्टेज ₹ ३० । सभासदांना सवलतीत

सुधा मूर्ती यांच्या कथा-कादंबऱ्यांनी मराठी वाचकांना त्यांच्या उदार, समंजस, सौहार्दशील जीवनदृष्टीची व्यापक जाण कळत-नकळत करून दिलेली आहे. माणुसकीचे, जगरहाटीचे एक आपल्याला झेपेल, पचेल असे नमुनेदार आदर्श रूप त्यामुळे समोर उभे राहाते. मनावर ठसते. त्या आपले लेखन कन्नड भाषेत करतात; पण मराठीतले त्यांचे अनुवाद कन्नडपेक्षा जास्त विकले जातात, वाचले जातात याचेही त्यांना अप्रूप वाटते.

सुधा मूर्ती यांच्या महाश्वेता, बकुळा, डॉलर बहू, अस्तित्व, पितृऋण वगैरे कादंबऱ्यांमधून आधुनिक जीवनशैलीतील अनेक बदलते प्रवाह आपल्या पारंपरिक भारतीय मानसिकेतला कसे आव्हान देतात – याचे एक अभिनव, तटस्थ अवलोकन – आकलन प्रकट करतात. त्यातून मिळणारा संदेश वैचारिक आणि सामाजिक रूढी-परंपरांना काही प्रमाणात आव्हान देणारा असतो.

'परीघ' ही त्यांची नवी कादंबरी नुकतीच मराठीत प्रसिद्ध झाली आहे.

कानडीतील तिचे नाव परिधी असे आहे.

या कादंबरीतील कर्नाटकाचा जुनं कर्नाटक, उत्तर कर्नाटक, निजाम कर्नाटक, किनारपट्टीचा कर्नाटक वगैरे भौगोलिक व प्रादेशिक तपशील विदर्भ, मराठवाडा, खान्देश, कोकण, पश्चिम महाराष्ट्र वगैरे मराठी मुलखाच्या भेदाप्रमाणेच लक्षवेधक आहे. सामाजिक, धार्मिक नीतिनियमांविषयी सुधा मूर्ती यांची बारीकसारीक निरीक्षणेही आपल्याला थक्क करतात. उपप्रदेशातील आपल्या अस्मिताही काही कमी टोकदार नसतात आणि त्या इतक्या अभावितपणे आणि आकस्मिकपणे प्रकट होतात की, आपल्या सुप्त अंतर्मनात काय काय साठलेले आहे याचे कोडे पडते.

'परीघ'ची कथावस्तू धारवाड जिल्ह्यातील आलद हळ्ळी या गावी सुरू होते. धारवाड जिल्ह्यातील नव्वद टक्के लोकांना अशा नावाचे गाव आहे हे ठाऊक नसेल असे पहिल्या परिच्छेदातच सांगून लेखिका आपल्या शिग्गाव या जन्मस्थानाकडे नेते.

शिग्गाव म्हणजे एकुलती एक गल्ली. तिच्या दोन्ही बाजूला घरं; सगळ्या घरांची रचना सारखीच. शंभरातील नव्वद शेतकरी. सुरुवातीला ओसरी, गुरांचा गोठा, नंतर माजघर, स्वयंपाकघर, लहानशी खोली. परसात भाताची कणगी, गंजी, एखादा भोपळ्याचा वेल.

येथील भीमण्णाची मुलगी मृदुला. वयात आलेली. एका बंगाली

कादंबरीतलं मृदुलता हे नाव भीमण्णाला आवडलं म्हणून मृदुला हे नाव. मृदुलाचा थोरला भाऊ कृष्णा. गावात पन्नास घरं हिंदू. उरलेली मुसलमानांची. दोन्ही जमातींत सलोखा. जाणे-येणे. मैत्री.

मृदुलेवर भीमण्णाचं प्रेम. ती बीए होते. बीएड् होते. सरकारी शाळेत शिक्षक म्हणून कामाला लागते. एकदा मुंबईहून डॉ. संजय हुबळी आलद हळ्ळीला काही कामासाठी येतो. तो केईएम हॉस्पिटलमध्ये सर्जन असतो. अत्यंत वाकबगार. सिन्सिअर. कामाला वाघ.

डॉ. संजय हुबळीला मामलेदाराची मुलगी सुरेखा हिच्या लग्नासाठी येतो.

डॉ. संजय आणि मृदुला यांची लग्नघरी गाठ पडते. त्यावेळी नेमके लाइट गेलेले. चुरगळलेली साडी, रागानं लाल झालेले गाल, छातीवर रुळणारी जाड वेणी, गोरीपान, देखणी; कुठल्याही कोनातून पाहिलं तरी सुंदर. देवानं निवांतपणे निर्माण केलेली अप्रतिम बाहुलीच.

संजयची भरपूर उंची. दाट कुरळे केस, सुदृढशरीर, चेहऱ्यावरचे मंद स्मित.

दोघांची नजरानजर होते.

नंतर योगायोगाने संजय आलद हळ्ळीला येतो. तेथील चंपाबाईंना एक पार्सल देण्याचे काम त्याच्यावर त्याचे बॉस डॉ. जोग यांनी सोपवलेले असते. चंपाबाई गावाला गेलेल्या; त्यामुळे शेजारच्या भीमण्णाकडे तो ते पार्सल देतो. तेथे मृदुलाची परत गाठ पडते.

मृदुलाला पत्र लिहून संजय तिला आपल्या भावना कळवतो – ''मला तुम्ही आवडलात. मी गरीब घरातून आलो आहे. गावाकडे थोडी जमीन आहे. आई पाहाते. थोरल्या बहिणीचे लग्न झाले आहे. माझं शिक्षण हीच माझी संपत्ती आहे. मी हार्डवर्किंग आहे. तुम्हाला योग्य वाटलं तर कळवा.''

...पुढे मृदुला आणि संजय यांचे लग्न होते. पुढे संजय बंगळूरला बदली करून घेतो. मृदुलालाही बंगळूरला बदली मिळते.

संजय गायनॅकमध्ये पीजी होण्यासाठी प्रयत्न करतो. पण तेथे मंत्र्यांचा वशिला लागतो. त्याचा नंबर लागत नाही. तेव्हा सरकारी हॉस्पिटलमध्येच राहणे त्याला क्रमप्राप्त ठरते. वरची कमाई करण्याची प्रवृत्ती नाही; त्यामुळे पगार मर्यादित. त्यात जेमतेम भागते. मृदुलाच्या इतर नातेवाईकांतील श्रीमंती नोकझोक डॉ. संजयकडे नसतो; त्यामुळे कळत नकळत अवमान,

अपमान, कुत्सित बोलणी वगैरे. त्याचे तिला दुःख. पैसा हवा. मान हवा.

पुढे मात्र डॉ. ॲलेक्सच्या भागीदारीत संजय एक हॉस्पिटल सुरू करतो. कर्ज काढून कार घेतो. घर घेतो. भरपूर कमाईची आधुनिक तंत्रे आत्मसात करतो. त्यासाठी तडजोडी करतो. त्याची भरभराट होते. मानमरातब वाढतो. देश-परदेशचे दौरे सुरू होतात.

या दांपत्याला मुलगा होतो. शिशिर. तोही हुशार निघतो. परंतु मृदुला-संजय  यांच्यात मात्र काहीसा ताण वाढत राहातो. तोही मेडिकलला जातो. चार वर्षांत मृदुला आणि संजय यांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल होतो. मृदुला हेडमास्तर होते. संजय परदेशी जाऊन येतो. डॉ. संजयचे पैसा मिळवण्याचे हे नवे तंत्र पापभीरू मृदुलाला खटकते. घरातील स्वास्थ्य हरपते.

पुस्तकाच्या मलपृष्ठावर दिलेला ब्लर्बचा मजकूर हा या संदर्भात लक्षात घेण्यासारखा आहे.

‘‘पैसा आला की माणूस बदलतो. माणसाच्या अंतर्यामी दडलेले गुण-अवगुण बाहेर येतात. पैसा नसताना दडलेले अवगुण पैसा आला की बाहेर येतात. पैसा हा एखाद्या रावकाचेसारखा असतो. म्हणूनच कंजूष माणूस श्रीमंत बनला की लोभी होतो. अधाशी माणूस जमीनजुमला खरेदी करतो. स्वार्थी माणूस विलासी बनतो. उदार माणूस दानी बनतो. ज्यांना पैशाचा मोह नाही, त्यांना पैसा जवळ असला काय किंवा नसला काय, काहीच फरक पडत नाही.

मृदुलाला डिप्रेशन येत जाते.

मृदुलाला तिची मैत्रीण सायकिॲस्ट्रिस्टकडे जायला भाग पाडते. त्यांच्याबरोबर बरीच सेशन्स होतात. या कादंबरीतील हा चर्चेचा भाग म्हणजे खरा गाभा आहे. तो मुळातूनच वाचायला हवा. वाचूनच न थांबता अभ्यासायला हवा. स्त्री-पुरुष संबंध आणि विवाह संस्थेची उपयुक्तता आणि मर्यादा यांची एका अर्थाने ती मूलभूत चिकित्सा आहे.

हॉस्पिटलची नवी इमारत होते. पंधरा वर्षांत संजय – अलेक्सचे कर्नाटक नर्सिंग होम उत्तम सेवेसाठी प्रसिद्ध होते. पॉली क्लिनिकचे स्वरूप दिल्याने पेशंटना बिलेही तशीच भरमसाट लावणे सुरू होते. आर्थिक व्यवस्थापन रोझमेरी ही ज्येष्ठ सेविका बघू लागते. परंतु संजयच्या कौटुंबिक संबंधांत मात्र ताणतणाव वाढत जातात.

संजयशी लहान-मोठ्या बाबतींत मतभेद होऊ लागतात. ''तुझं जुन्या काळातलं लॉजिक गावठी.'' असे येताजाता ऐकणे मृदुलाला विव्हळ करत जाते.

संजय तिच्या नकळत काही रक्कम आपल्या विवाहित बहिणीला देतो.

''मृदुला, हे काही देवस्थान नाही. इथले रुग्ण म्हणजे आपले ग्राहक. त्यांच्या गरजेनुसार त्यांना आहार, उपचार देणे हे आपले काम. त्याबद्दल चार्जेस लावायला नकोत का?'' संजयचा युक्तिवाद.

अनिता ही अलेक्सची पत्नी. ती मृदुलाची समजूत काढते. संजयने तुझी फक्त पैशाच्या बाबतीत फसवणूक केली आहे. तुला न सांगता लक्ष्मीला पैसे दिले आहेत. पण फसवणुकीतून मिळालेल्या पैशानं लक्ष्मीलाही सुख मिळेलच, असे नाही. पैसा वाटला गेला पाहिजे. आशीर्वाद महत्त्वाचा. संजय केवळ तुझा नाही. अनेकांशी त्याचं नातं आहे. या जगात भांडणाला प्रमुख कारणं आहेत. ती म्हणजे कनक, कांता आणि भूमी. यावरून फसवणूक होत असते. तुझी, माझी; सर्वांचीच! हे सगळं सोडून दे. परमेश्वराच्या ठिकाणी स्वत:ला समर्पित कर.''

कांतम्मा तिला सांगते, ''संसार म्हटला म्हणजे सुख-दु:ख असणारच. बाईनं असंच सहन करून जगायला पाहिजे. प्रत्येक घरात पुरुषाचाच शब्द शेवटचा असतो... (१९०)

कांतम्मा मृदुलाला शिवानंद स्वामींच्या प्रवचनाला जा, असे सुचवते.

पण ती मनोविकारतज्ज्ञ डॉ. राव यांच्याकडे जाते.

''डॉक्टर, मला जीवनाचा कंटाळा आला आहे.''

''या आजारावर औषधे आहेत. काही औषधे अगदी सेफ आहेत... तुम्ही म्हणालात तर देईन. पण तुम्ही दर दिवसाआड येत राहा.''

प्रथम ते तिच्या नर्व्हस ब्रेकडाऊनचं कारण जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. जमलं तर नवऱ्यालाही घेऊन या, असे सुचवतात.

''डॉक्टर, पूर्वी माझे यजमान असे नव्हते. घरात काहीही घ्यायचे असले तर मला विचारायचे. पैशाचे व्यवहार मला विचारून करायचे.'' मृदुला.

''तेव्हा पैसे कमी होते. त्यावेळी त्यांचे लक्ष ज्ञान संपादनाकडे होते... इतर अडी-अडचणीही असणारच.'' डॉ. राव.

''पण डॉक्टर, त्यांचा स्वभाव इतका हट्टी असेल याची मला कल्पनाच नव्हती.''

''एकाग्र चित्तानं मेहनत घेतली, हट्टीपणा चांगल्या दिशेनं वळवला तर ही माणसं यशस्वी होतात. या संपूर्ण प्रवासात तुम्ही त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या आहात.''

''पण डॉक्टर, माणसाला कृतज्ञता वगैरे हवी की नाही?''

''नको कोण म्हणतं? राजकारणात स्पर्धा असते. दुसऱ्याच्या डोक्यावर पाय ठेवूनच पुढे जावे लागते. तेव्हा कृतज्ञता कुठून येणार? संसाराचे नियम वेगळे असतात. संसार सुखाचा व्हायचा असेल तर परस्परांशी सुसंवाद हवाच. भावनांक महत्त्वाचा. घरातलं वातावरण शांत असलं तर घर सुखानं चालतं.''

''मी माझ्या यजमानांना काहीही सांगायला गेले तर ते म्हणतात, तुला काय कमी आहे?''

''तुम्हाला काय सांगायचं असतं?''

या प्रश्नावर मृदुला विचारात पडते. खरं, काय हवं आहे आपल्याला?

डॉ. राव यांच्याशी बोलल्यावर तिला वाटते, लग्नानंतर इतक्या वर्षांनी आपण जीवनाबद्दल विचार करतो. आपण म्हणजे जग असंच आपण मानत आलो. सगळं काही आपल्या मनाप्रमाणं व्हावं, असे आपल्याला वाटते. नवऱ्यालाही तसंच वाटत असणार. त्याच्या मर्जीनुसार प्रत्येक काम व्हायला हवं, असं त्याला वाटलं तर त्यात चूक काय?... हा प्रश्न आपल्या एकटीचा नाही; शेकडो बायकांचा आहे. हट्टी नवरा. यशामुळे स्वतःला विशेष समजणारा... त्याच्या दृष्टीनं बायको ही त्याचं ऐकण्यासाठीच असते. बाईनं नवऱ्याबरोबर जुळवून घेतलं पाहिजे. उद्या मुलाबरोबरही जुळवून घेतलं पाहिजे... प्रत्येक स्त्री हाच प्रश्न स्वतःला विचारत असते. आपल्या देशात एक मुलगी लग्न करते ती केवळ एका पुरुषाशी नव्हे! तिला एका कुटुंबाशी जुळवून घ्यावं लागतं...

डॉक्टर राव म्हणतात, ''एका दृष्टीनं तुम्ही नशीबवान आहात. तुम्हाला सासरचा जाच नाही. नवऱ्याचा त्रास नाही. नवऱ्याला वाईट सवयी नाहीत. बाहेरच्या स्त्रियांचा नाद नाही... फार आदर्शवादाला पकडून जगणाऱ्याला वास्तव जीवनातल्या कटू सत्याला सामोरं जाताना त्रास होतो. तुमचे यजमान आणि तुमची नणंद लक्ष्मी त्या कटू सत्याशी सामना करीत वाढल्या आहेत...''

''संजय माझा कधीच झाला नाही. नव्हे कधी कुणाचा व्हायचा त्याचा

स्वभावच नाही. मी मात्र कधीच आपपरभाव मानला नाही.'' (२०६)..

''जगातील असंख्य जोडपी अशीच आहेत. त्यांपैकी कितीजणी स्वत:चं सगळं विसरून जोडीदाराच्या जीवनाशी एकरूप होताना दिसतात? स्त्रीच्या सांसारिक जीवनाचं सार सर्वस्व तिच्या वैवाहिक जीवनाच्या परिघातच असतं ना! या म्हणण्याला तरी काय अर्थ आहे? एकानं आपलं सगळं आयुष्य दुसऱ्यावर उधळून टाकायचं आणि दुसऱ्यानं आपल्या मनाचा परीघ केवळ आपल्या स्वार्थापुरताच मर्यादित ठेवायचा याला संसार म्हणतात का? डॉक्टर, मी आता काय करू?''

''तो निर्णय तुमचा तुम्ही घ्यायचा आहे. मी त्यात ढवळाढवळ करू शकत नाही. पतीच्या स्वभावात असलेले काही गुण त्याच्या घराण्यातून आले आहेत. काही त्याच्या व्यवसायामुळे आलेले आहेत... त्यांचा सध्याचा स्वभाव बदलणं आता अवघड आहे.''

''पैसा आला म्हणून माणूस का बदलतो?''

''तो खरंच बदललेला असतो का हा प्रश्न स्वत:लाच करा. आपण त्याची जी प्रतिमा गृहीत धरतो – तिच्यात काहीतरी वेगळेपण जाणवू शकतो. परंतु तुम्हाला जर तुमचा पती बदलेल, असं वाटत असेल तर ते विसरून जा. म्हणतात ना, कडू कारलं तुपात तळलं, साखरेत घोळलं तरी कडू ते कडूच! त्यामुळे तुम्ही कुठल्याही चमत्काराची अपेक्षा ठेवू नका.'' (२०७)

पतिपत्नी एकमेकांकडून सहजीवनाची अपेक्षा करीत असतात, हे तिच्या लक्षात येते.

तशात डॉ. संजय आणि मृदुला यांच्या विवाहाचा रौप्यमहोत्सव साजरा करण्याचे त्यांचा मुलगा शिशिर आणि इतर आप्त ठरवतात. संजय पत्नीला विचारतो, ''वेडिंग ॲनिव्हर्सरीला तुला काय हवं? डायमंड सेट आणू की युरोप ट्रिपला जाऊ या? का तुमच्या शाळेला २५ हजार देऊ?''

मृदुलाला संजयचे ते बोलणे नाटकी, खोटेपणाचे वाटते. 'लग्न झालं तेव्हा तुमचा माझ्यावर जो गाढविश्वास होता तो मला आणून द्या' असा विचार तिच्या मनात येतो; पण ती बोलत नाही.

वाढदिवसाचा समारंभ लीला पॅलेस हॉटेलमध्ये होता. कॉकटेल, डिनर, व्हिडीओ, भेटवस्तू यांची लयलूट होती.

मृदुला साधी सुती साडी घालून सामान बांधत असते.

"काय चाललंय तुझं?" संजय विचारतो.

"माझी बदली झाली आहे. आलद हळ्ळीला. तिथं मी चंपाक्काचं घर विकत घेऊन राहाणार आहे. वडिलांचं घर आता माझं राहिलेलं नाही. माझा मुलगा जिथं माझा वाटला नाही, तुम्हीही माझे झाला नाहीत. माझ्या नकळत कितीतरी गोष्टी घडत असताना तुम्ही मला विचारात घेतलं नाही. मग कधीकाळी मी ज्या घरातून बाहेर पडले ते घर माझं कसं होईल?... आई, बायको, सून म्हणून माझी कर्तव्यं मी केली आहेत. आता उरलेलं जीवन मी माझ्यासाठी जगणार आहे. मला माझी नोकरी आहे. तिथे माझी अजून गरज आहे. तुम्हाला मला भेटायचं असेल तर आलद हळ्ळीला येऊन भेटा."

संजयच्या उत्तराची वाट न बघता मृदुला रिक्षा करून निघते.

लीला पॅलेसमध्ये खूप निमंत्रितांची गर्दी होते. "मृदुला मॅडम पाय घसरून पडल्याने, येऊ शकत नाहीत... सर्वांनी जेवण करूनच जावे," असे संजय सर्वांना सांगतो.

संजय स्वतःची समजूत घालू पाहातो.

ती नसली म्हणून काय झालं?

माझ्यापुरता मी छान जगेन.

स्वयंपाकाला आणि घरकामाला साकम्मा आहेत.

हॉस्पिटलचे बघून घ्यायला रोझमेरी आहे.

मी बंगळुरमधला सर्वात जास्त प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ आहे.

या व्यवहारशून्य मृदुलाच्या धमकीला मी का घाबरायचं?

तिला राहायचे असेल तर राहील, जायचे असेल तर जाईल.

ती असली वा नसली तर काय फरक पडणार आहे?

ती इतक्या ताठ्यात निघून गेली. बोलवायला गेलो तर किती अपमान!

अशा गोष्टी घडतातच. मी या बयेपुढं वाकणार नाही.

नंतर परदेशातून शिशिरचा फोन येतो...

"डॅड, तुम्ही अम्मावरच कॉनसेंट्रेशन, फोकस करा. स्वतः जाऊन तिला घरी घेऊन या. तुम्ही मनात आणलं तर काहीही अशक्य नाही. अम्मा नसती तर आज आपलं नर्सिंग होम नसतं. घर म्हटलं की अम्मा हवीच... तिला सोडून राहाणं तुम्हाला जसं अवघड वाटतं तसंच तिलाही वाटत असलं पाहिजे. मी आलद हळ्ळीला फोन करतो."

मृदुलाला जाऊन दोन महिने होतात. येणारा प्रत्येक फोन मृदुलाचा

असेल म्हणून डॉ. संजयला उत्सुकता वाटे. शिशिर मात्र वरचेवर फोन करीत अम्माविषयी बोलत असतो.

आणि चैत्रातील गुढी पाडव्याच्या दिवशी झोक्यावर बसून झोके घेत असताना कुणीतरी आपला झोका थांबवल्यासारखं मृदुलाला जाणवलं. ती मागं वळून बघते तर संजय तिला दिसतो.

स्त्री-पुरुषाच्या सहजीवनातच जीवनाचं खरं सार्थक असतं. आपण कोणाचा स्वभाव बदलू शकत नाही. आपल्या मर्जीप्रमाणेच जोडीदाराने वागावे, असा आग्रह धरून परिवाराचा गाडा चालू शकत नाही. प्रत्येकाला एका परिघाच्या आत राहूनच कौटुंबिक सुखाचा आनंद घेता येतो हे वास्तव अधोरेखित करणारी 'परीघ' ही कादंबरी सुधा मूर्ती यांच्या प्रगल्भ, प्रौढ, समंजस जीवनविषयक संकल्पनेचा प्रभावी संस्कार वाचकाच्या मनावर ठसवते.


कर्नाटकातील विविध भागांमधील सांस्कृतिक, सामाजिक वातावरणाचे आणि वैशिष्ट्यांचेही सम्यक् दर्शन ती घडवते.


**११वी आवृत्ती**

## तो आणि ती


मूळ लेखक - डॉ. जॉन ग्रे । अनुवाद - शुभदा विद्वांस

किंमत : २९०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.




त्याचे आणि तिचे नाते एका बगीच्याप्रमाणे असते. जर ते हिरवेगार रसरशीत असावे असे वाटत असेल तर त्या बगीच्याला नियमितपणे पाणी घालावे लागते. त्याची निगराणी करावी लागते. निरनिराळ्या ऋतुंचे तसेच अनपेक्षित हवामानाचे भान ठेवावे लागते. नवीन बीज पेरावे लागते. तण काढून टाकावे लागते. म्हणजेच प्रेमाची जादू कायम टिकून राहते. 'प्रेमाचा परिपोष कसा करावा?' याचे अचूक मार्गदर्शन करणारे हे पुस्तक

**१५वी आवृत्ती**




# छावा

शिवाजी सावंत

**किंमत : ४८०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**

'राजा शिवाजी' हा निर्विवाद सिंहपुरुष होता. परंतु शिवपुत्र 'संभाजी' हाही एक छावाच होता. महाराष्ट्राला हे नव्याने; पण पुरेपूर उमजले आहे.
'छावा'च्या जोरदार स्वागताने ते सिद्धही झाले आहे. एक-दोन नव्हे; तर एकाचवेळी पाच आघाड्यांवर निकराची पंजेफाड करणारा हा सेना-धुरंधर!
मराठ्यांच्या इतिहासात असा सेनापती एकमेव 'संभाजी'च होऊन गेला.
जंजिरेकर सिद्दी, गोव्याचे फिरंगी, मुंबईचे टोपीकर आणि तीस लाखांची फौज व चौदा कोटींचा खजिना घेऊन मराठ्यांचे पारिपत्य करण्यासाठी दक्षिणेत उतरलेला अवाढव्य औरंगजेब - या त्या चार आघाड्या.
पाचवी आघाडी होती, स्वार्थांध स्वजनांची, अगदी घरचीच! विखारी विश्वास घातक्यांची!
सतत नऊ वर्षे पाठीशी घेत मुलूखभर दौडणारा हा झुंजार राजा जन्माला येताना कविमनाचे संचित बरोबर घेऊन यावा आणि 'बुधभूषणम्' काव्याची रचना करून तो कविराज म्हणून मान्यता पावावा; हे पाहिले की, प्रतिभा देवदत्त असली; तरी एक अजब आणि विस्मयकारी देणगी आहे, असे म्हणावे लागते. तसाच अटीतटीचा प्रसंग आला तर मराठी कविमन एकदा का निर्धाराने राजवस्त्र ल्याले की, मृत्यूलाही कसे धडक सामोरे जाऊ शकते; हे या छाव्याने तुळापुरी सिद्ध केले.
ही शोकांतिका तर खरीच; पण उत्कट आणि भव्य समर्पणाचा वेध घेणारी!


६वी आवृत्ती

# द दा विंची कोड

मूळ लेखक
डॅन ब्राउन

अनुवाद
अजित ठाकूर

**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज : ३०/-रु.**




पॅरिसमधील लूव्र या सुप्रसिद्ध संग्रहालयाच्या वयस्कर व्यवस्थापकाचा संग्रहालयामध्येच खून होतो. विचित्र गोष्ट अशी की त्याच्या मृतदेहाभोवती जमिनीवर गोंधळून टाकणारी काही चिन्हे आणि खुणा दिसतात. या खुणांचा शोध घेण्याची कामगिरी त्याचवेळी पॅरिसमध्ये आलेल्या रॉबर्ट लँग्डन या हॉर्वर्ड विद्यापीठातील चिन्हशास्त्रतज्ज्ञावर सोपवली जाते.

फ्रांन्समधील निष्णात गुप्तलिपीतज्ज्ञ सोफी नेव्ह्यू हिच्या मदतीने लँग्डन या चित्रविचित्र खुनांमधून खुनाला वाचा फोडणारी काही दिशा मिळते का याचा शोध घेतो. यातूनच मग काही वेगळेच रहस्य उजेडात येते. जगप्रसिद्ध चित्रकार लिओनार्दो दा विंचीच्या अनेक चित्रांमधून अत्यंत कौशल्यपूर्ण रितीने दडवलेले संकेत दोघांना आश्चर्यचकित करतात.

खून झालेले संग्रहालय-व्यवस्थापक 'प्रायमरी ऑफ सायन्स' या पंथाशी संबंधित असतात. ही स्फोटक माहितीही त्यांना कळते. अत्यंत गुप्तपणे काम करणाऱ्या या पंथामध्ये सर ऐझॅक न्यूटन, व्हिक्टर व्ह्यूगो आणि दा विंची अशा अनेक नामवंत व्यक्ती कार्यरत होत्या.

संग्रहालय-व्यवस्थापकांनी मती गुंग करणारे एक ऐतिहासिक सत्य जीवापाड जपलेले असते. हा शोध घेत असताना एक अव्यक्त प्रतिगामी शक्ती सतत रॉबर्ट आणि सोफीचा पाठलाग करीत असते. अखेर प्राचीन काळापासून अस्तित्त्वात असलेले एक स्फोटक सत्य, खुणा आणि संकेताच्या भुलभुलैय्यातून बाहेर येते.


**४थी आवृत्ती**

# आयुष्याचे धडे गिरवताना

मूळ लेखिका
सुधा मूर्ती

अनुवाद
लीना सोहोनी

**किंमत : १५०/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




''आयुष्याच्या प्रवासात आपल्याला विविध प्रकारच्या व्यक्ती भेटतात. अनेक घटना-प्रसंगांना सामोरे जावे लागते. त्यातून वेगवेगळे अनुभव येतात. त्यातले काही अनुभव चांगले असतात. काही घटना वाईट. काही सुखकारक असतात. तर काही दुःखदायक. काही व्यक्ती चमत्कारीक असतात. तर काही अनुभव मन थक्क करणारे...

हे अनुभव, या व्यक्ती आपल्याला बरेच काही शिकवून जातात. आपले आयुष्य विविध अंगांनी संपन्न करतात; परिपक्व बनवतात.

या संग्रहात सुधा मूर्ती यांनी या अनुभवांना आणि व्यक्तिरेखांना कथारूप दिले आहे. या कथा जशा सुधा मूर्ती यांच्या आहेत, तशा त्या तुमच्या-आमच्या आहेत; विलक्षण चमत्कृतींनी भरलेल्या, गुंतागुंतीच्या जीवनाविषयी आहेत. सहजसोप्या कथनशैलीतून उलगडत जाणाऱ्या या कथा आयुष्याचे धडे' देतात अंतर्मुख करतात.




# आघाडीचे महिला नेतृत्व

विविध व्यवसाय क्षेत्रात अभूतपूर्व यश मिळवणाऱ्या कर्तृत्ववान यशस्विनी




लेखिका : सुधा मेनन

अनुवाद : सुमिता बोरसे

पृष्ठे २७६ । किंमत ` २८० । पोस्टेज ` ३० । सभासदांना सवलतीत

आयसीआय बँक आणि जे. पी. मॉर्गन यात उच्च स्थान पटकावणाऱ्या कल्पना मोरपारियांना सन २००८च्या अखेरीस जे.पी. मॉर्गनच्या भारतातील उद्योगाची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून रुजू होऊन जेमतेम महिनाच झाला होता आणि त्या रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागाबाहेर बसून आपल्या पतीच्या जीवासाठी प्रार्थना करत होत्या. त्यांच्या पतीला हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता आणि त्या पश्चात आणखी काही गंभीर समस्या निर्माण झाल्या होत्या. दुसरी समस्या ही होती की, कल्पना यांना दोनच दिवसात हाँगकाँग येथील बैठकीला हजर राहणे गरजेचे होते. तेथे कार्यकारी समितीच्या सदस्यांसमोर जे. पी. मॉर्गनचे भारतातील भविष्य यावर सादरीकरण करायचे होते. तेथे येणाऱ्या अधिकारी वर्गात उद्योगसंस्थेच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांचा समावेश होता.

प्रसंग अगदी बाका होता. एकीकडे पतीबद्दल वाटणारी काळजी आणि दुसरीकडे कामाप्रती असलेली निष्ठा आणि जबाबदारी. दोन्ही कर्तव्ये एकमेकांसमोर उभी ठाकली होती. एक केले की दुसरे राहणार होते. कल्पना आणि त्यांच्या संघातील सहकाऱ्यांनी रात्रंदिवस मेहनत करून सादरीकरण तयार केले होते. ज्या दिवशी संध्याकाळी त्यांना हाँगकाँगसाठी रवाना व्हायचे होते, त्या दिवशी त्यांच्या पतीवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे म्हणणे होते की, पतीची तब्येत अगदी अस्थिर असल्याने त्यांनी कुठेही न गेलेलेच बरे.

''मी अत्यंत धार्मिक आहे आणि प्रत्येक कठीण प्रसंगात प्रत्यक्ष देवच तुम्हाला मार्ग दाखवत असतो. जीवनात मी अतिशय भाग्यवान असल्याचे मला वाटते. माझ्या बोटाला धरून भगवंत नेहमीच माझे मार्गदर्शन करतात. सादरीकरण तयार करण्यासाठी माझ्या संघाने खूपच मेहनत घेतली होती. उद्योगसंस्थेची सर्व अत्युच्च मंडळी एकाच ठिकाणी असणार होती आणि त्यांच्यासमोर सादरीकरण करता आल्यास सर्वांना एकाच वेळी भारतातील उद्योगाबद्दलची आमची दूरदृष्टी समजू शकली असती. त्याचवेळी पतीसोबत थांबणेदेखील तितकेच महत्त्वाचे होते. म्हणूनच पतीने स्वत: मला हाँगकाँगला जाण्याविषयी आग्रह केला, तेव्हा मी त्याला देवानेच दाखवलेला मार्ग मानला आणि सादरीकरणासाठी रवाना झाले.''

कल्पनांना जीवनामध्ये आपल्याला नेमके काय हवे आहे, हे अगदी स्पष्ट आहे. ''माझे कामच माझे जीवन आहे. माझी ओळख माझे काम हीच आहे. मला हे सांगतांना जराही लाज वाटत नाही की, कामामुळे मला जे समाधान मिळते, ते मला माझ्या इतर कोणत्याही नात्यातून मिळत नाही.''

खरं म्हणजे किशोर वयात असताना त्यांचे एकच स्वप्न होते की, राजबिंड्या तरुणाशी विवाह करून आयुष्यभर सुखात राहायचे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या तोंडून निघालेले असे उद्‌गार ऐकणे काहीसे विचित्र वाटते. मात्र ज्या आत्मविश्वासाने हे विधान केले आहे, त्यामुळे यातील प्रत्येक शब्द त्याच अर्थाने म्हटला आहे, याबाबत शंका घेण्यास जागा राहात नाही. वयाच्या ५९व्या वर्षी बहुतेक जण उर्वरित आयुष्याचा कुटुंबासोबत आनंद घेण्याच्या, जगभर प्रवास करण्याच्या किंवा आयुष्यभर जपून ठेवलेली स्वप्ने पूर्ण करण्याच्या विचारात असतात, तेव्हाच कल्पना मात्र पूर्णवेळ द्यावा लागेल, अशा दुसऱ्या कार्यक्षेत्रात कार्यरत होण्याचे ठरवत आहेत. ''वय म्हणजे केवळ एक नोंद असते. ते सर्व तुमच्या मनातच असते. माझ्या मनाने मी तर विशीच्या उत्तरार्धातच आहे.''

जे.पी. मॉर्गन येथे रुजू होण्याचा निर्णय आपल्या पस्तीस वर्षांच्या कारकिर्दीतील सर्वांत धाडसी असल्याचा त्या मान्य करतात. येथील जबाबदाऱ्यांमध्ये वित्तीय जगातील बऱ्याचशा गोष्टी हाताळायच्या होत्या. जेव्हा जागतिक पातळीवरील उद्योगसमूहाकडून त्यांच्या उद्योगाच्या हिताला बाधा पोहोचेल, अशा शक्यता निर्माण झाल्या, तेव्हा त्यांच्या उद्योगसमूहाच्या हितरक्षणासाठी त्यांनी जागतिक पातळीवर धोरणात्मक लढाईची आखणी केली. आणि प्रत्यक्षात या साऱ्यातून विजयी होऊन त्या उद्योगाला सामोऱ्या आल्या. जे.पी. मॉर्गनमध्ये रुजू होण्यामागे उद्योगाची सर्व सूत्रे स्वतःच्या हातात घेऊन सारथ्य करण्याची आंतरिक इच्छाच कारणीभूत होती. आयसीआयसीआयमधून निवृत्त झाल्यावर त्यांनी तेथेच सल्लागाराची भूमिका स्वीकारली होती. या नवीन भूमिकेत कोणी विचारले, तरच सल्ला द्यायचा इतकेच काम होते आणि त्यामुळे त्या कमालीच्या अस्वस्थ आणि असमाधानी झाल्या होत्या. त्याचवेळी त्यांच्यासमोर एक-दोन आकर्षक प्रस्ताव ठेवले गेले.

''एखाद्या बाबतीत मन साशंक होणे, माझ्या आयुष्यात फारच कमी वेळा झाले आहे. नेहमीच माझ्या वरिष्ठांनी माझ्यासाठी योग्य निर्णय घेतले होते. आणि आता आयुष्यात प्रथमच मला कोणाच्याही मार्गदर्शनाशिवाय, सल्ल्याशिवाय माझ्या कारकिर्दीविषयी निर्णय घ्यायचा होता. माझे घरच बनलेल्या उद्योगसमूहाला सोडून जायचे की नाही, या मनाच्या दोलायमान अवस्थेशी मला बरेच झगडावे लागले.''

सरतेशेवटी कार्यकारी पदावर काम करण्याच्या इच्छेने जे.पी. मॉर्गनच्या बाजूने कौल दिला. ''तुम्ही उद्योगसंस्थेच्या उच्च पदावरून निवृत्त झाल्यावर

सल्लागाराचे पद स्वीकारणे, कधीच चांगली कल्पना नसते.'' मात्र तो निर्णय त्यांच्या कारकिर्दीच्या दृष्टीने त्यांनी कल्पनादेखील केली नसेल, असा आणखी एक मैलाचा दगड ठरला. त्या म्हणतात की, वास्तविक पाहिले तर त्यांच्या आयुष्यात काहीच व्यवस्थित पूर्वतयारीने घडलेले नाही. या अनेक वर्षांत मिळालेले यशही त्यांना स्वप्नवत वाटते.

**कल्पना यांच्या कथेत भाग्याची फार महत्त्वाची भूमिका आहे. त्यांचा असा गाढ विश्वास आहे की, भाग्यच त्यांना आयसीआयसीआयमध्ये घेऊन गेले आणि प्रगतीपथावर असणाऱ्या छोट्याशा वित्तीय संस्थेचे रूपांतर आयुर्विमा भांडवल आणि संपत्ती व्यवस्थापन अशा विविध शाखा असलेल्या वटवृक्षात झाले आहे. कायद्याची पदवी घ्यायची आणि विवाह करून संसारात रममाण होण्याचे स्वप्न पाहाणाऱ्या युवतीला लवकरच उमगले की, केवळ गृहिणी म्हणून जगणे तितके काही गमतीचे नाही. भराभर विस्तारीत जाणाऱ्या आयसीआयसीआयमध्ये त्या येऊन पोहोचल्या. त्या कायद्याच्या पदवीधर आणि प्रत्येक बाबतीत कायदेतज्ज्ञाची भासणारी गरज या वास्तविकतेमुळेच त्या आयसीआयसीआयमध्ये यशाच्या एक-एक पायऱ्या चढत गेल्या.**

कल्पना एक खंबीर महिला आहेत. कोणत्याही संस्थेला त्यांचे त्यांच्याकडे असणे खरोखरच लाभदायक असते. त्या नेहमीच अशा नव्हत्या. उलटपक्षी या बुद्धिमान महिलेने निसर्गाने त्यांना मातृत्वाचे सुख दिले नाही, म्हणून जीवनातील बराच कालावधी दुःखातच काढला. देशातील अत्यंत यशस्वी महिला अधिकाऱ्यांपैकी एक असूनही कित्येक वर्षे त्या स्वत:ला अपयशीच मानत होत्या. कारण काय तर त्या आई होऊ शकल्या नाहीत. शेवटी एके दिवशी त्यांनी आपल्या नशिबात अपत्यसुख नाही, हे सत्य स्वीकारायचे ठरवले आणि या निर्णयाने त्यांचे आयुष्य बदलले.

हे सत्य स्वीकारण्याचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरला. या निर्णयानंतर त्या कधीही रडल्या नाहीत किंवा त्यांनी मागे वळूनही पाहिले नाही. उलट घरातील वाढत्या जबाबदाऱ्या, मुलांच्या गरजा या व इतर कारणांसाठी ज्या काळात महिला आपला कामाचा वेग कमी करतात, त्याचवेळी कल्पना यांनी स्वत:ला कामात झोकून दिले. त्यांना स्वत:ला देखील कल्पना नव्हती की, त्यांची कामावर इतकी निष्ठा आहे.

**''आपल्याला मूल होऊ शकत नाही, हे स्वीकारणे अत्यंत कठीण होते. मात्र वस्तुस्थितीचा स्वीकार केल्यामुळे जीवनातील प्रश्नांचा सामना करण्यास मी अधिकच कणखर बनले. मी स्वत:लाच बजावले की, कामाला शंभर टक्के योगदान देण्यापासून परावृत्त करणारे कोणतेही पाश माझ्या घरी नाहीत, तेव्हा मी माझे सर्व लक्ष कामावरच केंद्रित करेन.''**

सुरुवातीला त्यांना वाटले होते की, पूर्वी त्या जेथे काम करत होत्या तेथे जेवढे ताणतणाव येत होते, तेवढे जे.पी. मॉर्गनमध्ये नसतील. मात्र काम सुरू केल्यावर अगदी थोड्या कालावधीतच आपण किती चुकीचा विचार करत होतो, हे त्यांना उमगले. नंतरच्या काही महिन्यांतच जगाने भल्यामोठ्या आर्थिक मंदीचा अनुभव घेतला. जे.पी. मॉर्गनदेखील तिच्या तडाख्यात सापडले होते. मात्र त्या संकटातून तावून-सलाखून निघून ही संस्था अधिकच मजबूत झाली आणि जेती ठरली. ''त्या आर्थिक संकटात आमच्या प्रतिस्पर्ध्यांच्या तुलनेत आम्ही अधिक खंबीर राहिलो. त्या वेळी उद्योगसंस्था अगदी भूकंपाच्या केंद्रापाशी होती, हे तुम्ही लक्षात घ्यायला हवे. येणाऱ्या काही महिन्यांत माझी आत्मशक्ती एकदम प्रबळ होऊन सामोरी आली. इतर संस्था जेव्हा कर्ज, दिवाळखोरी आणि जामीन या चक्राशी झगडत होत्या, तेव्हा आम्ही मात्र संकटग्रस्त उद्योगसंस्थेच्या मागे ठामपणे उभे होतो.''

कल्पना यांचे मानणे आहे की, एक देवाची इच्छा आणि कोणत्याही कठीण प्रसंगी जेथे काही समस्या निर्माण झाली आहे. तेथील प्रत्येक घटकाच्या दृष्टीने योग्य होईल, असे उत्तर शोधण्याची त्यांच्या अंतरात्म्याची भूक या दोन गोष्टींमुळेच त्यांचे आजचे आयुष्य पुढे आले आहे. त्यांनी जेव्हा दुसरी कारकिर्द करायची ठरवली तेव्हा नशिबच त्यांना जे.पी. मॉर्गन येथे घेऊन आले. जे.पी. मॉर्गनचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जेमी डिमॉन यांच्याबद्दल आणि त्यांची कामाबद्दलची एकूण तरतमभावात्मक आस्था याबद्दल कल्पना यांना वाटणारे आदरयुक्त कौतुक हे तेथे रुजू होण्याचे दुसरे कारण होते. सन २००५मध्ये कल्पना आणि जेमी डिमॉन यांच्यात पहिल्यांदा संवाद झाला होता. तेव्हा आयसीआयसीआयमध्ये पाच बिलीयन अमेरिकी डॉलर्सचा निधी उभारण्याचे काम सुरू होते. हा त्यांचा भारताबाहेरील सर्वांत मोठा व्यवहार होता. कल्पना यांना आजही आठवते की, सायंकाळी साडेसहाच्या सुमारास त्यांचा मोबाइल वाजला आणि अमेरिकी शैलीतील आवाज त्यांनी ऐकला. तो आवाज त्यांना म्हणाला, ''मी जेमी डिमॉन एक ग्राहक म्हणून बोलतो आहे. मला

आयसीआयसीआयसोबत व्यवहार करायची ही संधी हवी आहे, वित्तीयक्षेत्रातील देवच मला तो व्यवहार करायचा म्हणून सांगत होता. या अनपेक्षित संभाषणाने मी पार गोंधळून गेले होते. बलाढ्य वित्तीय जगात भारत एकदम छोटासा देश आहे, तरीही हा व्यवहार आपल्याला मिळावा म्हणून जेमी डिमॉन स्वत: फोन लावण्यास बुजले नाहीत. त्यांनी थेट माझ्याशी संवाद साधला म्हणून नव्हे, तर त्यांच्या संस्थेबद्दल प्रथम इत्थंभूत माहिती मी गोळा केली आणि नंतरच त्यांच्याशी तो व्यवहार केला.''

कल्पना यांना मागील काही दशकांपासून ओळखणाऱ्या व्यक्ती त्यांची आयसीआयसीआयमधील कनिष्ठ अधिकारी ते उपव्यवस्थापकीय संचालिका पदापर्यंतची घौडदौड पाहून म्हणतात की, 'या महिलेचे धैर्य, चिकाटी आणि सातत्याने कठीण प्रसंगातून मार्ग काढण्याची हातोटी थक्क करणारी आहे.' उद्योगसंस्थेतील कायदेतज्ज्ञांनी सर्व बाबी काटेकोरपणे अभ्यासल्याशिवाय कोणत्याही क्षेत्रातील नवीन काम सुरू केले जायचे नाही. या व्यवहारज्ञानाचे शतश: आभार मानले पाहिजे, कारण त्यामुळेच कायदेतज्ज्ञ असलेल्या कल्पनांना उद्योगसंस्थेच्या प्रत्येक पायरीवर सहभागी होता आले. अगदी पैसे उभे करण्यापासून ते उद्योगसंस्थेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी के.व्ही. कामत हे जेव्हा सन १९९९मध्ये न्यू यॉर्क शेअर बाजारातील अमेरिकन डिपॉझिटरी शेअर्स (एडीआरएस) यांच्या यादीत येणाऱ्या आयसीआयसीआय या भारतीय उद्योगसंस्थेचे मुख्य कार्यकारी झाले, त्या दिवसाच्या नियोजनापर्यंत सर्वांमध्ये कल्पना यांचा सहभाग होता.

आयसीआयसीआय आणि आयसीआयसीआयच्या उपबँका या सर्वांचे विलीनीकरण करून वित्तीय गट आणि घाऊक व किरकोळ बँक असा कारभार करणारी एकच संस्था निर्माण करणाऱ्या प्रमुख समितीमध्ये कल्पना यांचा समावेश होता. त्या विलीनीकरणाने आजच्या बलाढ्य अशा आयसीआयसीआयच्या स्वरूपाची मुहूर्तमेढ रोवली गेली. ''सन २००१ मध्ये आम्ही जाहीर केले की, मार्च, २००२मध्ये विलीनीकरणाची प्रक्रिया पूर्ण करणार आणि आम्ही ती केली. मला याच पद्धतीने काम करायला आवडते. पुढे यायचे आणि आपल्या वैयक्तिक निष्ठा पणाला लावून काम करायचे आणि म्हणायचे, 'जर मी हे केले नाहीतर मला खुशाल फासावर लटकवा.' असे केल्याने तुमच्या सर्व शक्ती एकवटून कार्य सिद्धीस नेतील.''

अयशस्वी ठरलेल्या दाभोळ वीजप्रकल्पाच्या पुनर्वाटाघाटीकरिता एक

समिती स्थापन करण्यात आली. विदेशी प्रवर्तकांसोबत बोलणी करणाऱ्या गटाचे नेतृत्व कल्पना यांच्याकडे होते. ही बोलणी बहुधा फारच लांबलचक आणि अत्यंत निराशाजनक असायची. परदेशी गुंतवणूकदार जीई आणि बेकटेल यांच्यासोबत दाभोळ वीजप्रकल्पाच्या पुनर्रचनेसंदर्भातील वाटाघाटीच्या दरम्यान आलेला ताण आणि नैराश्य त्यांना अगदी आजही आठवत आहे. महिनोंमहिने कोणत्याही प्रकारचा तोडगा न निघता निष्फळ चर्चांचे गुऱ्हाळ सुरू होते.

अमेरिकेतील बलाढ्य अशा एन्रॉन उद्योगसंस्थेचा जीई आणि बेकटेल यांच्या भागीदारीत दाभोळ वीजप्रकल्प हा अत्यंत महत्त्वांकाक्षी प्रकल्प होता. यातून वीजेची कमतरता भासणाऱ्या महाराष्ट्र राज्याला २००० मेगॅवॅट वीजपुरवठा करण्याची योजना होती. भारतातील तसेच परदेशातील वित्तपुरवठा करणाऱ्या, भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांच्या हमीमुळे आयडीबीआय, आयसीआयसीआय आणि एसबीआय या संस्थाही वित्तपुरवठा करणार होत्या. अगदी पूर्ण होत आलेला हा प्रकल्प विविध कारणांमुळे बारगळला. महाराष्ट्र सरकारने चढ्या दराने वीज खरेदी करण्यास दिलेला नकार हेदेखील यातील एक अत्यंत महत्त्वाचे कारण होते. त्याच वेळी अमेरिकेत एन्रॉन दिवाळखोरीत निघाली. त्यात भर पडली विविध वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांनी तिच्यावर दावे दाखल केले. यामुळे दाभोळ वीज प्रकल्प कमकुवत झाला. भारत सरकारने 'नॅशनल थर्मल पॉवर कार्पोरेशन (एनटीपीसी) आणि 'गॅस ॲथोरिटी ऑफ इंडिया लिमिटेड' (जीएआयएल) या नव्या प्रवर्तकांना प्रकल्प सुरू करण्यासाठी काय-काय करावे लागेल, याचा शोध घेण्यास सांगितले.

कल्पना प्रकल्पातील तांत्रिक बाबी समजून घेत होत्या, तसेच हातातील कार्याचे स्वरूप किती गुंतागुंतीचे आहे, हेही समजून घेत होत्या. त्यांच्या लक्षात आले की, समितीची सर्व सूत्रे आपल्याच हाती सोपवण्यात आली आहेत. खरं म्हणजे तेव्हा आयडीबीआयचे अध्यक्ष एम. दामोदरन वाटाघाटीचे नेतृत्व करत होते. नेमकी तेव्हाच त्यांची नियुक्ती 'सिक्युरिटी ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया'(सेबी)च्या अध्यक्षपदी करण्यात आली. त्यामुळे एम. दामोदर यांना वाटाघाटी अर्धवट सोडाव्या लागल्या.

कोणत्याही परिस्थितीत आपण जिंकले पाहिजे, असे त्यांना वाटत होते. आयुष्य म्हणजे केवळ जिंकणे, असा त्यांचा ठाम विश्वास होता आणि अशी कोणतीही परिस्थिती नाही की, जिच्यावर विजय मिळवता येणार नाही. त्यामुळेच धोरणे ठरवण्यासाठी अहोरात्र जागून महिनोंमहिने त्यांनी

वाटाघाटीचे काम केले. ''अनेक वर्षांच्या अनुभवातून मिळालेले वाटाघाटी करण्याचे कौशल्य मी उपयोगात आणत होते. बैठकीत समाविष्ट लोकांच्या देहबोलीचे अगदी बारकाईने निरीक्षण करत होते. सखोल अभ्यास करण्यास मी शिकले तसेच कधीही तयारी न करता बैठकीस गेले नाही. बैठकीत सहभागी होणाऱ्या सर्वांचे पैलू समजून घेतले होते, तसेच प्रत्येकाशी स्वतंत्रपणे संवाद देखील सुरू ठेवला होता. त्यातील प्रत्येकाचे तसेच एकंदर समूहाचे प्राधान्य कशास आहे हे समजून घेतले की, आपल्यास जे साध्य करायचे असते ते कसे करावे लागेल, याची कल्पना येते. दाभोळ वीज प्रकल्प पुन्हा सुरू करणे हेच वाटाघाटीचे फलित असणार होते आणि तसे झाले तरच आम्हीदेखील यशस्वी होणार होतो. आता हा प्रकल्प सुरू होणे, देशाच्या प्रतिष्ठेचाही प्रश्न बनला होता. बोलणी सुरू असताना त्या दरम्यान प्रत्येक टप्प्यावर मला नेमके काय हवे आहे, याचा मी व्यवस्थित अभ्यास केला.'' सरतेशेवटी प्रकल्पाची मालमत्ता वाचवण्याच्या हेतूने सन २००५ साली 'रत्नागिरी गॅस अॅन्ड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड' विकण्यात आली. आता हा प्रकल्प महाराष्ट्रासाठी वीजनिर्मिती करतो आहे. **''अडचणींवर मात करून प्रत्येक वेळी नवा मार्ग काढतानाचे क्षण, न्यायालयाने विक्रीस मान्यता दिलेला क्षण, आम्ही प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट देऊन तो परत कसा सुरू करता येईल याचा विचार केला तो क्षण आणि शेवटी एकदाचे ते घडले, तो क्षण या क्षणांनी मला खूप आनंद दिला, जणू काही मला सर्वोच्च शिखरावर नेऊन ठेवले होते.''**

सहजच कामात गढून जाण्याची त्यांची वृत्ती थक्क करणारी आहे. यामुळेच त्या कारकिर्दीत भराभर यशाच्या पायऱ्या चढल्या. आयसीआयसीआयमधील सुरुवातीच्या एक-दोन वर्षांनंतर लगेच त्यांनी त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडून झाल्यावर आणखी काही कामे स्वत:हून करण्यास सुरुवात केली. जास्तीचे काम केले. ''तुम्ही वकील असण्याची सर्वोत्कृष्ट बाब म्हणजे तुम्ही सर्वच बाबतीत रस घेऊ शकता. आंतरराष्ट्रीय वित्त पुरवठा, नवी उद्योगसंस्था सुरू करणे, नवीन उत्पादन बाजारात आणणे. प्रत्येक बाबतीत तुम्ही वकील असल्याने तुमचा सहभाग अत्यावश्यक असतो. एखादी नवीन कल्पना सुचणे आणि लागलीच ती कोणासमोर तरी मांडता येणे, यात मला फारच उत्साह वाटतो. माझ्या वरिष्ठांशी चर्चा करण्यास मला कधीच संकोच वाटला नाही.''

या दरम्यान त्यांना देण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांनी त्यांच्या अंतरीच्या उत्सुकतेला चांगलेच खाद्य पुरवले. सन १९८०च्या दशकात जेव्हा

उद्योगसंस्थेच्या आर्थिक जबाबदाऱ्या हा अत्यंत महत्त्वाचा विषय म्हणून सामोरा येत होता, तेव्हा कल्पना विदेशातून निधी उभारण्याच्या कामात केंद्रस्थानी होत्या. त्या वेळेपर्यंत भारतीय अर्थव्यवस्था जागतिक व्यापाराच्या दृष्टीने बंद स्वरूपाची होती. तेव्हा भारतीय औद्योगिक कारखाने आणि व्यापारी यांना विदेशी चलनात कर्ज उपलब्ध करून दिले होते. त्या वेळी या संदर्भातील कायदेशीर बाबी समजून घेणे, प्रत्येक देशाचे परदेशी (फॉरेक्स) गुंतवणुकीसंदर्भातील नियम समजून घेणे, या गोष्टी त्यांच्यासाठी आवडीच्या आणि जबाबदारीच्या होत्या.

सन १९८१मध्ये जेव्हा आयसीआयसीआयने सिंगापूर आणि लक्झेम्बर्ग या ठिकाणच्या शेअर बाजारातील यादीत नाव येण्यासाठी ३०० कोटी अमेरिकी डॉलर्सचा करार करण्याचे धाडसी पाऊल उचलले तेव्हा जगातील श्रेष्ठ विदेशी गुंतवणूकदार बँका, कायदेपंडीत आणि लाल फितीचा कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांसमवेत कल्पना यांचा संबंध आला आणि त्या जगातील गुपिते त्यांनी स्पंजसारखी शोषून घेतली. अतिउच्च व्यवस्थापनासोबत काम करण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग होता. त्यांच्या कारकिर्दीवर अगदी जवळून दृष्टिक्षेप टाकला असता लक्षात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध जबाबदाऱ्या अगदी लीलया पार पाडल्या आहेत. हेच त्यांच्या कारकिर्दीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. त्यांच्या वरिष्ठांनी त्यांना विविध प्रकल्पांवर काम करण्याची संधी दिली हेदेखील त्यांच्या वैविध्यपूर्ण कारकिर्दीचे गमक आहे. ''माझ्या कारकिर्दीचा आलेख केवळ माझी वैयक्तिक हुशारी आणि कौशल्ये यांमुळेच सतत चढत्या क्रमाने राहिला नाहीतर प्रत्येक वेळी वरिष्ठांनी मी त्या सर्व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडू शकते, असा विश्वास माझ्यात निर्माण केला त्यामुळे देखील झाला.''

कल्पना यांची उद्योगसंस्थेला मार्गदर्शन करण्याची क्षमता ही त्यांना आयसीआयसीआयमध्ये श्री. कामत यांनी केलेल्या सहज-सोप्या मार्गदर्शनातून आलेली आहे. त्यांनी त्यांना विविध क्षेत्रातील जबाबदाऱ्या पार पाडण्यास सांगितले. जर वरिष्ठ व्यवस्थापनात सामील व्हायचे असेल, तर केवळ कायद्यातच नव्हेतर अन्य क्षेत्रातदेखील काम करण्याची क्षमता आहे हे दाखवून द्यावे लागेल, असेही त्यांनी सुचवले. त्यांच्या उद्योगसंस्थेच्या व्यवस्थापन मंडळात ज्यांच्याकडे व्यवस्थापन विषयक औपचारिक शिक्षण नसलेल्या कल्पना या एकमेव सदस्य आहेत. आधी कल्पनांना या गोष्टीचा सल वाटत असे, पण आता त्याबद्दल कोणत्याही प्रकारची भीती वाटत

नाही. ‘‘या वर्षांमध्ये आयुष्य हाच माझा उत्तम गुरू ठरला आहे.’’

त्यांच्या नेतृत्वाच्या शैलीचे सर्व श्रेय श्री. कामत यांच्याकडेच जाते असे त्यांना वाटते. ‘‘त्यांची मार्गदर्शन करण्याची पद्धत अद्वितीय आहे. आमच्यात काही गुरू-शिष्याचे औपचारिक नाते नव्हते. मात्र त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीचे निरीक्षण करत मी शिकत होते. त्यांनी सातत्याने माझ्यावर आव्हानात्मक कामे सोपवली आणि मी माझ्या क्षमतांना अधिक ताण देऊन त्या वाढवाव्यात म्हणून मला प्रोत्साहन दिले. एखाद्या प्रकल्पावर काम करत असताना काही अडचणी आल्यास मी त्यांच्याकडे जायचे आणि नेहमीच ते माझे मार्गदर्शन करत असत. समोरच्या व्यक्तीची कार्यक्षमता ओळखण्यात त्यांचा हातखंडा होता. तसेच त्या व्यक्तीस आपल्या क्षमतांना थोडा ताण देऊन करता येतील, अशी कामे सोपवण्यातदेखील ते तरबेज होते. त्यांची मार्गदर्शनाची पद्धती समोरच्या व्यक्तीला उन्नत करणारी होती.’’ कामत जेव्हा व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी होते, तेव्हा कल्पना एकाच वेळी तीन जबाबदाऱ्या पार पाडत होत्या. एक कायदेविषयक गटाची प्रमुख, दुसरी मुख्य कोषाधिकारी आणि तिसरी उद्योगसमूहाची विशिष्ट छाप निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या सुसंवादाची प्रमुख ज्यामध्ये गुंतवणूकदार तसेच प्रसिद्धी माध्यमांसोबतच्या संबंधाचादेखील अंतर्भाव होता.

‘‘थोड्याशाच कालावधीत इतक्या सर्व गोष्टी शिकायच्या, आत्मसात करायच्या म्हणून भीती वाटली होती. मात्र मी ते सर्व केले. प्रथम आर्थिक उद्योगातील सर्वोत्तम, बुद्धिमान अशा माणसांची नेमणूक करून एक चांगला गट तयार केला. त्यांना त्यांचे काम स्वंतत्रपणे करू दिले आणि माझी भूमिका सर्वसाधारण मार्गदर्शकाची आणि किचकट धोरणे ठरवणे अशीच ठेवली.’’ साधनसामग्रीचे दळणवळण ‘रिसोर्स मोबिलायझेशन’ ही त्यांची प्रमुख जबाबदारी होती. त्या जबाबदारीला योग्य न्याय देऊ शकल्या का? तर अर्थातच ‘होय’. त्यांनी हे आव्हान स्वीकारल्याच्या काही महिन्यांनंतर जागतिक ठेव पावत्यांच्या ‘ग्लोबल डिपॉझिटरी रिसीट्स’ (जीडीआर) माध्यमांतून आयसीआयसीआयने २०० मिलियन अमेरिकी डॉलर्स जागतिक व्यापारातून उभे केले.

कल्पनांना परिपूर्णतेचा ध्यास असल्याचे त्या स्वत:च कबूल करतात. ९०च्या दशकाच्या सुरुवातीला गुंतवणूकदार स्टील उद्योगाबाबत साशंक होते. कल्पनांना त्यांना सामोरे जायचे होते. ‘‘आम्ही स्टील उद्योगांना खूप कर्ज पुरवठा केला होता. त्यामुळे आमच्या गुंतवणूकदारांच्या शंकाचे

तातडीने समाधान करणे, अत्यंत गरजेचे होते. मी आमच्या संस्थेतील स्टील संदर्भातील तज्ज्ञांस गाठले आणि स्टील कसे तयार होते, कच्च्या मालाची आयात कशी होते, तसेच स्टीलचा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील भाव कोणत्या निकषांवर ठरतो, अशा सर्व गोष्टी समजून घेतल्या. ही सर्व माहिती कशा प्रकारे व्यवस्थित लक्षात ठेवता येईल हे पाहिले. माहिती अगदी पाठच केली. त्यानंतर मात्र स्टील संदर्भात बोलावे लागेल, अशा एकाही बैठकीला गेले नाही आणि एकाही प्रश्नाचे उत्तर न देता मी परतले!''

**जे.पी. मॉर्गनमध्ये रुजू होणे, हा जीवनात एक परिवर्तन घडवून आणणारा अनुभव होता. त्यांचा हा निर्णय त्यांनी स्वतः विचारपूर्वक घेतला होता आणि यासाठी कोणीही त्यांच्यावर जोरजबरदस्ती केलेली नव्हती. एका घरातून दुसऱ्या घरी आल्यावर वाटते, तसेच त्यांना जे.पी. मॉर्गन येथील पहिल्या दिवशी वाटले.**

त्यांच्या नवीन कामांमध्ये नवनवीन आव्हाने होती आणि यामुळे त्या फारच उत्साहित होत्या. एका सुरक्षित, ओळखीच्या वातावरणातून त्या नवीन ठिकाणी आल्या होत्या. येथे त्यांच्यावर उद्योग संस्थेच्या भारतातील संपूर्ण कारभाराची जबाबदारी होती. यामध्ये बँक गुंतवणूक, म्युचुअल फंड, ट्रॅन्झॅक्शन बँकिंग आणि कॅप्टिव्ह बिझनेस प्रोसेस आउटसोर्सिंग हा विभाग, या एका विभागातच १५,००० कर्मचारी होते आणि हा विभाग भारतातील इतर मोठ्या विभागांपैकी एक होता!

आयसीआयसीआयमध्ये त्यांच्यावर ज्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या होत्या त्या पार पाडताना त्या ज्या सहजतेने काम करू शकत होत्या, अशा स्वरूपाच्या जबाबदाऱ्या मोठ्या बहुराष्ट्रीय उद्योगसंस्थांमधून चालणाऱ्या लालफितीच्या कारभारात त्यांना पार पाडता येतीलच असे नाही, असा सावधगिरीचा इशारा त्यांच्या मित्रमंडळींनी तसेच हितचिंतकांनी त्यांना दिला होता. कल्पना यांना ही उद्योगसंस्था एशिया पॅसिफिक क्षेत्रात अतिशय उत्तमरित्या कार्यरत असलेली आढळली. ''मी येथील कार्यपद्धती आणि प्रक्रिया तसेच उद्योगसंस्थेतील संवादकौशल्य, समन्वय यामुळे खूपच प्रभावित झाले. मागील वर्षाच्या आर्थिक मंदीच्या संकटामध्ये वरिष्ठांनी माहितीचा ओघ टाउन हॉल मीटिंग आणि ईपत्रांमधून सातत्याने आमच्यापर्यंत पोहोचवला. खुद्द जिमी आणि प्रत्येक क्षेत्राचे मुख्य अधिकारी यांनी सर्व प्रकारची माहिती आमच्यापर्यंत पोहोचवली होती.''

कल्पनांनी बारकाईने काम सुरू केले. क्षमता वाढवणे आणि सुधारणे,

यावर भर दिला. अनिश्चित आर्थिक स्थितीत किमतींवर नियंत्रण ठेवले. उद्योगाचा महसूल वाढवला आणि उद्योगसंस्थेसाठी उत्तम व अत्यावश्यक अशा प्रक्रिया राबवून प्रत्येक पाऊल जपून टाकले. आयसीआयसीआयमध्ये त्या मनुष्यबळ विभागाच्या प्रमुख होत्या. तेथे त्यांना मोठ्या कामगार संख्येला कसे हाताळायचे याचा चांगलाच अनुभव होता. हा अनुभव आणि आपल्या भोवतालच्या लोकांबद्दल स्वभावातच असलेले ममत्व, लोकांची हुशारी, बुद्धिमत्ता ओळखण्याची क्षमता आणि त्याचबरोबर त्यांच्या भावभावना सांभाळण्याचे कसब या सगळ्यांमुळे त्या जे.पी. मॉर्गन येथील मोठी जबाबदारी पेलण्यास तयार होत्या. खरं म्हणजे त्या वेळी त्यांच्याकडे नोकरीचे बरेच प्रस्ताव होते. बाकीच्यांना डावलून जे.पी. मॉर्गनच निवडण्यामागेदेखील जिमी डिमॉन यांचे प्रभावी व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व याची एक कथा आहे. अशा माणसाकरता तुम्ही प्रत्यक्ष समरांगणावरदेखील जाऊ शकता.''

पारदर्शक व्यवस्था अथवा कारभारावर त्यांचा गाढविश्वास आहे. आणि त्यांच्या नेतृत्वाची शैली या विश्वासाभोवतीच फिरते. वरिष्ठ, कनिष्ठ आणि बरोबरीचे, सर्व थरांवर पारदर्शकता महत्त्वाची. संस्थेत काम करणाऱ्या प्रत्येकाला योग्य आदर मिळाला पाहिजे. तसेच त्यांच्या कार्याचा योग्य सत्कार झाला पाहिजे, यावर त्यांचा विश्वास आहे. समजा एखाद्याला संस्थेत योग्य ती वर्तणूक मिळाली नाहीतर त्याचा परिणाम म्हणून ती व्यक्ती काम सोडून जाते.

''जेथे लोक आहेत तेथे मतभेद, कुरबुरी या होणारच. अशावेळी त्या प्रकरणातील दोन्ही बाजू समजून, अभ्यासून त्यास लागू होईल, असा उपाय शोधता येतो. सर्वच उपाय त्यातील प्रत्येकाला आवडतील असे नाही. मात्र उद्योग काही लोकांच्या व्यक्तिगत आवडीनिवडीनुसार चालवता येत नाही. कामावर असताना तेथील वरिष्ठ, कनिष्ठ तसेच इतर सहकारी, सर्वांसोबत कायमच केवळ व्यावसायिक दृष्टिकोनातून संबंध ठेवणे फार कठीण असते. यामुळेच जरी समजा कार्यालयात काही गोष्टी आपल्या मनाप्रमाणे झाल्या नाहीत, तरी आपण आपल्या सहकाऱ्यांसोबतचे कार्यालयाबाहेरील संबंध बिघडू देता कामा नयेत. लोकांची स्मरणशक्ती दांडगी असते आणि तुम्ही चुकून जरी त्यांना दुखावले वा खजील केले असेल, तर ते ती बाब कधीही विसरत नाहीत.''

त्या मूलत: आनंदस्वरूप असून हा आनंद भोवतालच्या लोकांमध्ये पसरवण्यास त्या उत्सुक असतात; मात्र याचबरोबर त्यांचे मन अत्यंत

महत्त्वाकांक्षीदेखील आहे. त्यांना भेटणे सहजसाध्य आहे. त्या सांगतात की, त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या संबंधांपैकी काही अगदी बालपणापासूनचे आहेत. त्यांची बालपणीची एक मैत्रीण विवाहापश्चात पाकिस्तानात स्थायिक झाली आहे. फार वर्षांपूर्वी त्या तिला भेटायला दुबईहून विमानाने पाकिस्तानात गेल्या होत्या. तेव्हा भारत-पाकिस्तान थेट विमानसेवा उपलब्ध नव्हती. त्यांच्या आणखी एका जवळच्या मैत्रिणीला त्या नियमितपणे भेटतात. खरे तर त्या दोघींमध्ये काहीही साधर्म्य नाही. ती एक गृहिणी, आई आहे आणि आता आजीदेखील झाली आहे. तर दुसरीकडे कल्पना यांच्या कारकिर्दीकडे नुसता दृष्टिक्षेप जरी टाकला तरी भीतीने जीव दडपतो.

कल्पना यांची गोष्ट एका सदासुखी आणि आनंदी मुलीची असून केवळ आपल्या प्रेमळ आईच्या आग्रहामुळे काहीशा अनिच्छेनेच त्या करिअरच्या मागे लागल्या. आईने तिची लाडकी लेक खूप मोठी व्हावी म्हणून स्वप्न पाहिले होते. त्यांची आई स्वत: अत्यंत हलाखीचे जीवन जगल्या होत्या. त्यामुळेच आपल्या मुलीकडे सुखी संसारापलीकडेदेखील काही असले पाहिजे, असे त्यांना वाटत होते.

भारतातील सर्वांत समर्थ महिलांच्या यादीत कल्पना यांचे नाव नियमितपणे येते. एकंदर भारतीय औद्योगिक क्षेत्राची वैविध्यतेच्याबाबतची कामगिरी समाधानकारक आहे असे त्यांना वाटते. बऱ्याच उद्योगांमध्ये वैविध्यतेच्याबाबत विशिष्ट धोरण राबवले जाते. कामगारांसोबतचे संबंध अधिकाधिक मैत्रीपूर्ण करण्याकरिता ज्याचे कामकाज लिंगभेदरहित आहे, अशा एका चांगल्या मनुष्यबळ विभागाची निर्मिती करण्याकरिता उद्योगांना फार कालावधी लागेल. ''आजच्या धावपळीच्या आयुष्यात स्त्री आणि पुरुषांना सारख्याच समस्यांचा सामना करावा लागतो.''

आपल्या देशातील सर्व भागात प्रवास केल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले आहे की, विविध क्षेत्रात मनुष्यबळ विभागाचा दृष्टिकोन हा तिरकसच असतो. आपल्या देशात सेवा क्षेत्रात महिलांना खूपच संधी आहे आणि उत्पादन विभागात त्यांची संख्या फारच कमी आहे आणि तरीही ही संख्या वाढण्याची अपेक्षा आहे.

''एके दिवशी मी एका मोठ्या सार्वजनिक उद्योगसंस्थेच्या कार्यालयास भेट दिली. माझी तेथील अध्यक्षांसोबतची बैठक आटोपल्यावर त्यांनी मला त्यांच्या कार्यालयातील महिला अधिकाऱ्यांना भेटण्याची विनंती केली. त्यातील बहुसंख्य महिला या अभियंता (इंजिनीअर) होत्या, हे जाणून मला

आश्चर्य वाटले. त्यांच्या सोबत घालवलेला अर्धा तास अगदी मजेत गेला, इतकेच नव्हे तर मला त्यांचा सहवास प्रेरणादायीदेखील वाटला. तेथेच मला आणखी एक गोष्ट समजली की, या उद्योगसंस्थेची एक शाखा संपूर्णपणे महिलाच चालवतात. अगदी रात्रपाळीदेखील त्याच करतात. आपल्या महिला ज्या क्षेत्रात काम करतात, तेथे प्रगती करत आहेत. म्हणूनच तेथून निघताना मी फारच आनंदात होते.''

औद्योगिक क्षेत्रातील उच्च पदस्थांमधील महिलांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे कल्पना यांना विश्वास वाटतो की, सरतेशेवटी अर्थपूर्ण करिअर करू इच्छिणाऱ्या लाखो महिलांच्या स्वागतासाठी आपले औद्योगिक क्षेत्र सज्ज झाले आहे. ''महिला उत्तम नेतृत्व करतात आणि त्या उत्तम वरिष्ठदेखील असतात. माझ्या मते महिला नेतृत्व जी सहानुभूती आणि भावना कार्यस्थळी आणतात त्याला तोड नाही!''

कल्पना आपल्या हाताखालील व्यक्तींची काळजी आईच्या मायेने घेतात आणि त्यांचा असा ठाम विश्वास आहे की, महिला नेतृत्व सभोवतालच्या सहकाऱ्यांमध्ये जे भावनिक बंध निर्माण करतात त्याला पर्यायच नाही. ''मी अगदी सुरुवातीलाच शिकले की, आपल्या गटामधील लोकांशी वागताना त्यातील प्रत्येक जण ही स्वतंत्र व्यक्ती असून तिला स्वत:चे आयुष्य, स्वाभिमान आणि कुटुंब असते, हे लक्षात घेतले पाहिजे. त्यांच्या दिवसाचा बराचसा काळ ते कार्यस्थळी घालवतात आणि म्हणूनच त्यांना भावनिक दृष्ट्या सुरक्षित वाटावे आणि आधार वाटावा, असे वातावरण निर्माण करणे, मी माझे कर्तव्य समजते.'' मध्यंतरी त्यांच्या कार्यालयातील बाळंतपणाच्या रजेवर असलेल्या एका तरुणीचा त्यांना फोन आला की, तिला कन्यारत्नाचा लाभ झाला आहे. कल्पना एक चांगल्या नेत्या आणि वरिष्ठ असल्याचा हा पुरावाच आहे. ''तिने ज्या तीन लोकांना फोन करून प्रथम ही गोड बातमी दिली, त्यातील मी एक होते. यामुळे मी खूपच भावूक झाले.''

कल्पना स्वत:च्या कार्यशैलीबद्दल म्हणतात की, व्यक्तीच्या क्षमता वृद्धिंगत होतील, असेच काम मी त्यांना सोपवते. त्याचबरोबर काम वेळेत पूर्ण करून घेण्याबाबतही त्या अगदी काटेकोर असतात. ''मी त्यांच्या मर्यादांनाच आव्हान करते. त्यांच्यातील सुप्त गुण बाहेर आणते. माझ्यासारख्या वरिष्ठांसोबत काम करणे त्यांना अवघड जात असेल, असे मला वाटत नाही.'' आयसीआयसीआय-मध्येच त्यांच्यातील नेतृत्व गुण आणि कौशल्ये वाढीस लागली असतील. ज्या वेळी इतर उद्योगसंस्थांमधून

वरिष्ठ व्यवस्थापनात महिलांचे अस्तित्व अभावानेच होते, तेव्हा आयसीआयसीआयमध्ये एकाच वेळी अर्धा डझन महिला वरिष्ठ व्यवस्थापनातील उच्च पदाच्या दिशेने कूच करत होत्या. ''मी माझे भाग्यच समजते की, आयसीआयसीआयमध्ये कधीच लिंगभेद केला गेला नाही. सन १९७५ला मी आयसीआयसीआयमध्ये रुजू झाले तेव्हापासून आजपर्यंत केवळ महिला आहात म्हणून तुम्ही हे काम करा किंवा हे करू नका, असे म्हणून माझी कधीच हेटाळणी केली गेली नाही. मी जर ते काम करण्यास सक्षम असेल, तर माझ्या पुरुष सहकाऱ्यांना मिळणाऱ्या सर्व संधी तसेच प्रकल्पाच्या जबाबदाऱ्या मलादेखील मिळाल्या होत्या. खूप प्रसंग तर असे आहेत की, उद्योगजगतातील बऱ्याच कार्यक्रमांना मी हजेरी लावल्यामुळे तेथील कार्यक्रम संयोजकांना त्यांच्या स्वागताची सुरुवात 'लेडीज अॅन्ड जेन्टलमेन' ऐवजी 'लेडी अॅन्ड जेन्टलमेन' अशी करावी लागली होती. तेव्हा मला जाणवायचे की, येथे जमलेल्या गर्दीत मी एकटीच महिला आहे!''

**त्यांनी आयसीआयसीआयमध्ये महिला सहकाऱ्यांसोबत 'अत्यंत समाधानकारक मैत्रीचा अनुभव घेतला आहे. महिला अत्यंत कडव्या प्रतिस्पर्धी असतात. त्यांना जे हवे आहे, ते त्या प्रयत्नांती मिळवतात. एकीकडे त्यांच्या करिअरमधील ध्येयाप्रती त्या अत्यंत आत्मकेंद्रित असतात, मात्र त्याचबरोबर ही करिअरची स्पर्धा त्यांच्या मैत्री आड येत नाही.''**

बाहेरील जगात बऱ्याचदा महिला म्हणतात की, त्यांच्या उद्योगक्षेत्राबाहेरील यशस्वी महिलांना भेटण्याची वा बोलण्याची, विविध युक्त्या जाणून घेण्याची संधीच उपलब्ध होत नाही. अशाच भावना कल्पनादेखील व्यक्त करतात. त्यांनी जेव्हा जे.पी. मॉर्गनमध्ये प्रवेश केला तेव्हा जगातील इतर भागात असणाऱ्या अशा परस्पर संबंध निर्माण करणाऱ्या (नेटवर्किंगच्या) व्यासपीठांशी त्यांचा संबंध आला. ''मला वाटते की, भराभर काम आटोपून घरी जाण्याच्या घाईमुळे बहुसंख्य महिला अशा संबंध निर्माण करण्याच्या (नेटवर्किंगच्या) संधी गमावून बसतात. त्याचवेळी पुरुषांना अशाप्रकारे संबंध प्रस्थापित (नेटवर्किंग) करण्यासाठी आणि स्नेहबंध वृद्धिंगत करण्यासाठी बराच वेळ असतो. कामाव्यतिरिक्त भेटण्यासाठी अशी सामाईक व्यासपीठे उपलब्ध झाल्यास त्याचा महिलांना बराच लाभ होऊ शकतो.''

यामुळेच जेव्हा अमेरिकेतील जे.पी. मॉर्गन चेस अॅन्ड कंपनीतील


वित्तीय आणि सुरक्षा विभागाच्या प्रमुख हायडी मिलर भारतात आल्या तेव्हा कल्पना यांनी भारतातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी असलेल्या महिलांना सहभोजनासाठी निमंत्रित केले होते. या निमित्ताने या उच्चपदस्थ महिलांना त्यांच्यासारख्याच इतर यशस्वी महिलांना भेटता यावे आणि त्यांच्याशी ओळख करून घेता यावी यासाठी सहभोजनाचे आयोजन केले होते. ''आपसात जवळीक आणि ऋणानुबंध निर्माण करण्याची ही एक उत्कृष्ट कल्पना आहे. एकाच वेळी आम्ही आमच्या उद्योगाविषयी चर्चा करत होतो आणि मुलं, खरेदी, दागिने अशा हलक्या-फुलक्या विषयांवरही गप्पा मारत होतो. फारच मजा आली. आपापसातील संबंध दृढ करण्यासाठी तसेच विचारांचे आदानप्रदान करण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन केले पाहिजे.''

**जेव्हा त्या काम करत नसतात, अर्थात असे क्वचितच घडते, तेव्हा त्या एकतर खरेदी करतात किंवा सिनेमा पाहातात. मात्र त्यांच्या सर्वांत आवडीचे काम काय असेल, तर शनिवार-रविवार मस्त घरी राहायचे आणि आपल्या वाचनाचा कोटा पूर्ण करायचा. आयन रॅन्ड यांचे 'फाउन्टन हेड' आणि 'ॲटलास श्रग्ड' ही पुस्तके त्यांना फारच आवडली आहेत. तसेच रामचंद्र गुहा यांचे 'इंडिया आफ्टर गांधी' आणि ॲन्ड्र्यू सारकिनचे 'टू बीग टू फेल' ही पुस्तकेदेखील त्यांना आवडतात. ''डोळ्यांनी साथ देणे बंद केले तर मी वाचू शकणार नाही, याची मला सर्वांत जास्त भीती वाटते.''**

प्रत्येकाने आपल्याकडील संपत्तीचा काही भाग समाजाला परत केला पाहिजे असे कल्पनांना ठामपणे वाटते. त्यामुळेच मुलांकरिता राबवल्या जाणाऱ्या एसओएस व्हिलेज प्रकल्पाच्या त्या आश्रयदात्या आहेत. गुजरातमधील त्यांच्या गावी त्यांनी आईच्या स्मृतिप्रित्यर्थ शाळेला देणगी दिली आहे. ''तिनेच माझ्यासाठी सारी स्वप्ने पाहिली होती. मी तर एकदम बिनधास्त आनंदी मुलगी होते. मला फक्त लग्न करून घर-घर खेळत बसायचे होते. मात्र मागील ३५ वर्षांत माझे कामच माझी ओळख बनले आहे. हाच माझ्या आयुष्यातील आनंदाचा ठेवा आहे आणि या सर्वांसाठी मला माझ्या आईचेच आभार मानायला हवेत.''




## ज्ञानसूर्याची सावली




निवृत्तीनाथांच्या कृपेने गुरुप्रसाद लाभला. ज्ञानेश्वरांच्या छायेत आत्मविकास साधला आणि मुक्ताईच्या सहवासात जिवंतपणीच मुक्तिस्वातंत्र्य अनुभवले असे संतश्रेष्ठ सोपानदेव! त्यांची जीवनगाथा वेगळी काय असणार? चारही भावंडे म्हणजे 'परब्रह्मीचे ठसे' द्वैत राखून अद्वैत साधणारी ही अवतारी मंडळी भागवत धर्मातील कुलदैवते ठरावीत इतकी महान अशा या संतसज्जनावर लिहिताना चौघांना एकमेकांपासून वेगळे काढता येतच नाहीत. परंतु हा दैवी चमत्कार मंजुश्री गोखले यांनी करून दाखविला आहे. या प्रेरणापूर्तीचे नाव आहे : 'ज्ञानसूर्याची सावली'

एक तर संतचरित्रे म्हणजे न संपणारे संशोधन. सुमारे सातशे वर्षांपूर्वीचा इतिहास उपलब्ध असला तरी तो श्रीमंत राजामहाराजांचा. साधुसंत निरहंकारी. ते स्वत:बद्दल सांगायला संकोच करतात. संतशिरोमणी नामदेवांनी या भावंडांची चरित्रे लिहिली नसती तर केवढा मोठा काळ अज्ञात राहिला असता! त्याचा धांडोळा घेत मंजुश्रीताईंनी याआधी 'तुकयाची आवली', 'जोहार मायबाप (चोखामेळा ओंकाराची रेख जना) या जीवनगाथा लिहिल्या आणि अफाट लोकप्रिय झाल्या आहेत विविध विषयांवरील

त्यांच्या सुमारे पंचवीस पुस्तकांनी त्या वाचकप्रिय झाल्या असून अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत.

डॉ. अशोक कामत हे संतसाहित्याचे जिव्हाळ्याचे अभ्यासक. त्यांच्या प्रस्तावनेत 'ज्ञानसूर्याची सावली'चे महत्त्व विशद करताना म्हटले आहे की, 'तेराव्या शतकातील केवळ तीन दशकां'चा दस्तऐवज अस्सल आहे का? हा प्रश्न संशोधकांना कायम अस्वस्थ करतो. लोकाश्रयावर जागृत राहिलेली संतांची समाधिस्थाने 'जिवंत' असली तरी सारे काही श्रद्धेच्या बळावरच कल्पनेला राबवून लेखन करावे लागते. ते मंजुश्रीताईंनी पुरेसे समाधानकारक केले आहे. सूर्य दाखवता येतो. पण किरणांचे काय? कवडसे तेजस्वी असतात. सूर्यापासून ते वेगळे नसतात हेच दाखवून सोपानदेवांचे वेगळेपण अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

निरनिराळ्या प्रसंगी झालेल्या चर्चेत सोपानदेवांनी आपली प्रज्ञा आणि प्रतिभा यांची वेळोवेळी जी चमक दैदीप्यपूर्ण दाखविली आहे ती मुळातूनच वाचण्यासारखी आहे.

यातील दशक्रिया विधीची सूक्ष्म. पण महत्त्वाची माहिती आणि संजीवन समाधीचे रहस्य लेखिकेने यथार्थपणे चितारले आहे. हटयोगातील गूढरम्य भाषा अधिक सोपी करण्याचा प्रयत्न केला तरी काही सांकेतिक शब्द तेच ठेवल्याने वाचकांस पुरेपूर अर्थबोध होऊ शकतो.

अभ्यासकातील मतभेदाचा आदर करून 'जसे आहे तसे' सत्व शोधण्याचा हा लेखनप्रवास आनंदाच्या इच्छित स्थळी वाचकांस घेऊन जातो आणि आत्मिक समाधान देतो. सोपानदेवांच्या समाधीचा प्रसंग आणि सासवडचा परिसर नामदेवांचा अभंगांचा आधर घेऊनही लेखिकेची स्वतंत्र कल्पनाशक्ती सहज नजरेत भरते. 'प्रभात'च्या कृष्णधवल चित्रपटमालिकेत सहज सामावले जाईल असे हे संपूर्ण कथानक प्रत्येक भाविक आणि रसिकाने वाचायलाच हवे. फाल्गुन ग्राफिक्सचे मुखपृष्ठ अप्रतिम आहे.

– राम कर्णिक


ज्ञानसूर्याची सावली (कादंबरी)

लेखिका : मंजुश्री गोखले

प्रकाशक : मेहता प. हाऊस

पृष्ठे : ३०४, रुपये २९०/- (दै.सामना)

# द स्ट्रीट लॉयर




'द टेस्टामेन्ट, द फर्म, द लास्ट ज्युरर, द रेनमेकर, द चेम्बर, द क्लायंट. अशा एकापेक्षा एक जबरदस्त कादंबऱ्यांचा लेखक जॉन ग्रिशॅम एका बांधकाम कामगाराचा सुपुत्र. दहा वर्षे वकिली केली. सात वर्षे (१९८३ ते ९०) विधानसभेवर निवडून आल्यावर समाजकार्य (आपण या कार्याला राजकारण म्हणतो!) केले. सुमारे सत्तर तास काम करणारा वकील म्हणून नाव कमावले. वेळात वेळ काढून ते लेखन करीत. त्यांच्या नऊ रोमांचकारी कादंबऱ्या चित्रपटरूपाने पडद्यावर साकारल्या. अफाट संपत्तीचा ते सदुपयोग वादळग्रस्तांसाठी सेवाभावाने करतात. मराठीतील श्रीमंत (?) लेखन यापासून दानशूर होतील म्हणून ही माहिती!

निराश्रितांच्या विश्वाचा परिचय करून देणारे हे कथानक वाचकास बेचैन करते. बेघर, लावारिसं माणसे कशी जगतात हे आपण जाणतो. अमेरिकेतील रहस्यमय गरिबी आणि तिच्यावरील परखड भाष्य म्हणजे वैश्विक निराश्रितांच्या जळजळीत सामाजिक समस्यांचा शोध घेणे. हे जसे कठीण तसेच अनेक प्रश्नांची उत्तरे देणारी ही कादंबरी कुठेही रटाळ होत नाही. वेगवान निवेदनांतून मोजक्या संवादांतून समर्थपणे ग्रिशॅमने एका वेगळ्याच विश्वाची ओळख करून दिली आहे.


मायकेल ब्रॅक हा नायक वकील. वॉशिंग्टनमधील फर्ममध्ये तुफान पैसा कमवत असताना एक दिवस त्याला हे सारे नकोसे होते.

एक बेघर माणूस त्या फर्ममधील नऊ जणांना ओलीस धरतो. त्यातून मायकेल अशा माणसांच्या वस्तीत जातो. तिथे त्त्याला गुप्त कागदपत्रे सापडतात आणि मायकेल हाच फर्मसाठी धोकादायक ठरतो कसा? वाचा हे पुस्तक.

– संजय गोसावी

द स्ट्रीट लॉयर / कादंबरी
जॉन ग्रिशॅम / अनु. शीला कारखानीस
प्रकाशक : मेहता प. हाऊस, पुणे ३०.
पृष्ठे - ३६८, मूल्य - रु. ४००/- (दै.सामना)

# हुकुमशाहीच्या सावलीत




'द वेट ऑफ अ मस्टर्ड सीड' या इंग्लिश अनुभवकथनाचा हा अनुवाद म्हणजे इराकचा क्रूरात्मा सद्दाम हुसेन आणि त्याच्या राज्यकारातील एका सेनाधिकाऱ्यांच्या नैतिक प्रवासाचे अकल्पनीय. परंतु सत्य असे वर्णन आहे. मानवी विवेकविचारांचा मागोवा घेताना युद्धकाळात लेखिकेने केलेल्या थरारक मुशाफिरीची ही कथा आहे. विषय-विकारांत द्रुष्टपणा हाही एक आहे. त्याचा सार्वत्रिक वावर किंवा आढळ हा अंतर्मुख करून सहृदय माणसांना 'जाग' आणू शकतो. तो इथे अनुभवायला मिळतो. पण वाचकाचे हृदय विदीर्ण करतो.

जनरल कमेल सचेत यांच्या व्यक्तिरेखेला जे इराकमधील तत्कालीन संदर्भ आहेत. ते सुजाण वाचकांना नवीन नाहीत. इराकमधील जनता कुठल्या ज्वालामुखीच्या तोंडावर जगत होती. त्यांना विविध पातळ्यांवर संकटांशी सामना करावा लागत होता. दडपशाहीने माणसे कशी पिचून गेली होती. त्यातील विकृती वाचकांस अस्वस्थ करते. एक माणूस, त्याचा संसार, त्याचा देश... पाहिला तर हे सारेच काटेरी अनुभव अजूनही अनेक देशांत जनता अनुभवत आहे.

इराकी माणूस ऊठसूट बंदूक चालवतो. समझोता का करीत नाही. याचे उत्तरही लेखिका संवादांतून सहजपणे देऊन जाते. तो माणूस भूतकाळात रमतो. मतभेद, दु:खे, आठवून आठवून अशांतता माजवतो. ते का हेही समजून येते. इराणशी दीर्घकाळ चाललेल्या युद्धाचे धागेदोरे आणि आतल्या गोष्टी कळल्यावर आणि कमेलच्या चुका समोर आल्यावर वाचकही आश्चर्याने थक्क होतो. वेंडेलच्या इतर पुस्तकांप्रमाणे हेही वाचायलाच हवे असे ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून श्रेष्ठ आहे.

– राजेंद्र ठाणेकर

हुकुमशाहीच्या सावलीत / अनुभवकथन
वेंडेल स्टीव्हन्सन / अनु. अशोक पाथरकर
प्रकाशक : मेहता प. हाऊस, पुणे ३०,
पृष्ठे - २१६, मूल्य - २५०/- (दै.सामना)



# इंग्रजी पुस्तक परिचय



## Azharuddin Ismael

Azaruddin comes from one of the slums of Mumbai, living in the Garib Nagar slum near Bandra station.
According to The Daily Telegraph, "his family's illegal hut was demolished by the local authorities and he now sleeps under a sheet of plastic tarpaulin with shortly afterwards in September 2009.

## BOOK REVIEW




### SLUMBOY

**Azharuddin Ismael**

**Price : 195/-**
**Postage : 30/-**

## *When a Slumdog becomes a Millionaire!*

In India, two things are 'religion': one is cricket and the other is Bollywood. Little wonder then, that every youngster with big dreams in his eyes, aims to bag his armful of stars on either the cricket stadium or then in the glitzy world of celluloid.

Little Azhar from Jalna was no exception. A young boy from the dusty interiors of Maharashtra, Azharuddin hailed from what could be termed as the lowest rung of poverty. Born to a daily-wage labourer Ismail and his wife Shamin, Azhar would have remained condemned to hand-to-mouth-existence, had it not been for his dreams and a stroke of luck that acted as a magic wand to manifest them in the most unimaginable way ever! 'Slumboy', written by Azharuddin Ismael along with Mouhssine Ennaïmi is the riveting story of how this magic unfolded. Written in a crisp, succinct manner, the story takes the reader through the destitute existence of Azhar and his family in the Gareeb Nagar slums of Bandra, to the plush red-carpet at the Oscars!

Azhar's family was amongst the hordes of hopefuls that throng to the City of Dreams, hoping to carve a barely-decent existence from the one they leave behind in their far-flung villages. Ismail, an orphan and a daily-wage labourer who would take any work that got offered to him, was living in his mother-in-law's home after marrying Shamin. When the going got tough, the erstwhile fond mother-in-law began berating Ismail for not bringing in enough money into the family. After a particularly vicious quarrel, Ismail left home in a huff and reached Mumbai, leaving behind his wife and kids. It took his seven years to come back (!) - that too, at the behest of an ailing wife, who wished to see her husband before she died. Repentant at the abandonment, a morose and yet just as poor Ismail, returned to Jalna. The return did his wife good; Ismail was forgiven by his mother-in-law; and once again their married life came back on track. Soon after, Azhar was conceived – a child, for whose problem-ridden birth, Ismail had to steal a goat to pay the doctor's fees!

Few years down the line, Ismail decided that the rural existence was not helping his family in any way and thus he brought them all to live in Mumbai. Albeit, 'live' would be too lavish a word to describe the pathetic conditions that the family was subjected to. With no roof over their head, the Ismail family started living under a 'told-for' space under a bridge. Infested with mosquitoes and rodents that would nibble at the inhabitants' feet at night, this 'home' at Gareeb Nagar locality in Bandra would be razed every few months by municipal authorities wanting to rid the metropolis of this excess 'scum' infiltrating the city. Everytime the authorities would arrive, it would be one chaotic race to salvage whatever important things each family member could gather from the limited things they had; and make a dash out of the hutment, watching it getting mercilessly torn down. A few days later, life would return to normalcy with yet another shelter springing up in place of the old one.

Azhar and his friends learnt to take this dismal existence in their stride, very early on in life. They learnt to derive joy from gully cricket played next to overflowing heaps of garbage. They learnt to keep faith in God despite not knowing whether they would have a house the next day. Most of all, they learnt to hold onto to their dreams amidst all the stench and dirt that surrounded their life on a daily basis. Probably it is this amazing optimism that provided impetus to the miraculous turnaround in Azhar's life. Since childhood, Azhar grew up hearing about the glamorous world of films from his brother-in-law Ayush, who worked as a lightman in Bollywood. The derring-do of actor Salman Khan especially captivated the little boy's innocent heart. Azhar had not harboured any filmy dreams per se; but the spark didn't take much effort to get lit, as a stroke of luck transported Azhar into the core of this dream-world that many spend a lifetime to gain an entry into!

As Azhar was playing in his slum one day, a casting agent came looking for slum-children to hire for a 'big film'. A casual query by Azhar to the agent about getting some work to

earn a few pennies, opened the floodgates of his destiny! As it turned out, the casting was happening for a Hollywood film called ‘Slumdog Millionaire’! Albeit, at that point of time, no one knew how huge the film would turn out to be. Expecting a small role in the film, Azhar got the most pleasant surprise when he got selected with his neighbour Rubina, for the main roles in the film!

From then on, this slumboy’s life was never the same again! The film turned out to be a global hit, taking the Oscar awards by storm! From his shanty in Gareeb Nagar, Azhar got catapulted to the plushest hotels and limousines of LA. From being shunned and shunted around mercilessly, to being feted by the likes of Angelina Jolie, Azhar’s life turned around miraculously.

However, the glitz and glam done with, Azhar came back to his humble abode at Gareeb Nagar; undoubtedly an international star but just as down-to-earth with his friends. After the euphoria of the film died down, life resumed as usual for this child-actor, who unfortunately lost his father soon after. Today Azhar lives in a flat received from the Jai Ho Trust, but the hoopla of stardom seems to have waned off. Life has come full circle, albeit it is now on a better plane for Azharuddin.

The story of Azhar’s circle of life as it went from destitution to unimaginable heights of glory, to again relative anonymity, has been captured like a well-taken snapshot in this succinctly written book called ‘Slumboy’. Definitely worth a read to see how a twist of fate can sometimes bring the most wildest and often, even unseen dreams true!

**- RESHMA S KULKARNI**

**SLUMBOY *: When a Slumdog becomes a Millionaire!***
***by* Azharuddin Ismael,**
**Mehta Publishing House, Pune, Rs. - 195/-**



# श्रद्धांजली

## खुशवंत सिंग



प्रसन्न, पारदर्शक पण प्रसंगानुरूप बोचऱ्या शैलीत ओघवते लेखन करणारे विख्यात साहित्यिक आणि पत्रकार खुशवंत सिंग यांचे २० मार्च रोजी निधन झाले. ते ९९ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पुत्र राहुल आणि कन्या माला आहेत. दयानंदत मुक्तीधाम विद्युतदाहिनीत खुशवंत यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले. यावेळी केंद्रीय मंत्री सलमान खुर्शीद, कपिल सिब्बल, भाजप नेते लालकृष्ण अडवाणी, जया जेटली तसेच अनेक पत्रकार, आप्त आणि मित्र उपस्थित होते.

आजारपणामुळे सार्वजनिक जीवनातून जवळपास निवृत्तच झालेले सिंग यांना अत्यंत शांतपणे मृत्यू आला, असे त्यांचे पत्रकार पुत्र राहुल सिंग यांनी सांगितले. शेवटच्या दिवसांत त्यांना श्वसनाचा त्रास होत होता, मात्र त्यांची स्मरणशक्ती तल्लखच होती. अनेक वर्षांपूर्वी खुशवंत सिंग यांनी स्वत:च्याच मृत्युशिलेसाठी स्मृतिलेख लिहून ठेवला होता. 'इथे असा एक चिरनिद्रा घेत आहे, ज्यानं माणसालाच नव्हे तर देवालाही सोडलं नव्हतं,' अशीच त्याची सुरुवात आहे. २०१२च्या स्वातंत्र्य दिनी वयाची ९८वर्षे पूर्ण केल्यावर खुशवंत सिंग यांनी लिहिले होते की, मी आता आणखी पुस्तके लिहू शकणार नाही हे मला उमगलं आहे. खरे सांगायचे तर मला मृत्यूची इच्छा आहे. मी खूप जगलो आहे. लोकांच्या ओठांवर मी हसू फुलविले, हीच ओळख कायम राहावी, अशी माझी इच्छा आहे.

आता पाकिस्तानात असलेल्या हदली येथे १९१५ मध्ये त्यांचा जन्म झाला शालेय शिक्षण दिल्लीत तर महाविद्यालयीन व उच्च शिक्षण लाहोर आणि केंब्रिज विद्यापीठातील किंग्ज कॉलेजमध्ये पार पडले. वकिली, परराष्ट्र मंत्रालयातील नोकरी आाि नंतर पत्रकारिता अशा प्रवासामुळे तसेच जन्म आणि नंतर कारकिर्दीच्या निमित्ताने विविध देशांशी जुळलेल्या भावबंधामुळे त्यांचे विचारविश्व विस्तारले आणि अनुभवविश्व अधिक समृद्ध झाले. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या लिखाणात उमटले. उर्दू आणि इंग्रजीवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते आणि नास्तिक असूनही शीख पंथाचा त्यांचा अभ्यास इतका सखोल होत गेला की शीख इतिहासाचे दोन खंड लिहिण्याचे मोठे काम त्यांनी पार पाडले. फाळणीच्या अनुभवांवर लिहिलेली 'ट्रेन टू पाकिस्तान' ही त्यांची कादंबरी विश्वविख्यात ठरली. त्यानंतर त्यांच्या लेखणीने आपल्या लालित्य आणि वैविध्याचा प्रत्यय वारंवार दिला. राजकीय लेखन असो की उर्दू शायरीचा मागोवा असो, ओघवत्या इंग्रजी कादंबऱ्या असोत की आपल्याच शीख समाजावर केलेले प्रसन्न विनोद असोत, खुशवंत सिंगांची लेखणी तळपत राहिली. वयाच्या ९५व्या वर्षी लिहिलेली 'द सनसेट क्लब' ही त्यांची अखेरची कादंबरी ठरली. 'ट्रूथ, लव्ह ॲण्ड अ लिटिल मॅलिस' हे त्यांचे आत्मचरित्र २००२मध्ये प्रसिद्ध झाले. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, पंतप्रधान मनमोहन सिंग, भाजपा नेते नरेंद्र मोदी व अन्य राजकीय नेते तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी खुशवंत सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधान मनमोहन सिंग, त्यांच्या पत्नी गुरुशरण कौर, काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी सुजान सिंग पार्क येथील निवासस्थानी खुशवंत सिंग यांचे अंत्यदर्शन घेतले.

## साईभक्त विजय वाडेकर यांचे निधन

लेखक आणि साईभक्त विजय हरी वाडेकर (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुलगे, सुना आणि नाती असा परिवार आहे. जुन्या पिढीतील प्रसिद्ध साहित्यिक हरी विनायक वाडेकर यांचे विजय वाडेकर हे चिरंजीव होत. वाडेकर यांच्या लेखनाची सुरुवात वृत्तपत्रीय स्तंभलेखनाने झाली. त्यांनी 'नामा म्हणे', 'गवसलेले काही' या कथासंग्रहांसह 'मन वढाळ वढाळ', 'सनफ्लॉवर' या कादंबऱ्यांचे लेखन केले. १९६४ ते १९७६ या कालावधीत ते रमणबाग प्रशालेत

शिक्षक होते. 'राजस' आणि ७० च्या दशकात महिलांसाठीच्या 'योगिता' या लोकप्रिय मासिकाचे संपादन त्यांनी केले. वडिलांकडून त्यांना साईबाबांचा आध्यात्मिक वारसा लाभला होता. 'तू माझी माउली' आणि साई मुखे म्हणा' या पुस्तकांतून त्यांनी साईबाबांचे विचार मांडले. साई संस्थानच्या 'साईलीला' मासिकामध्ये त्यांचे लेखन नियमित प्रसिद्ध होत असे. जगभरातील विविध धर्म पंथांमधील सार आणि साईबाबांची शिकवण यांची सांगड घालणारा 'सर्वात्मका सर्वेश्वरा' हा ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

## श्याम फरांदे याचे निधन

नाटककार, लेखक व ज्येष्ठ पत्रकार श्याम फरांदे (वय ६७) यांचे हृदयविकाराने निधन झाले.

'दुसरा सूर्यास्त' (कथासंग्रह), 'योद्धा प्रेषित' (कादंबरी), 'कृष्णातीर' (यशवंतराव चव्हाण चरित्र), 'दिलीपकुमार' (चरित्र), 'अंधारांच्या भिंतीपलीकडले' ही त्यांची पुस्तके गाजली.

'महाभारत' आणि 'इंदिरा प्रिदर्शनी' ही त्यांची पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. सिद्धार्थ वाचनालयाचे ते क्रियाशील सदस्य होते.

त्यांच्या पार्थिवावर सेंट जॉन्स मिशन ख्रिश्चन कब्रस्तान येथे शनिवार (१५ मार्च रोजी) अंत्यसंस्कार करण्यात आले.

## कुलदीप पवार यांचे निधन



भारदस्त आवाज, गावरान बाज, धिप्पाड शरीरयष्टीच्या जोरावर मराठी चित्रपटसृष्टी आणि रंगमंचावर वेगळा अभिनयाचा ठसा उमटवणारे अभिनेते कुलदीप पवार (वय ६४) यांचे २० मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले व वडील आहेत.

एकापेक्षा एक, सर्जा, शापित, नवरा माझा नवसाचा, जावयाची जात, यासारखे त्यांचे अनेक चित्रपट गाजले. अश्रूंची झाली फुले, वीज म्हणाली धरतीला, रखेली, पाखरु, निष्कलंक, पती सारे उचापती या नाटकांमध्ये त्यांनी भूमिका केल्या.

परमवीर या मालिकेतील त्यांची भूमिकाही रसिकांच्या स्मरणात राहिली.

## ज्येष्ठ अभिनेत्री नंदा यांचे निधन



'धूल का फूल', 'जब जब फूल खिले', 'इत्तेफाक', 'गुमनाम', 'जब प्यार किसीसे होता है', 'जोरू का गुलाम' अशा कित्येक हिंदी चित्रपटांबरोबर 'कुलदैवत', 'देवघर' अश काही मराठी चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या चतुरस्त्र अभिनेत्री नंदा (वय ७५) यांचे २५मार्च रोजी राहत्या घरी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्या अविवाहित होत्या. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी उशिरा ओशिवरा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

बेबी नंदा यांनी लहानपणापासूनच अभिनय करण्यास सुरुवात केली होती. वडील मास्टर विनायक यांच्या आग्रहामुळेच 'मंदिर' या चित्रपटामध्ये वयाच्या सहाव्या वर्षी त्यांनी काम केले. त्यानंतर बालकलाकार म्हणून त्यांनी पंधरा ते सोळा चित्रपटांमध्ये काम केले. 'बेबी नंदा' म्हणून त्यांना त्याच वेळी मोठी लोकप्रियता मिळाली आणि पुढे त्याच नावाने त्या ओळखल्या जाऊ लागल्या. राजेंद्र कुमार यांची प्रमुख भूमिका असलेला 'तुफान और दीया' हा नायिका म्हणून त्यांचा पहिलाच चित्रपट. त्यावेळी कित्येक आघाडीच्या अभिनेत्यांबरोबर त्यांनी काम केले. त्या वेळच्या त्या अगदी टॉपच्या नायिका म्हणून ओळखल्या जात होत्या. शशी कपूर यांच्या फ्लॉप नायकाचा शिक्का बसल्यानंतर कोणतीही टॉपची नायिका त्यांच्याबरोबर काम करण्यास धजावत नव्हती; परंतु त्याच वेळी नंदा यांनी 'जब जब फुल खिले' या चित्रपटांमध्ये त्यांच्याबरोबर काम केले आणि त्यानंतरच खऱ्या अर्थाने शशी कपूर यांची चित्रपट कारकीर्द बहरात आली. शशी कपूर आणि त्यांची जोडी रुपेरी पडद्यावर कमालीची लोकप्रिय ठरली. गेली काही वर्षे नंदा सार्वजनिक जीवनातून निवृत्त झाल्या होत्या.

२३वी आवृत्ती

# राधेय




रणजित देसाई


**किंमत : २००/-रु.**

**पोस्टेज : ३०/-रु.**

“मी योद्धा आहे.
जखमींची क्षिती बाळगून भागायचं नाही
जन्माबरोबरच सुरू झालेलं हे युद्ध
अखेरच्या क्षणापर्यंत मला चालवलं पाहिजे
त्यातच माझ्या जीवनाचं यश सामावलं आहे.”

१०वी आवृत्ती

# राजा रविवर्मा




रणजित देसाई

**किंमत : ३२०/-रु.**


**पोस्टेज : ३०/-रु.**

१०वी आवृत्ती

# वपुर्वाई

व.पु. काळे

**किंमत : १००/-रु.**
**पोस्टेज : ३०/-रु.**




"...महाकाय वृक्ष तोडून माझ्या लाकडाचे पैसे नक्कीच भरपूर येतील, पण त्याच्या कितीतरी पट अधिक पिढ्या न पिढ्या पुरणारी संपत्ती त्याची सावली असते. मला सावलीचं महत्त्व पटतं."

– लोकप्रिय कथाकार व.पु. काळे आपल्या कथेत अशा अनोख्या प्रतिमांमधून सतत माणूसपणाचा उद्घोष करताना दिसतात. वेगवेगळ्या परिस्थितीत सापडलेली, संघर्ष करणारी, हसणारी, रडणारी, कुढणारी सर्वसामान्य माणसं रंगवताना ते त्यांच्यातल्या असामान्यत्वाचा नेमका वेध घेतात. आणि आपल्या प्रसन्न, खुमासदार मिस्किल शैलीत त्याचा अविष्कार करतात. वपुंच्या लेखनातील हा पैलूच वाचकांना अपूर्वाईचा वाटतो. 'वपुर्वाई' यामुळेच वाचकांचं मन सहज जिंकून घेते."


## नम्र सूचना

'मेहता मराठी ग्रंथजगत'च्या सर्व वाचकांनी
कृपया नोंद घ्यावी की यापुढे 'मेहता मराठी ग्रंथजगत'साठी
एक वर्षाचे सभासदत्व ही योजना 'एप्रिल २०१४' पासून आम्ही बंद करत आहोत.
यापुढे कुठल्याही जुन्या सदस्यास अथवा नव्याने सदस्यत्व घेणाऱ्या व्यक्तीस
एक वर्षाचे सभासदत्व मिळू शकणार नाही.
तीन व पाच वर्षांचे सभासदत्व ही योजना मात्र
पूर्वीप्रमाणेच चालू राहील.






# वाढदिवस



एक मुलगा होता. तुमच्यासारखाच हुशार, व्रात्य, थोडा दंगेखोर पण सगळ्यांचा लाडका. 'पार्थ' त्याचं नाव. परीक्षा संपून उन्हाळ्याची सुट्टी लागली की दरवर्षी त्याची कुरकुर असायची.

अशीच याही वर्षी परीक्षा संपली आणि आई-आजीच्या मागे पार्थ कुरकुरू लागला. होतं असं की त्याचा वाढदिवस होता सुट्टीत. मित्रही गावाला ट्रीपला वगैरे गेलेले असायचे. त्यांच्यासारखा शाळेत खाऊ वाटून शिक्षकांकडून कौतुक करून घेत पार्थचा वाढदिवस व्हायचा नाही म्हणून त्याला नेहमी वाईट वाटायचं.

एक दिवस त्याची नाराजी पाहून आजी म्हणाली. ''थांब, आपण यंदा तुझा वाढदिवस असा मस्त साजरा करू की तू एकदम खूषच होशील. खूप नवीन मित्र-मैत्रिणी भेटतील तुला.'' पार्थ एकदम खूषच झाला हे ऐकून आजीला मदतही करू लागला.

दोघांनी बाजारात जाऊन पार्टीसाठी फुगे, टोप्या, पिपाण्या आणल्या. आजीने मित्रांना द्यायला खूप भेटवस्तू घेतल्या. आदल्या दिवशीपासून खपून आई आणि आजीने भरपूर खाऊही बनवला. अर्थात पार्थ होताच मदतीला. पण खूपदा विचारूनही मित्रमैत्रिणी कुठले



याचा आजीने पत्ताच लागू दिला नाही अजिबात.

''अरे, आपण ना चाललोय अनाथाश्रमात तिथेही तुझ्यासारखीच मुलं राहतात. पण त्यांच्यासाठी कोणीच कधी पार्टी करत नाहीत. आज तुझ्या वाढदिवसाच्या पार्टीत सामील करून घेतल्यामुळे ती मुलं बघ किती खूष होतील.''

अन् खरंच! सगळी मुलं वाटच बघत थांबली होती. या दोघांना बघून मुलांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. त्यांच्या मदतीने आजी व पार्थने सर्व सामान आत नेले. पार्थने सर्वांबरोबर खाऊ खाल्ला. त्यांच्यासाठी आणलेल्या भेटवस्तू दिल्या. मुलांनीही स्वत: बनवलेली एक छोटीशी भेटवस्तू पार्थला दिली. ती देताना मुलांचे चेहरे आनंद आणि अभिमानाने कसे चमकत होते.

मोठी मुलं लहानांना छान खेळवताना, सांभाळताना पाहून पार्थला वाटले, 'आपल्यालाही एखादा दादा किंवा ताई असायला हवे होते'. दिवसभर तिथे खेळूनही पार्थचे पोट भरले नाही.

निघताना त्याचे पाय जड झाले होते.

रिक्षात बसताना त्याने सर्वांना टाटा केले आणि लवकरच पुन्हा येण्याचे आश्वासन दिले.



आजीने विचारले, ''मग, कशी झाली पार्टी? मजा आली का तुला?''

''हो!'' पार्थने मोठ्ठा होकार दिला, आणि म्हणाला, ''खूप मज्जा आली. आता मी दरवर्षीच माझा वाढदिवस इथेच येऊन करणार आणि माझ्या मित्रांनाही इथे घेऊन येणार!''

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची वाचकांसाठी सुवर्णसंधी...**

आता महाराष्ट्रातील मोजक्या ठिकाणी

कॅश ऑन डिलिव्हरीची सुविधा उपलब्ध!

` १०००/- (Net) किंवा अधिकच्या खरेदीवरील पुस्तके कॅश ऑन डिलिव्हरीच्या माध्यमातून आपल्याला घरपोच मिळू शकतात.

Handling Charges : ` १००/- (*अटी लागू)

ऑनलाईन वाचकांसाठी सुवर्णसंधी

# मेहता मराठी ग्रंथजगत

## Digital Edition

DIGITAL EDITION

**मेहता मराठी ग्रंथजगत चा अंक आता डिजीटल स्वरूपात**

- इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्यामुळे हवा तिथे पाहू शकता.
- तुमच्या मोबाईलवरही वाचू शकता.
- वाचण्यासाठी मेहता पब्लिशिंग हाऊस ॲप मार्केटमध्ये मोफत उपलब्ध.

| आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत | तीन वर्षांना | पाच वर्षांना |
|---|---|---|
| | २५% | ३०% |

| वर्गणी | ३ वर्षांची वर्गणी | ₹३०० | ५ वर्षांची वर्गणी | ₹४०० |
|---|---|---|---|---|

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा खालील पत्त्यावर पाठवावी.**


**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.: PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 April. 2014 Posting Date : 11 April. 2014

## आगामी

# माझी जीवनयात्रा स्वप्ने साकारताना...




लेखक
**डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम**
अनुवाद
**सुप्रिया वकील**

देशातील नामवंत शास्त्रज्ञ व ज्येष्ठ विचारवंत डॉ. कलाम यांच्या जीवनयात्रेतील स्फूर्तीदायी आठवणी...

रामेश्वरमच्या सागरतीरावरील अल्लडवयीन मुलगा ते भारताच्या राष्ट्रपतीपदी विराजमान होणारा बुद्धिमान शास्त्रज्ञ व थोर विचारवंत... या दरम्यानची डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जीवनयात्रा म्हणजे दृढनिश्चय, धाडस, चिकाटी आणि सर्वोत्कृष्टतेचा ध्यास यांचा विलक्षण मिलाफ आहे. या जीवनयात्रेदरम्यानच्या आठवणी, भेटलेली माणसं, ठळक प्रसंग त्यांनी या पुस्तकातून वाचकांसमोर उलगडले आहेत. त्यांच्या आयुष्यावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती, त्यांचे जिवलग, मार्गदर्शक, गुरू या सगळ्यांबद्दल त्यांनी अतिशय प्रेमानं व आपुलकीनं लिहिलं आहे. आयुष्यात या स्थानावर पोहोचताना त्यांनी केलेला त्याग, संघर्ष आणि जिद्द यांच्या वाटचालीची कहाणी वाचताना वाचक भारावून जातो. ही विलक्षण जीवनयात्रा मार्गदर्शक, स्फूर्तिदायी आणि प्रेरक आहे.

BOOK POST
Printed Matter

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.